# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. २५/०२/२००४

आज दि. २५/०२/२००४ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सुचना क्र. १२ दि. १७/०२/२००४ रोजीच्या विषय पत्रिकेवर विचार विनीमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. मेंडोसा मायरा गिल्बर्ट | महापौर |
| २) | श्री. मॉरस रॉड्रीक्स | सभापती |
| ३) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सभागृह नेता |
| ४) | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | सदस्या |
| ५) | श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज | गटनेता |
| ६) | श्री. पाटील चिंतामण कमलाकर | सदस्य |
| ७) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ८) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ९) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| १०) | श्रीम. ज्युडी थॉमस डिसोझा | सदस्या |
| ११) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १२) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १३) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १४) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १५) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १६) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १७) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| १८) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| १९) | श्री. मदन उदितनारायण सिंग | सदस्य |
| २०) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| २१) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २२) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २३) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २४) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| २५) | श्री. हंसुकुमार पांडे | सदस्य |
| २६) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २७) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| २८) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| २९) | श्रीम. सावळे निर्मला बाबुराव | सदस्या |
| ३०) | श्री. माळी रविंद्र भिमदेव | गटनेता |
| ३१) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३२) | श्रीम. ज्योत्स्ना जालिंदर हसनाळे उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ३३) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३४) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ३५) | श्रीम. पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ३६) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३७) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |
| ३८) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ३९) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सदस्या |
| ४०) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | गटनेता |
| ४१) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ४२) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ४३) | श्रीम. सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४४) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| ४५) | श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा | सदस्य |
| ४६) | श्री. पाटील रोहीदास आत्माराम | सदस्य |
| ४७) | श्री. कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ४८) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ४९) | श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस | सदस्या |
| ५०) | श्रीम. भामरे उर्मिला कोमल | सदस्या |
| ५१) | श्री. जोजफ जॉन घोन्सालवीस | सदस्य |
| ५२) | श्री. जेम्स इजिदोर कोलासो | सदस्य |
| ५३) | श्रीम. शहा रिटा सुभाष | सदस्या |
| ५४) | श्री. महेंद्रसिंग चौहाण | सदस्य |
| ५५) | श्री. ध्रुवकिशोर पाटील | सदस्य |
| ५६) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ५७) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ५८) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ५९) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ६०) | श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ | गटनेता |
| ६१) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्य |
| ६२) | श्री. पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ६३) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ६४) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ६५) | श्री. म्हात्रे तुळशिदास दत्तू | सदस्य |
| ६६) | श्रीम. रक्षा एस. शाह | सदस्या |
| ६७) | श्री. मिलन गोंविंदराव पाटील | सदस्य |
| ६८) | श्री. जैन रमेश धरमचंद्र | सदस्य |
| ६९) | श्री. ठाकुर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |
| ७०) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ७१) | श्री. संजय नारायण पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ७२) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## अनुपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| २) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ३) | श्री. पटेल आसिफ गुलाम | सदस्य |
| ४) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ५) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ६) | श्री. शहा शशिकांत रतिलाल | सदस्य |
| ७) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ८) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |

## रजेचे अर्ज आलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सय्यद मुझ्झफर हुसेन | उपमहापौर |
| २) | श्री. परशुराम दामोदर पाटील | विरोधी पक्षनेता |
| ३) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| ४) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |

वरील प्रमाणे महासभेकरीता आवश्यक असणारा कोरम पूर्ण झाल्याने मा. महापौरांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यांस सांगितले. त्यानुसार वंदेमातरम् या राष्ट्रगीतानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**मा. महापौर :-**

नमस्कार. मा. आयुक्त सो. स्थायी समिती सभापती, सभागृह नेते, मा. उपआयुक्त, सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, उपस्थित नागरिक व पत्रकार बंधु आपण सर्वांचे स्वागत.

**प्र. सचिव :-**

मा. आयुक्त यांनी सन २००३-०४ चे सुधारित व सन २००४-०५ चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समिती सभापती यांना सादर केले होते . मा. स्थायी समितीने सदरच्या अंदाजपत्रकावर शहराच्या विकासाबाबत असमतोल दूर करण्यासाठी तळागाळातील लोकांचे राहणीमान चांगले व्हावे यासाठी सखोल चर्चा करुन काही सुधारणा करुन शिफारसीसह चांगला असा १८२ कोटी ७६ लाख ९२ हजार रक्कमेचा अर्थसंकल्प मा. महासभेपुढे मा. स्थायी समिती ठराव क्र. २०८ दिनांक ११/२/०४ अन्वये सादर केलेला आहे. या स्थायी समितीने चांगला अर्थसंकल्प सादर केलेला आहे. सहकारी नगरसेवकांनी अर्थसंकल्पावर विचार मौलिक सुचना केलेल्या आहेत. त्या सुचनाचा विचार करण्याचा आपण प्रयत्न करु या. मिरा भाईंदर बांधवांना अत्यावश्यक मूलभूत सेवा पुरविण्यासाठी आणि विकासाची कामे लक्षात घेउन सर्व विकासाची कामे लक्षात घेउन अर्थसंकल्प तयार केलेला आहे. मा. आयुक्त व मा. स्थायी समिती यांनी आर्थिक नियोजन करुन हा जो अर्थसंकल्प तयार केलेला आहे त्यामध्ये प्रत्येक सदस्याच्या अपेक्षेप्रमाणे सर्व कामे या अर्थसंकल्पात समाविष्ट झाली असतीलच असे नाही परंतु कोणत्याही प्रभागावर अन्याय होणार नाही . याची दक्षता घेण्यात आलेली आहे. धन्यवाद.

**शशिकांत भोईर :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो मी पत्र दिलेले होते आम्हाला आसनाची व्यवस्था करा. विरोधी पक्षामध्ये आसनाची तशी व्यवस्था झालेली आहे का?

**प्र. सचिव :-**

आपले पत्र मिळालेले आहे. पूर्वी विरोधी पक्षाचे बाजूला यांच्यात जागा नव्हती म्हणून उजव्या बाजूला बसविण्याची व्यवस्था केली होती.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौरांच्या परवानगीने सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी तातडीच्या स्वरूपामध्ये आपल्या आसन व्यवस्थेबददल सभागृहाचे लक्ष वेधून आपल्याकडे सुध्दा त्या संदर्भात निवेदन केले आहे. सदर आसन व्यवस्था करण्यासाठी आलेले पत्र मला वाटते लास्ट मिनिट आलेले आहे, कालच आलेले आहे. चार दिवस अगोदर जर पत्र आले असते तर आपल्याशी चर्चा विनिमय करुन व्यवस्थेच्या संदर्भातील विषय आपल्याला निकाली काढता आला असता पण मी आपल्या निदर्शनास आणून देउ इच्छितो की जेव्हा महानगरपालिका स्थापन झाली त्यावेळी आसन व्यवस्थेच्या बददल एक दोन सभामध्ये आपली चर्चा झाली आणि मग सर्वानुमते आणि सर्वांनी ते स्वीकारुन आपापली आसन व्यवस्था स्विकारलेली आहे. या ठिकाणी सन्मा. सदस्य शशिकांत भोईर शहर विकास आघाडी याच्या वतीने त्यांना स्वतंत्र बसण्याच्या व्यवस्थेची जर आवश्यकता असेल त्यांचे प्रतिपादन असेल तर त्यांच्या व्यवस्थेबद्दल विचार करायला काही अडचण नसावी. पुढील सभेपुढे तो विषय किंवा तत्पूर्वी महापौरसाहेबांनी मी सन्मा. सदस्य शशिकांत भोईर आणि शहर विकास आघाडीच्या सर्व सदस्यांना नम्रपणे विनंती करतो की, आज आपली ही बजेटची सभा असल्यामुळे आपण सभेच्या कामकाजाला सुरुवात करु. अडचणीमध्ये बसण्यासारखे वाटत असेल तर ती अडचण या शहरासाठी आपण मान्य करावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

**शशिकांत भोईर :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो आम्ही ज्यावेळी महापालिका स्थापन झाली त्यावेळी विरोधी पक्षातच बसलेलो होतो. त्यावेळी जेंव्हा आसनाच्या व्यवस्थेमध्ये गोंधळ झाला त्यावेळी एक सहानभुती

म्हणून प्रशासनाने आम्हाला विनंती केली. तद्नंतर त्यांच्या विनंतीला मान देउन कारण एक तास तो गोंधळ चालू होता की, आमची आसनाची व्यवस्था कुठे? प्रशासनाचा मान ठेवून आम्ही काही वेळ तिकडे बसलो पण आता आम्ही पत्र दिलेले आहे आणि सचिवांनी ती आसनाची व्यवस्था करायला पाहिजे होती त्यांनी केलेली नाही मग आम्ही खाली बसतो.

**याकुब कुरेशी :-**

महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छितो ज्यावेळी आपण जी सहानभुती दाखविली तीच आतासुध्दा या सभेत दाखवावी अशी मी तुम्हाला विनंती करतो.

**शशिकांत भोईर :-**

आम्ही १८ महिन्याचा कार्यकाल दिलेला आणि आम्ही भरपूर सहानभुती दाखविली. त्याबद्दल सहानभुतीचे आम्हाला काय बक्षिस मिळायचे ते आम्ही बघितले त्याबददल धन्यवाद.

**मा. महापौर :-**

सध्या दीड वर्षापासून कुठे बसतात तिथे बसा नंतर आपण बघु.

**शशिकांत भोईर :-**

मॅडम आम्ही खाली बसतो. आसनाची व्यवस्था नसेल तर विरोधी पक्ष म्हणून आम्ही बाजूला खाली बसतो. एवढी सिटींग अरेंजमेन्ट होउ शकते.

**मोहन पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छितो मिरा भाईंदर शहर विकासाच्या दृष्टीकोनातून सर्व पक्षातील घटक एकत्र येउन आपल्या शहराचा विकास करण्याच्या दृष्टीकोनातून एक पाउल पुढे एक पाउल मागे घेतले त्याबद्दल मी प्रत्येक सदस्याला धन्यवाद देतो मागच्या वेळेला जेंव्हा सभागृहामध्ये बसण्याच्या आसनाच्या व्यवस्थेवर चर्चा झाली बऱ्याच वेळेला सन्मा. गटनेते शशिकांत भोईर यांनी मघाशी सुचना केली त्यावेळेला सभागृहामध्ये ज्या वस्तुस्थितीमध्ये जी बसण्याची आसने होती त्या आसनामध्ये कुठेतरी सर्व समावेश होत नव्हते. म्हणून त्यांनी सांगितले आम्ही त्या ठिकाणी बसतो आणि आता त्यांनी दोन दिवसानी पत्र दोन दिवसामध्ये सभा लागली होती आणि दोन दिवसात बसण्याची व्यवस्था होउ शकत नाही तरी सर्व सन्मा. गटनेत्यांना एकत्र बोलावून मा. महापौर मॅडम आपण सर्वांना बसण्याची व्यवस्था पुन्हा हे करुन द्यावी. आणि मी सर्वांचे आपले नेते लिओ कोलासो यांना विनंती करतो की, आपण जाउन सन्मा. सदस्यांना त्यांच्या शहर विकास आघाडीच्या अध्यक्षांना आणि गटनेत्यांना आपण त्यांना विनंतीपूर्वक सांगावे की आपण यावेळी या सभेमध्ये ॲडजेस्टमेंट करुन घ्यावी. कारण सदनामध्ये प्रत्येक सदस्याची किंमत आहे. प्रत्येक सदस्य हा महत्वाचा सदस्य आहे. त्यांनी कुणी खाली बसून आपण आपल्या सदनाची जी परंपरा आहे त्याला कुठे धक्का पोहोचणार नाही याची प्रत्येक सदस्याने खबरदारी घेतली पाहिजे सभागृह नेते यांना मी विनंती करतो की, आपण त्यांना कृपया समजावून सांगावे आणि आपण आपल्या आसनावर या सभेपुरता बसावे. पुढच्या सभेला आपण त्यांची परमनन्ट व्यवस्था करावी.

**जयंत पाटील :-**

या शहराच्या दृष्टीने आजचा दिवस अतिशय महत्वाचा असल्यामुळे आम्ही कॉंग्रेस पक्षाचे नगरसेवक जे आम्ही विरोधी पक्षामध्ये आहोत आमची इथून जी तिसरी लाइन आहे ती आम्ही खाली करुन आणि बीजेपीच्या पुढे ती लाइन आजच्या दिवसासाठी त्यांना आम्ही मोकळी करुन देतो. आणि त्याच्यानंतर आपण पुढचा निर्णय घ्यावा अशी मी विनंती करतो. धन्यवाद.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो मी मा. महापौर साहेबांना धन्यवाद देतो की सोमवारी जे पत्र आले. कालचा दिवसच फक्त मध्ये गेलेला आहे आणि १८ महिन्यांची व्यथा शहर विकास आघाडीचे सन्मा. नगरसेवक व्यक्त करित असतानाच सन्मा. ज्येष्ठ सदस्य जयंत पाटील, सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती कॉग्रेंसच्या मंडळींना अत्यंत दिलदारपणे समयसुचकतेने आपल्या सहा मेंबरची आसने बदलून त्या ठिकाणी शहर विकास आघाडीच्या सदस्यांना बसण्याची संधी दिली. महापौर साहेब हे चांगले कार्य या कॉंग्रेसची मंडळी करित आहेत. त्याबददल मी त्याना धन्यवाद देतो.

**प्र. सचिव :-**

या सुचनेद्वारे आपणास कळविण्यात येते की मिरा भाईंदर महापालिका महासभा दिनांक २५/२/२००४ रोजी सकाळी ११ वाजता मिरा भाईंदर महापालिका मुख्य कार्यालय तिसरा मजला सभागृहात सभा सुचना क्रमांक १२ दिनांक १७/२/२००४ रोजीच्या सोबतच्या विषयपत्रिकेवर प्रकरणावर विचारविनीमय करण्यासाठी आयोजित करण्यात येत आहे. आजच्या बजेटच्या सभेत प्रश्नोत्तराचा तास घेता येणार नाही.

(प्र.सचिवांनी प्रकरण क्र. ७३ चे वाचन केले )

**प्र. सचिव :-**

मा. सभापती मा. महापौरांना बजेट सादर करित आहेत.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

मा. सभापती महोदयाचे भाषण झाल्यानंतर बोलायचे आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आज दिनांक २५/२/०४ रोजीच्या महासभेत उपस्थित असलेल्या मा. महापौर मॅडम, मा सभागृह नेते, मा. विरोधी पक्ष नेते, मा. उपआयुक्त, सन्मा. नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी व कर्मचारी वर्ग, उपस्थित नागरिक व पत्रकार बंधु मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००३-०४ चे सुधारित व सन २००४-०५ चे मुळ अंदाजपत्रक आपणासमोर सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे मा. आयुक्त साहेब यांनी दिनांक ५/२/०४ रोजी महापालिकेचे अंदाजपत्रक मा. स्थायी समितीपुढे सादर केलेले आहे. मनपा क्षेत्राचा विकास हा केंन्द्रबिंदु लक्षात घेउनच सदर अंदाजपत्रक मा. आयुक्तांनी सादर केलेले होते त्याबाबत मी त्यांचे अभिनंदन करतो. मा. आयुक्तांनी विशेष शिक्षण कर व अग्निशामक कर नव्याने प्रस्तावित केलेले होते हा अर्थसंकल्प अधिक अधिक लोकप्रिय व्हावा यासाठी कोणतीही करवाढ न करता मिरा भाईंदर शहरातील गरिब सर्वसामान्य नागरिक झोपडपट्टीधारक यांना अधिक दिलासा मिळावा यासाठी मा. स्थायी समितीने लेखा शीर्षाक्रमांक फेरफार या अर्थसंकल्पात नमुद केलेले असून दिनांक ११/२/०४ नुसार आपल्यासमोर मांडण्यासाठी सादर करित आहे. धन्यवाद.

**शरद पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो स्थायी समितीमध्ये जेव्हा बजेटची सभा चालू असताना ज्या एम.आर.पी. ज्या वस्तूवर प्राईज लिहीलेली आहे अशा वस्तूंची किंमती त्याच्यावर फक्त ऑक्ट्रॉय वाढवायचा हे स्थायी समितीमध्ये ठरले होते. त्यामध्ये प्रथमतः आम्ही भारतीय जनता पार्टीच्या नगरसेवकांचा विरोध केला होता. पण पुढील टीप लक्षात घेता याच्यावर सर्व संमतीने सर्वांनी तिथे एकमत केले होते पण सध्या या ५३ नंबर जी आता टिपणी दिलेली आहे . त्याच्यात अ आणि ब असे दोन घटक केलेले आहेत. अ मध्ये एम.आर.पी. आहे हरकत नाही पण जे ब मध्ये दिले त्यावर भुर्दंड भोगावा लागेल अशी सर्व वस्तु आहेत तर त्याचा उल्लेख स्थायी समितीमध्ये झाला नव्हता आणि इथे उल्लेख केलेला आहे तरी माझी मा. महापौर मॅडम आणि प्रशासनाला विनंती आहे, त्याच्यातून ते रद्द करण्यात यावे. धन्यवाद.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

मा. महापौर, स्थायी समितीमध्ये मा. आयुक्तांनी बजेट सादर करताना कोणकोणत्या वस्तूवर जकातवाढ केल्यानंतर ३९ कोटी जकात जाईल. याचे तक्त्यासह बजेट सादर केले होते परंतु बजेट सादर करताना दरपत्रक कोणकोणत्या वस्तूवर काढवायचे ते दिले होते. त्यांनंतर स्थायी समितीने ते अमान्य केल्याने नंतर पुढे येणार नाही मात्र सादर करताना ते होते म्हणून माहितीसाठी दिले सादर करताना काय होते? त्यामुळे ते मान्य झाले असे नाही. स्थायी समितीने मान्य न करता पुढे बजेट पाठविलेले फक्त आयुक्तांनी सादर करताना काय काय सादर केले होते? याच्या सह ते दिलेले आहे प्रत्यक्षात स्थायी समितीने अमान्य केल्यानंतर आयुक्तांनी काय सादर केले होते हे सर्व सभागृहाला कळावे म्हणून तो तक्ता सोबत जोडलेला आहे.

**शरद पाटील :-**

महापौराच्या परवानगीने बोलतो नाईक साहेब आपण बोललात ते बरोबर आहे पण याच्यात प्रस्तावित वाढ आणि सध्याचे दर असे दोन दिलेले आहेत. या 'ब' मध्ये दोन टक्के होते ते तीन टक्के केलेले आहे आणि ही जी सुची आलेली आहे ती स्थायी समितीने मंजुर केलेल्या सर्व पदार्थांचीच आहे याच्यात ५३ मध्ये ब आहे कात्र्या, वस्तरे, ब्लेड, चाकू, सुरे, चमचे, काटे, कटलरी सर्व प्रकारच्या सुऱ्या, कुलुप, किल्ल्या, स्टोव्ह व पेट्रोमेक्स व त्याचे भाग हे नागरिकांना त्याचा भुर्दंड आहे. स्थायी समितीमध्ये नव्हते याच्यावर कुठे वाढ केलेली नाही आहे हे आता ॲडिशनल भरलेले आहे आणि जेवढी आता दिली ती सर्व स्थायी समितीने मंजुर केलेली आहेत त्याचीच फक्त टिपणी दिलेली आहे. त्याचे ॲडिशनल आहेत म्हणून ते फक्त रद्द करण्यात यावेत.

**चंद्रकांत वैती :-**

महापौर मॅडम, स्थायी समितीचे सन्मा. सदस्य शरद पाटीलसाहेब यांनी जो मुददा उपस्थित केला परंतु आपल्याला आयुक्तांनी जे बजेटचे अंदाजपत्रक दिले त्यावेळेला आपल्याला एक टिपणी सोबत दिले होते. त्यामध्ये ५३ हाच आकडा होता आणि त्याच्यामध्येपण अ आणि ब असे बायफर्गेशन

होते. त्याला आपल्या सदस्यानी असा विरोध होता की या जकातच्या दोन टक्के आहे तर त्याचे चार करु नयेत इलेक्ट्रॉनिक आयटमचे तीन आहेत. त्याचे चार तसे आपण केले होते. परंतु आयुक्तांनी ती टिपणी दिली होती त्या टिपणीमध्ये ही आकडेवारी होती अशात-हेने आयुक्तांनी आपल्याला बजेट दिले तेव्हाची ही जी टिपणी आहे ती आपल्याकडे देतो.

**शरद पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती साहेब आपण बरोबर बोलता. पण ह्या ज्या वस्तू आहेत त्या वस्तूची त्यामध्ये नोंद केलेली नाही. ५३ मध्ये बघा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

सन्मा. महापौर महोदया उपस्थित सदस्य श्री. शरद पाटील आपण जो मुद्दा उपस्थित केला त्यावर स्थायी समितीने ठराव क्र. २०९ नुसार शिफारस केलेली आहे त्यामध्ये ५३ अ आणि ब असे नमुद केलेले आहे अ मध्ये केसाचे सुगंधी तेले, सर्व प्रकारचे सुगंधी द्रव्ये, सेन्टस, अत्तर, सुगंधी वस्तू, उदबत्या, सुगंधीम रसायने, सर्व प्रकारची सौदर्य प्रसाधने, दाढीचे क्रीम, साबण, दंतमंजन, टुथपेस्ट, कोलगेट, फण्या, ब्रश, पिना, आरसे, ब्रेसेस, स्पेन्डर्स. ब मध्ये कात्र्या, वस्तरे, सेफ्ट इरेजर्स, ब्लेड, सुरे, चाकू, चमचे, कटलरी, सर्व प्रकारच्या सुऱ्या, कुलुपे व किल्ल्या, स्टोव्ह व पेट्रोमॅक्स आणि त्यांचे भाग व उपसाधने आणि लोखंडी सामान ५३ हा एकच याच्यामध्ये धरला जातो. अ आणि ब हे त्याच्यामध्ये उपभाग केलेले आहेत त्यामुळे ५३ साठी जी वाढ दोनच्या ऐवजी तीन टक्के वाढ झालेली आहे ती अ आणि ब या दोघांनाही लागू होते.

**शरद पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो केळकर साहेब आता आपण ही दुसरी टिपणी बघितली माझ्या हातात दिलेली दुसरी टिपणी आहे या दोन टिपणीमुळे सर्व सदस्यांची मी दिशाभुल बोलत नाही. पण गैरसमज निर्माण झालेला आहे या दोन टिपण्या आहेत आणि याच्यामध्ये फक्त ५३ ब च आहे अ नाही आहे आपण दोन्ही पाहणार आहोत.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य शरद पाटील साहेब ही टिपणी आपल्याला त्यावेळेला आयुक्तांनी दिलेली होती बजेट चालू होते तेव्हा दिलेली आणि त्याच्यामध्ये त्यानी चार टक्के वाढ दर्शविली होती आणि आपण ती कमी करावी अशी सुचना केली होती त्या दोन टिपण्या आहेत.

**शरद पाटील :-**

सन्मा. सदस्य चंद्रकांत वैतीसाहेब ते बरोबर आहे पण आधी आपण या टिपणीच्या हिशोबाने त्यावेळेला गेलो होतो. त्यावेळेला ५३ ब च आहे. ती टिपणी पण बघावी. दोन्ही टिपणी वाचल्यामुळे याच्यात गैरसमज निर्माण झाला आहे. दुसरी टिपणी बघितली ह्याच्यात ब आहे. ही टिपणी आपल्याला महानगरपालिकेनेच दिलेली आहे.

**मोहन पाटील :-**

स्थायी समितीचे सन्मा. सदस्य शरद पाटील जेव्हा आपल्याकडे आयुक्तांनी मुळ अंदाजपत्रक सादर केले त्यावेळेला आपल्याला एक टिपणी दिलेली आहे ती टिपणी तुमच्याकडे असेल त्याच्यामध्ये आकडयामध्ये असे दिले आहे १६ अनुक्रमांक ५३ दिलेला आहे आणि त्याच्याखाली १७ दिला आहे त्याच्यावर ५३ ब दिलेला आहे आणि त्याच्यामध्ये जे उल्लेखित जे आम्ही आक्षेपार्ह सांगितलेले आहे. त्याचा उल्लेख झालेला आहे आणि त्याच्यावर चर्चा देखील झालेली आहे सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीसजी, सन्मा. सदस्य आसिफ शेखजी, सन्मा. सदस्य जोजेफजी हे सर्व सदस्य त्यावेळी होते आणि आपल्याकडे अनुक्रमांक १६ आणि अनुक्रमांक १७ असे दोन भाग केलेले आहेत. अनुक्रमांक सोळा मध्ये फक्त ५३ लिहिला गेला आहे आणि अनुक्रमांक १७ मध्ये ५३ ब लिहिला गेला आहे त्याच्यामध्ये दोन्हीही समाविष्ट झालेले आहेत. आपण कृपया बघितले तर लक्षात येईल.

**शरद पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो साहेब माझ्याकडे टिपणी दिली ती महानगरपालिकेने दिलेली टिपणी आहे तुम्ही याच्यात बघा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

साहेब आपल्याला एवढीच विनंती आहे की आयुक्तांनी दिलेली टिपणी जी होती ती टिपणी सुचविताना बजेट सादर करताना १ ते २३ जे आयटम काय काय वाढवायला पाहिजे ती दिली होती मंजुर करताना मात्र तुम्ही १३ ते ५७ स्थायीने शिफारस केली तेवढेच बघायचे आहे

**जोजेफ घोन्सालवीस :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो. सन्मा. सदस्य पाटील साहेब यांनी आता जो उल्लेख केला की, सन्मा. सदस्य जोसेफ हे करताना होते. त्यावेळी सन्मा. सदस्य पाटील यांना हे सुध्दा आठवत नसेल की, आम्ही भाजपने या करवाढीला कडाडून विरोध केला होता. आतापर्यंत त्यांचे वेगवेगळ्या तऱ्हेने आणखीन कर वाढविलेले आहेत त्यांचे वेगवेगळ्या तऱ्हेने आणखीन कर वाढविलेले आहेत त्यामुळे लोकांचे या करापायी कंबरडे मोडलेले आहे. तर या करवाढीला आमचा कडाडून विरोध होता. हेसुध्दा त्यांना आठवत असेल आम्ही या करवाढीला विरोध केलेला होता आमची अशी मागणी होती की प्रशासनामध्ये तुमच्यात काहीतरी काटकसर करा. आणि ही जी तुट आहे याच्यामध्ये ती भरुन काढा अशी आमची मागणी होती.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य जोजेफ घोन्सालवीस आपण जे बोललात ते बरोबर आहे. नंतर आपण सर्व सदस्यांनी या ठिकाणी विचार विनीमय केला आणि एम.आर.पी. आपण जे दर दिलेले आहे. त्या दरावर आपल्याला कंपनीला हा दर लागू होईल. अशा पध्दतीचे आपण डिस्कशन केले आणि त्याच्यावर आपण सर्व मान्यता देउन केले फक्त सन्मा. सदस्य शरद पाटीलजींच्या हा मुद्दा लक्षात आला नव्हता. त्याची ही टिपणी दिल्यानंतर हे दर दाखविल्यानंतर लक्षात आलेले आहे कृपया याच्यावर आपण चर्चा केलेली आहे म्हणून पुढे चर्चा होउ नये अशी मी सन्मा. सदस्यांना विनंती करतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो आता सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी उल्लेख केलेला आहे आणि आयुक्त साहेबांनी पण टिपणी देताना तसा उल्लेख केलेला आहे उल्हासनगर, कल्याण, मुंबई महापालिकेने जकात कराचे दर आपल्या दरापेक्षा जास्त आहेत. जकात कर संबंधी अनेक वस्तूच्या जकातीचा भार कंपनी सोसत आहे थेट कंपन्यामार्फत जकात भरणा करण्यात येत असल्याने त्याचा बोजा ग्राहकांवर पडत नाही. मा. महापौर मॅडम आयुक्त साहेबांनी जी टिपणी दिली त्यामध्ये ज्या कंपन्याकडून ज्या प्रोडक्टमध्ये एम.आर.पी. इन्क्ल्युसिव्ह अशा कंपन्यांच्या दरामध्ये दोन ते तीन टक्के किंवा चार टक्के वाढ आयुक्तसाहेबांनी सुचविली होती जेव्हा हा विषय स्थायी समितीमध्ये आला आणि आताही सन्मा. नगरसेवकांना असाच उल्लेख केला की ज्या एम.आर.पी. मध्ये इन्क्ल्युसिव्ह टॅक्सेस आहेत त्यामुळे कंपनी सुचवित आहेत. अशा अनेक वस्तु या शहरामध्ये येतात. ज्या छोटया उदयोजकांकडून करण्यात येते आज अगरबत्तीचे हयामध्ये लिहीलेले आहे. आज अगरबत्ती एका एका घरामध्ये लोक उदयोग करतात आणि ते विकतात. आज याच्यामध्ये वाढीव केल्यानंतर त्यामध्ये एम.आर.पी. नाही आहे आणि त्यावेळी हा ऑक्ट्रॉय त्याच्यावर काय आकारणार आहे? एम.आर.पी. हा कंपनीचा नाही आहे. मग अशा लोकांना जे या शहरामध्ये छोटे उदयोजक आहेत किंवा जे बाहेरुन आणतात. घरामध्ये उदयोग करतात. अशाना कुठले क्रेडिट लागू होणार आहे ज्याच्यामध्ये एम.आर.पी. इन्क्ल्युसिव्ह नाही आहे. कंपनी स्टोव्ह बनवितात. आणि या झोपडपटटीवाले किती गॅस आला तरी काही कामासाठी स्टोव्ह वापरतात मग एकदा स्टोव्ह आणला त्याच्यावर एम.आर.पी. एन्क्ल्युझिव्ह नसले तर आपण काय करणार? आज कुलूूप किल्ल्या टाळयाशिवाय घर बंद होत नाही आणि घर बंद झाले नाही तर चोरी होते छोटे छोटे उदयोजक टाळ बनवितात आणि ते बनवून विकतात. त्याच्यावर एम.आर.पी असत नाही अशा वस्तुना आपण कुठल्या आधाराने त्याला ऑक्ट्रॉय आकारणार आहात त्याचा यामध्ये क्लेरिफिकेशन झालेले नाही आहे. मा. महापौर मॅडम मी प्रश्न विचारला आहे त्याचा जरा खुलासा झाला तर बरे होईल.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

सन्मा. महापौर महोदयांच्या वतीने बोलतो, गेल्या स्थायी समितीच्या सभेत ठराव क्र. २०९ हा मंजूर झाला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम,मी एक गोष्ट या ठिकाणी सांगतो, तुम्ही पुन्हा पुन्हा ठराव क्र. हा हा आणि ठराव मंजूर झाला. आहे असे असेल तर या सभागृहामध्ये

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

मंजुर झालेला नाही स्थायी समितीने शिफारस केलेला आहे त्यावर महासभेला विचार करायचा आहे. महासभा त्यावर विचार करण्याकरिता सक्षम आहे. आणि त्यामध्ये महासभेने तुम्हाला काय सजेशन देण्याचे निश्चितपणे अधिकार महासभेलासुध्दा आहेत. एम.आर.पी. प्राईज निश्चित करतांना ग्राहक संरक्षण कायद्यानुसार प्रत्येक वस्तूची एम.आर.पी. प्राईज निर्धारित केली जाते आणि ती किंमत निर्धारित केल्यानंतर आपण सर्व व्यक्ती कोणी किती मोठा व्यापारी जरी असला कोणीही असला तो

शेवटी ग्राहकच आहे. तो बाजारात गेल्यानंतर त्या वस्तूच्या निर्धारित किंमतीपेक्षा कोणीही व्यापारी कमी किमतीत आपली वस्तू विकत नाही. सौद्याची किंमत या कन्झ्युमर प्रोटेक्शन ॲक्टनुसार निर्धारित किंमतीनुसार जकात आकारणी मा. आयुक्त यांनी प्रस्तावित केली होती. कारण की अर्थसंकल्प सादर करताना जमा आणि खर्च या दोन्ही बाजूचा त्यांनी सांगोपांग विचार केला . स्थायी समितीवर सुध्दा सर्व सदस्यांनी अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात मला वाटते सर्वांनी सहकार्य केले. त्यामध्ये सर्वानी सहकार्य करुन सांगोपांग विचार दोन तीन दिवस सतत करुन हा अर्थसंकल्प महासभेपुढे सादर केला आहे आणि त्यावर जी यांच्यामध्ये अधिक प्रस्तावित चर्चा आहे ती चर्चा करुन आपण यावर निर्णय घ्यावा. धन्यवाद.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महापौर मॅडम जे साहेबांनी सांगितले ते खरे आहे. मी अजूनही तुम्हाला सांगतो आज आपल्या महानगरपालिकेच्या ऑक्ट्रॉय नाक्यावर व्यापाऱ्यांनी १०० टक्के खरे बिल उपस्थित केले. अशी अनेक उदाहरणे आपल्याकडे आहेत नसेल तर मी तुम्हाला देतो त्याच्यावरही त्या महापालिका ऑक्ट्रॉय ठेकेदारांनी हा एम.आर.पी.रेट तुमचा बरोबर नाही आणि त्याचे सर्व माल जप्त केलेले आहेत अशी अनेक उदाहरणे आहेत काल मी स्वतः जकात अधिकारी अजित पाटीलांकडे एक विषय घेउन गेलो होतो त्यांच्याकडे सर्व कंपनीचे डॉक्युमेंटस आहेत. पण तो सांगतो हा रेट नाही आहे हा रेट आहे मग शेवटी जे छोटे उदयोजक आहेत जे घरी उदयोग करुन अगरबत्त्या, मेणबत्त्या, किंवा टाळे किल्ल्या बनवतात. त्यांच्यावर तो कायदेशीर कारवाई काय करणार? त्यांच्यावर एम.आर.पी. नाही आहे काही नाही हा भुर्दंड शेवटी या शहरातील नागरिकांना सोसावा लागणार आहे एकतर या शहरामध्ये तुम्ही असा उल्लेख करा. ज्या कंपनीचा प्रोडक्ट ज्यामध्ये एम.आर.पी. रेट इन्क्ल्युसिव्ह ऑल टॅक्सेस असा नमुद केलेला आहे त्या टॅक्सला फक्त हा रेट आकारला जाईल अन्य ज्या प्रोडक्टवर एम.आर.पी. इन्क्ल्युसिव्ह टॅक्स नसेल त्या पध्दतीने तुम्ही त्याचा उल्लेख करा. उद्या अशी कोणती एम.आर.पी. वस्तू आली अजूनही तुम्हाला सांगतो असे अनेक प्रोडक्ट आहेत ज्याच्यामध्ये अजून एम.आर.पी. आलेले नाही आहे. आज मेडिसीन आहे. मेडिसीनमध्ये ५० टक्के मेडिसिनवर एम.आर.पी. आलेले नाही आहे एक उदाहरण तुम्हाला सांगतो अनेक अशा प्लॅस्टिकच्या वस्तू आहेत ज्यामध्ये एम.आर.पी. आलेले नाही आहे सायकल आहे ॲटलस कंपनीची एखादी सायकल असेल त्यावर एम.आर.पी. आले असेल पण भाईंदर ईस्टमध्ये अनेक उदयोजक आहेत ते सायकल बनवितात. त्याच्यामध्ये एम.आर.पी. नाही आहे अशा उदयोजकांना तुम्ही कुठला ऑक्ट्रॉय लावणार. दोन टक्के तीन टक्के कुठली लावणार? एकतर या ठरावामध्ये क्लिअर सांगा. ज्या कंपन्यांच्या बिलमध्ये एम.आर.पी. ॲक्ट म्हणजे रेट इन्क्ल्युसिव्ह ऑल टॅक्सेस आहे. यांनाच लागू होणार. अन्य ज्या वस्तू त्या एम.आर.पी. ॲक्ट नाही आहे. त्यामध्ये त्यावेळी प्रशासनाने निर्णय घ्यायचा आहे. एकतर तुम्ही कायदे दाखवा. थ्रु एम.आर.पी. इन्क्ल्युझिव्ह टॅक्सेस विकत नाही या कायद्यामुळे तो कायदा मोडतो आहे त्याच्यावर गुन्हा दाखल करा. असे असेल तर पण दोन दर करायला पाहिले हयाच्यात ही गोष्ट क्लिअर झालेली नाही म्हणून आमची विनंती आहे म्हणून जे तुम्ही वाढीव केलेली आहे आजही अनेक वर्तमानपत्रामध्ये अनेक टी.व्ही. चॅनेलमध्ये असा उल्लेख करतात. महापालिकेने चांगला अर्थसंकल्प सादर केलेला आहे कुठली दरवाढ केलेली नाही मग ही दरवाढ कुठली आहे. ही दरवाढ नाही तर काय आहे? प्रशासनाने याच्यावर गंभीरपणे विचार करावा. कारण या भाईंदर शहराच्या नागरिकांना हा भुर्दंड भोगावा लागणार आहे आपण हाउस टॅक्समध्ये वाढविले अजून पाणी मध्ये आपल्याला माहिती आहे जे आपले एम.एम.आर.डी.ए.कडून करार झालेले आहे. त्यानूसार भाईंदर पाणीपटटी आपल्या पुढच्या काळामध्ये काय वाढीव करावे लागेल हे आपल्याला जाणीव आहे. म्हणून या अर्थसंकल्पामध्ये आपण ८.४० कोटीची वाढ आपण केलेली आहे म्हणून एम.आर.पी इन्क्ल्युझिव्ह टॅक्स अतिरिक्त जे प्रोडक्ट असेल त्याच्यावर रेट नसेल एक तर याचे आपण याच्यात क्लेरिफिकेशन करावे नाहीतर आमचे वाढीव आहे याला भारतीय जनता पक्षाचा विरोध आहे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी यांनी या ठिकाणी सुचना मांडली यापूर्वी सन्मा. सदस्य शरद पाटीलजी यांनी ५३ (अ) आणि (ब) याच्यावर चर्चा केली त्यांच्यामध्ये त्यांना मूळ प्रत दाखविल्यानंतर त्यांचे या ठिकाणी समाधान झाले आणि अंदाजपत्रकामध्ये जी आपण जकातीवर एम.आर.पी. आणि अन्य बाबी याच्यावर आपण जी वाढ दाखविलेली आहे सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी यांनी मघाशी बोलल्याप्रमाणे की सर्वच एम.आर.पी मध्ये सुट आहे की एम.आर.पी .लोकल टॅक्स एक्स्ट्रा आहेत. ते सर्वच आयटम आहेत असे नाही आहे. त्याच्यामध्ये काही थोडेफार आयटम आहेत ते आपण घेतलेले आहेत आणि सन्मा. सभापती मॉरस रॉड्रिक्सजी यांच्या

अध्यक्षतेखाली झालेल्या सभेमध्ये सर्व घटकपक्षांनी अतिशय खेळीमेळीच्या वातावरणामध्ये आणि विस्तृत चर्चा करुन प्रत्येक हेडवर चर्चा केली आणि हेडवर चर्चा करुन त्यांचे परिणाम दुष्परिणाम दोन्ही बाबींवर आपण चर्चा केलेली आहे. या ठिकाणी सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल उपस्थित नाही आहेत. अतिशय व्यापाऱ्यांच्याबाबत अभ्यासू असलेले आपले सदस्य आहेत. मागच्यावेळीसुध्दा त्यांनी या अर्थसंकल्पामध्ये चांगले सहकार्य केले यावेळी सन्मा. सदस्य आमचे जनता दलाचे मित्रवर्य म्हात्रेजी यांच्याकडूनही चांगले सहकार्य मिळाले. सन्मा. सदस्य अनंत पाटील शिवसेनेच्यावतीने होते. त्यांचेही चांगले सहकार्य मिळाले. बी.जे.पी.कडून चांगले सहकार्य मिळाले आणि त्याच्यावर चर्चा करुन आज आपल्यासमोर अंतिमरित्या महासभेपुढे हा बजेट या ठिकाणी आणलेला आहे. काही अंशी आपल्याला वाटते काही वाढ पाहिजे काही वाढ पाहिजे नाही असे आपल्याला वाटते प्रशासनाने शिक्षण करावर आणि अग्निशमक दल करावर वाढ सुचविली होती परंतु सन्मा. सदस्य स्थायी समितीचे यांनी कोणतीही वाढ नसलेला अर्थसंकल्प आम्हाला पाहिजे आणि अतिरिक्त बोजा आम्हाला या नागरिकांवर द्यायचा नाही. या हेतूने सर्व सन्मा. सदस्यांनी विनंती केली चर्चा केली सुचना मांडल्या आणि निर्णय घेतला प्रशासनाने यावर अतिशय आग्रह धरला होता की, आपण असे करायला पाहिजे परंतु आम्हाला कोणतीही करवाढ नको आहे. या पध्दतीने सन्मा. सदस्यांनी अतिशय खेळीमेळीच्या वातावरणामध्ये या अर्थसंकल्पावर चर्चा केली. सन्मा. सदस्य या ठिकाणी या चर्चेमध्ये होते म्हणून आम्हाला हे बोलायचे नाही आहे की, जे सदस्य होते त्या सदस्यांनी चर्चा केली म्हणून ती फायनल झाली. प्रत्येक सन्मा. सदस्याला या सभागृहामध्ये, या महासभेपुढे बोलण्याचा अधिकार आहे. त्यांनी या सुचना मांडल्या पाहिजेत. आपण आपल्या पक्षाच्या वतीने जे प्रतिनिधी आपल्याबरोबर होते. जनता दलाचे प्रतिनिधी बरोबर होते शिवसेनेचे प्रतिनिधी बरोबर होते कॉँग्रेसचे प्रतिनिधी त्या ठिकाणी होते. आज सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल या ठिकाणी नसल्या कारणाने हा विषय या ठिकाणी पुन्हा चर्चेला आला आहे म्हणून कोणतेही कर आपण बीजेपी पक्षाने वाढविली किंवा अन्य कोणत्याही पक्षाने कमी केली हा भाग या ठिकाणी नाही आहे. आपण ज्या पध्दतीने आपल्या पक्षाच्या प्रतिनिधींनी त्या ठिकाणी सहकार्य केले होते. तसे सहकार्य या ठिकाणी अपेक्षित मी करित आहे कारण चर्चा होणे फार जरुरी आहे या ठिकाणी १०० टक्के जकात ठेकेदारांकडून त्रास दिला जातो. हाही विषय आहे याच्यावर आपण कोणती उपाययोजना केली पाहिजे तेही केले पाहिजे संपूर्णपणे खोटी बिले संपूर्णपणे खरी बिले हा वाद पालिकेमध्ये आपल्याकडे आलेला आहे आणि त्याकरिता मी सन्मा. सदस्यांना विनंती करतो सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांना की, यावर चर्चा झालेली आहे कृपया चर्चा झाल्याप्रमाणेच आपण केलेले आहे. आम्ही कोणाच्या माथी मारतो हा विषय नाही आहे. विकासाचे काम करित असताना प्रत्येक कामामध्ये प्रत्येक सदस्याचे श्रेय आहे असे मी सांगू इच्छितो आणि चर्चा झालेल्या विषयावर पुन्हा चर्चा नसावी अशी मी सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल याना मी विनंती करतो आणि आपण आज ही दरवाढ सुचविलेली आहे ती सर्व सन्मा सदस्यानी विचारात घेउन सुचविलेली आहे एवढे सांगून मी माझे समर्थपणे बोलले आहे असे नाही आहे. परंतु आपणही या याचा विचार करावा अशी मी विनंती करतो धन्यवाद.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम मिरा भाईंदर शहर असो किंवा कुठलेही शहर असू द्या. पहिले मा. मॉरस रॉड्रिक्स साहेब स्थायी समितीचे अध्यक्ष मी त्यांचे अभिनंदन व्यक्त करते की, त्यांनी आपल्याकडे चांगले आणि उत्कृष्ट बजेट सादर केलेले आहे. परंतु जकात हा विषय मी स्थायी समितीच्या अध्यक्षांकडे महापौरांकडे पण मी आणला होता आता तो विषय नाही आहे. कारण आज आपल्याला फक्त बजेट पास करायचे आपल्याला जकात लावायचे की नाही लावायचे. आपण गेल्या वेळी जकात लावले आहे आणि आताही आपण जकात लावणार आहे मागच्यावेळी माझा जकातला विरोध होता आजही माझा जकातला विरोध आहे पण शेवटी सभागृहामध्ये मेजॉरिटीने काम होते आणि माझा एकटीचा विरोध असून काही फायदा नाही तरी पण माझा जकात लावायला विरोध आहे कारण जकातवर आपण जो अग्रवाल नावाचा ठेकेदार ठेवलेला आहे. ते एका महिला नगरसेविकेचा फोन गेल्यानंतर तो मला असा जवाब देतो की मॅडम आप पुरे शहरमे बोलते है की अग्रवाल गुंडागर्दी करता है। तो मै आपको देख लुंगा। आज यहॉ ८४ नगरसेवक बैठे है। उनमे महापौर भी है, प्रशासन भी है। हर किसीको मालुम है की, दस गुना से ज्यादा व्यापारीयोको वो पेनल्टी लगाता था। तो वो पेनल्टी का पैसा कौनसे खाते मे जमा किया गया। इस बजेट की कॉपी मे कही भी पेनल्टी का एक रुपया जमा किया हुआ नही बताया गया नही है। जबकी लाखो रुपये पेनल्टी के हिसाबसे जमा किये गये है। और इस प्रकार के केस केलकर साहब के पास हम लेके गये है। दस गुना वो कौनसे हिसाबसे टॅक्स वसुल करता था। ठेकेदार को टॅक्स वसुल करने का अधिकार है क्या? प्रशासनने अगर टॅक्स वसुल किया है तो वह

कौनसे खाते मे जमा किया है। और कितनी राशी उसकी जमा हुइ है। और बजेट के कॉपी मे उसका क्यु उल्लेख नही किया गया। ये बजेट मुझे ऐसा लगता है उत्कृष्ट है। लेकिन एक कॉलम उसके अंदर रह गया है तो उसकी जानकारी कृपया सभागृह को दे।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महापौर मॅडम, आताच सन्मा. नगरसेवक मोहन पाटील बताया। स्थायी समिती मे साधकबाधक चर्चा हुई। हमारे सहयोगी सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल जी व्यापारियों के हित के बारे मे सोचते है। उन्होने अच्छे विषय रखे। लेकिन हर बात हर व्यक्ती को सुझ आती है। ऐसे नही है। आज सभागृह मे आयुक्त साहब नही है। एक बजेट के मिटींग मे इतना महत्व का जो विषय है। जो पुरे मिरा भाईंदर महापालिका के विकास का एक मुळ अंग यहा पे प्रस्तावित कर रहे है। महापौर मॅडम जैसा की ये बजेट दिया है। इस बजेट मे बहुत त्रुटियाँ है। जो अभी तक चर्चा मे आयेंगी। हम ये नही कहते है ये बजेट एकदम खराब है। एकदम अच्छा है। लेकिन जो त्रुटियॉ इस मे रह गइ है। इसका मतलब नही अगर हमारे वहॉ पर भी सन्मा. नगरसेवक उपस्थित है। इसका मतलब सही है। हर एक की अपनी अपनी बुध्दी होती है। बुध्दि के विकास के उसमे अपना विषय रखता है। आज आयुक्त साहब यहाँपर नही है। इतने बडे १७१ करोड का बजेट इस महापालिकामे पेश हो रहा है। और हमारे आयुक्त साहब नही है। विषय ऐसा ज्वलंत होगा की, जिन्हे जाना पडा होगा। लेकिन ऐसे महत्व के विषय मे मुझे लगता है। अन्य विषय बाजु मे रखकर आज वो इधर रहते। तो उन्होने जो टिपणी दि है। उसमे क्लिअर ये लिखा है जो कंपनी तीन टक्का ऑक्ट्रॉय मुंबई महापालिका या उल्हासनगर महापालिका या ठाणे महानगरपालिका मे भरती है। इसलिए ये दरवाढ हमने की है। लेकिन मैने ऐसे बताया की और भी ऐसे प्रोडक्ट है। जहाँपर एम.आर.पी. कंपनी नही भरती है। और वोही चीज है। साबण साबणही है ताला ताला ही है। तो आप उस समय उसका क्लेरिफिकेशन किस तरहसे करेंगे। आज जिस तरहसे अभी हमारी सन्मा. नगरसेविकाने बताया ठेकेदार की दादागिरी। उस समय ये बोजा अगर आज बोलते है कंपनी पे पडेगा। कंपनी पे नही। ये आम नागरिकोंके उपर पडेगा। और आज अनेक मुददे मै अभी तक बजेट मे बोलना बाकी है। खाली ये जकात विषय पे मै बोल रहा हुँ। अभी अभी आप इसका या आयुक्त साहब के माध्यमसे कल्याण केलकरजी साहब आप यहाँ सीटपर बैठे है। जो टिपणी आयुक्त साहबने दी है की, कंपनी का जिन का एम.आर.पी. इन्क्ल्युसिव्ह जो है। ऐसे मे हमने करवाढी करके और छहः कोटी की उत्पन्न आपने दिखाई। बहुत अच्छा विषय है। लेकिन जो अन्य छोटे उदयोजक है। उनके लिए आप क्या करोंगे? इस शहर के लिए उनका एम.आर.पी. नही है। उनके उपर क्या रेट लगा जायेगा। जिन पे एम.आर.पी. नही है या छोटे उदयोजक है जिनको ये एम.आर.पी. टॅक्स लागू होता नही। उनके लिए आप क्या करेंगे? इसके बारे मे क्लेरिफिकेशन हो जाए।

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो की, सन्मा. सदस्य ओमप्रकाशजी यांनी जकात करात महापालिकेने अर्थसंकल्पात जी प्रस्तावित वाढ सुचविलेली आहे ती फार नागरिकांना असहय होणारी आहे आणि त्यांनी या शहरातील नागरिकांना हे बजेट आवडेल असा सुध्दा अर्थ व्यक्त केलेला आहे. कल्याण केळकरसाहेब आपण या सभेचे ऑफीशिट करित असताना सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनी व्यक्त केले की, मा. आयुक्त या ठिकाणी असायलाच पाहिजे होते आणि त्यांनी त्याचे उत्तर पण दिले की, काही महत्वाच्या कामासाठी ते गेले असतील. त्या दोन्ही गोष्टी खऱ्या आहेत म्हणून केळकर साहेब आपण उत्तर देताना मला जरा या सभागृहाच्या माहितीसाठी असे दाखवा की हे बजेट किंवा ही जी प्रस्तावित जकात वाढ ही या शहराच्या आजुबाजुला आणखी चार पाच महानगरपालिका कार्यरत आहेत. कल्याण डोंबिवली आहे, ठाणे महानगरपालिका आहे, नवी मुंबई आहे, मुंबई आहे. एकंदरित तेथील शहरी जीवन आणि मिरा भाईंदरचे शहरी जीवन ह्याची तुलना करुन मला उलट असे वाटते की, ही महापालिका एवढी लोकाभिमुख होती की, गेल्या दहा वर्षामध्ये पाणीपट्टी सारखे रेट वाढवले नव्हते. तोट्यामध्ये आपण हे सगळे करित होतो. आजच्या घडीलासुध्दा आपल्या या महापालिकेमध्ये त्रुटी च्या गोष्टी किती आहेत माझ्याकडे ती माहिती आहे पाणी पुरवठ्यामध्ये ९ कोटी ५७ लक्ष रुपये एक ती तुट आहे, २ कोटी ४६ लक्ष रुपये आरोग्य विभागामध्ये, ९ कोटी १ लक्ष ७४ हजार रूपये तुट आहे सार्वजनिक दिवाबत्ती मध्ये, ३ कोटी २७ लाख ९५ हजारएवढी तुट आहे आणि अशा प्रकारे या त्रुटीची तोंडमिळणवी करित असताना महापालिकेचे उत्पन्न वाढविणे आवश्यक होणार आहे आणि त्यासाठी जकात हे एक आपण माध्यम म्हणून वापरतो आहे. तर मला आपण जरा एक खुलासा जकात विभाग आणि टॅक्स विभागाने द्यावा की, इतर शहराच्या मानाने आपले

जकात कर आणि जकातीचे दर कशा स्वरूपाचे आहेत तो जर खुलासा दिला तर मला वाटते आमच्या सभागृहाला विशेषतः सत्ताधारी पक्षालासुध्दा या बजेटचे समर्थन करताना अधिक शक्ती येईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आता जेव्हा आमच्या सन्मा. नगरसेवक शरद पाटील यांनी उपस्थित केला साहेब आता तुम्ही ५३ ब मध्ये चाकू, सुरे, चमचे, म्हणजे ती वस्तू आपण घेतली आता चमचे भाईंदर पश्चिमच्या इंडस्ट्रीमध्ये हजारो कंपन्या आहेत. जे चमचे बनवितात. आज त्यांच्यावर ऑक्ट्रॉय किती लावणार? ज्याच्यावर एम.आर.पी. नसते. आपण त्याच्यामध्ये वाढ केलेली आहे आणि इकडचे जे नागरिक आहेत, साहेब हसण्यावर नेउ नका आपण हसमुख आहात म्हणून आपण हसत रहा असे माझे म्हणणे आहे. पण जी गंभीर बाब आहे आज ज्या पध्दतीने नाक्यावर जी ऑक्ट्रॉय ऑफिसरकडून दादागिरी केली जाते. हा नमुना त्यानंतर आपल्याला कळणार आहे. आज तुम्हाला याचे गांभीर्य कळत नाही. जेव्हा एम.आर.पी.चे बिल येते कंपनीचे बिल येते तरी तो दादागिरी करतो. मग अशा वस्तूवर तो किती दादागिरी करणार आहे? याचा जरा आपण विचार करावा.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

काल आपल्या सर्व पक्षांच्या गटनेत्यांची बैठक घेउन आम्ही विचार केलेला की आजच्या सभेमध्ये सर्व पक्षनेत्यांना १५ मिनीटे त्यांच्यापक्षातील एकाने बोलावे किंवा दोघांनी बोलावे तर त्या लोकांनी तसा विचार करावा आणि तेवढेच बोलावे आणि त्यांच्यानंतर आपल्याला काय निर्णय घ्यायचा तो मी शेवटी सांगणार काय निर्णय घेतो. याच्यावर आपण जास्त वेळ घालवू नये. महापौर मग आपल्याला बसायला सांगतील तर आपला अपमान होईल याची आपण दखल घ्यावी.

**रिटा शाह :-**

मा. सभापतीसाहेब आता आपण डिक्लेअर केले की गटनेत्यांनी मिटींग केली गटनेते १५ मिनीटे बोलणार तर बाकी नगरसेवकांना बसण्याची काय गरज आहे. मग आम्ही निघून जातो. गटनेते आणि तुम्ही मिळून करुन घ्या. साहेब हे चुकीचे आहे हा लोकशाही देश आहे. गटनेता पक्षासाठी असतो. सभागृहासाठी नसतो.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

इथे सर्वांना बोलायचे आहे मग बोलू दया मघाशी मी सांगितले पक्षनेत्यांनी बोलायचे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय असे ठरले होते की प्रत्येक पक्षाला ठराविक वेळ द्या. गटनेत्याला नाही चुकून आपल्याकडून असे बाहेर पडले.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

काल गटनेत्यांची बैठक बोलाविली होती.

**मिलन म्हात्रे :-**

आपण असे ठरवले आहे प्रत्येक पक्षाला १० मिनिटे दयायची हे आपल्या सभेत महापौरांच्या संमतीने ठरले.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आजचे वातावरण बघून १५ मिनीटे ठरले.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही १५ मिनीटे द्यावी.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब बोलतात १७१ करोडचा बजेट आपल्याला पास करायचा आहे संपूर्ण शहराचा प्रश्न आहे आणि १० मिनीटात करायचा आहे. मग १० मिनीटात सर्व उरकून घ्या. कशाला वादविवाद आणि चर्चा करण्याची गरज आहे. मी एक साधा प्रश्न विचारला पेनल्टीचे पैसे कुठल्या खात्यात जमा केले? त्याचा जबाब देत नाही आणि आपण १० मिनिटाचा प्रश्न काढतात. १० मिनिटात आम्हाला बजेट पास करायचा आम्ही करुन देतो.

**महेंद्रसिंग चौहान :-**

मा. महापौर महोदय एवं स्थायी समिती के चेअरमेन जिन्होने आज बजेट प्रस्तुत किया है। बजेट हर वर्ष की बाद पिछले वर्ष की अपेक्षा है। २१ करोड अधिक का बजेट है। बजेट मे अपनी एक स्थिरता है। मै सिर्फ पक्ष की तरफसे आपको पाच मिनीट बोलूंगा। कुछ सजेशन है। अभी मा. सभापती महोदयने कहा की, स्टँडिंग कमिटीने इस बजेट को बनाया। आपने सभी को मौका दिया। उसके बाद गटनेताओ को मौका दिया। उसके बाद ये आमसभा है। आमसभा मे अगर कही पर भी हम लोगो की कही त्रुटी लगती है। कोई सजेशन है। वो सजेशन मान्य करना चाहिए। इसके लिए

हम लोग क्रमवत रुपसे बजेट के बारे मे चर्चा करते है। जो आपने कहा की गटनेताही बोल सकते है। गटनेताओ को हम लोगो के भावनाओ की कदर नही रहती। कही कही वो नही समज पाते। कही उनका पब्लिक का डायरेक्ट संबंध नही है। इस तरह के गटनेता भी होते है। आज ये बजेट हम लोगोके समक्ष है। बजेट अपने आप मे स्थिर बजेट है। १८२ करोड जो पिछले वर्ष से २१ करोड अधिक का बजेट है। बजेट मे डायरेक्ट टॅक्सेस कही भी किसी भी तरह से नही लगाये गये है। एक जो साधन शहर को विकास करना है तो पैसे की भी जरुरत है। हमारे पास जकात एक इस तरह का प्रयोजन है। जिसके द्वारा पैसा आ सकता है। लेकिन इसमे भी जकात मे सीधा लिखा गया है की इस तरह का बढाने का जो बोजा है वो ग्राहकोपर नही पडेगा। इसका मतलब जो डायरेक्ट बडी-बडी पार्टीयाँ है उनके रेट के उपर या टॅक्स लगा है। ये भी एक खुशी की बात है। हम नगरसेवकोको बताना चाहिए। हमारी जो ग्रिव्हेंसेस है वो कॉन्ट्रॅक्टर की है। वो एक अलग है। एक सेल यहाँ पे कंप्लेट करने का बनाया हुआ है। जो एक हम लोगो की व्यथा है। मा. महापौर महोदय कॉन्ट्रक्टर अगर एम.आर.पी. रेट नही मानता है। तो यह बहुत बडी गलती है। इसको कम से कम आपको स्ट्रीक्ट होकर जो अधिकारी यहाँपर है उनको बताना चाहिए। एम.आर.पी. रेट न मानने का उसका कौनसा हक्क है। कौनसे कानून मे बैठता है की, एम.आर.पी. रेट नही मानता और एम.आर.पी. रेट न मानके अपने हिसाब से रेट लगाके १० टक्का अगर वो दंड लेता है। तो ये बिलकुल सरासर गलत है। मै उसके पक्ष मे नही हूँ। दुसरा शहरमे जो आपने बजेट स्थायी समितीने जिस तरहसे ये सबजेक्ट रखा। उसमे जरुर कुछ ऐसे आयटम्स है। जो साधारण पब्लिक को टच करते है। ठिक है बहुतसी ऐसी वस्तु है। सिगारेट, तम्बाकू वगैरे जो डायरेक्ट या इनडायरेक्ट आप कितना भी टॅक्स बढाइये। सेंट्रल गव्हर्नमेंट का बढता है। राज्य सरकार का बढता है। आपकी नगरपालिका का बढता है। तो कम से कम आपके स्वास्थ पे कही ना कही तो फरक पडेगा। लेकिन जो चीज जिनका अभी उल्लेख किया गया ५३ आयटम का। ५३ आयटम मे अ और ब अगर आमसभा मे ये बजेट रखा है तो मेरी एक शिफारस जरुर है की, सारे आयटम्स ऐसे है जो हमको सुबह से श्याम तक लगते है। अभी हमारे दोस्त सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजीने कहा की चमचे। चमचे जो भाईंदरमे तयार होते है। उनके उपर टॅक्स लगाने का या जो सुगंधी रसायन, दाढी का साबण, दंतमंजन ये हम लोगो को सुबह से श्याम तक। ये एम.आर.पी. रेट भी होगा। फिर भी यहाँ के दुकानवाले है। वो रेट बढा देंगे। मेरा आपसे एक निवेदन है की, ५३ अ और ब को पुरी तरहसे इसको सोचा जाये। और इसमे जो बाढ दो का तीन वो कॅन्सल करके ये आयटम निकाल दिया जाये। तो मुझे लगता है। मेरी ये शिफारस कही गलत नही है। दुसरा आपके पास आपके समक्ष ९२-९३ का जो बजेट था। जो २००२-०३ का था। जिसमे बहुत बडी तुट थी। तुट को हम लोगोने २००३-०४ मे बहुत करीब मेक-अप किया। मेक-अप करने बाद आज जैसे मैने कहा ये बजेट मे स्थिरता है। स्थिरता आने का मतलब २००४-०५ मे मुझे लगता है २००२-०३ की जो तुट है। वो करिब मेक-अप हो जायेगी। पानी मे जो हम लोग काफी सालोंसे बढा हुआ पैसा ९६ से नही ले रहे थे। और जादा पैसा भर रहे थे। वह धीरे धीरे बराबर होता जा रहा है। इसके पुरे बजेट मे एक आयटम मे जो मेरी एक डिमान्ड काफी सालोसे थी की नगरभवन मे आप लिफ्ट लगाने का दस साल का प्रोव्हिजन किया है। दस साल का प्रोव्हिजन बहुत कम है। एक लिफ्ट नगरभवन मे। जो नगरभवन आपने चार या पाच करोड की लागत का बनाया है। वो भी अभी शहर मे सबसे कम भाव का चलनेवाला शादी के लिए युज मे आता है। अगर उसमे लिफ्ट लग जायेगी तो हमारे जो प्रोग्रॅम है वो दरदिन, जो सिजन होगा उसमे होगा। जो दस लाख है। उसका प्रोव्हिजन २५ लाख करना मेरी आपसे शिफारस है। २००३ मे २००४ तक लगातार मेरा प्रयास था। उसमे लिफ्ट लग जाए। मुझे ऐसा लगता है की, काफी लोगो को जिनको हायपर टेन्शन है। सबको उस तरह की प्रॉब्लेम होती है उसमे जाते हुए। तो ये इस तरह की चीज है। अगर उसमे दस लाख का प्राव्हिजन किया है। २५ लाख का प्रोव्हिजन करके वीथ इन ए मन्थ ऑर टु अगर ये लिफ्ट लगा दि जाए तो आपका उसमे डायरेक्ट टॅक्स बढेगा। आपकी डायरेक्ट आवक होगी। दुसरी वृक्षप्राधिकरण मे आपने १ करोड ७५ लाख रुपये जो रखा है। उसका सही युज होना चाहिए। अभी बहुतसे इस तरह के आयटम है। बांधकाम का जो पॅच वर्क था। उसमे ७ करोड रुपये आप हर साल का प्रोव्हिजन था। इस साल आपने देखा होगा। वो प्रोव्हिजन मे इस तरह का शहर मे जरुर बहुतसी जगहे ऐसी है जहाँ के पॅच अभी भी काम पुरा नही हुआ है। बहुतसे रोड पर हुए है। लेकिन बजेट मे जहॉ १७ रोडो का प्रोव्हिजन आपने दिखाया। मुझे लगता है अगर इसमे से आप १२ रोड भी अगर शुरुवात कर देंगे तो शहर मे जो बडा हुआ टॅक्स कही लग रहा है। जो स्ट्रेट टॅक्स है। यानी डायरेक्ट टॅक्स कही लगा नही है। शिक्षा कर मे कही भी पैसा अब जो बढाया वो डायरेक्ट नही जाता है। हाउस टॅक्स मे बढत है। हाउस टॅक्स का बढना जादा से

जादा आपकी वसुली पर डीपेन्ड है। जो आपके गलत तरिके की वसुली का सिस्टिम है उसको सुधारा जाये। आपके दस महिने मे आपने जो बजेट की हिसाब से जमा के हिसाब से जो पैसा आप जमा करते है। १० महिने मे आपका कम से कम २० टक्का आता है। और बाकी के दो महिने मे आपका ८० टक्का आता है। पब्लिक को बहुत बडा नुकसान बहुत बडी तकलीफ होती है। कृपा करके १२ महिने मे बाँटेंगे जो आपकी जमा राशी का। मुझे लगता है, दुसरे तिसरे महिने से शुरु करेंगे। उसीका अगर आपने कहा की जो पूरा कम्प्युटराईझेशन करना उसके लिए आपने जो बजेट मे प्रोव्हिजन रखा है। वो दो करोड का है। आज जब की हम सब लोग २०२० की तरफ देख रहे है की, हर नगरपालिका मे कम्प्युटर होके सही समय पे आपके बिल पहुँची। मुझे लगता है मिरा भाईंदर नगरपालिका इसमे कभी हम बात करते है तो जादा विरोध होता है। मेरी राय से दो करोड की जगह पाँच करोड प्रोव्हिजन रखके ये २००४-०५ मे आपका पुरा का पुरा बिल्स समय पे जाए तो जादा अच्छे रहेंगे। मेरे जादा सजेशन न हो की ऑक्ट्रॉय का सजेशन दो चीज है की, शिकायत है कॉन्ट्रॅक्टर की शिकायत है। वो प्रोव्हिजन है। सबने बहुमत से पास किया है। कॉन्ट्रॅक्टर के उपर दबाव के लिए यहाँ नगरपालिका का जो सेल है। जो अधिकारी है वा बराबर ध्यान दे। इस तरह की पब्लिक की शिकायत है। हम लोग डायरेक्ट इन डायरेक्ट सुबह से श्याम तक उसी तरह की शिकायतोसे ग्रसिन रहते है। मेरा निवेदन है की, आपका बढा हुआ टॅक्स इन डायरेक्ट है। उसे बढा हुआ टॅक्स इन डायरेक्ट है। उसे बढा के आप सुधार करके थोडासा आयटम है। इसमे पुरा सुधार करके ये आयटम अगर निकालेगा तो मै कहुँगा की हमारे जैसे लोग जो पब्लिक को डायरेक्ट टॅक्स न बढाने के अगेन्स्ट रहते है। उसमे ये सबसे बडा एक आपको यानी आपके लिए जादा बजेट के साथ मे प्रोत्साहन मिलेगा। शहर मे एक नइ बात होगी के ये आयटम ५३ (अ) और (ब) का है। जो सभी साधारण लोगो के युज मे है। ये बढत पुरी कॅन्सल की जाए। धन्यवाद.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम कोण किती मिनिट बोलले तो माझा प्रश्न नाही. १५ मिनीटे काय? महापौर मॅडमनी दोन तास बोलायला दिले तरी माझी हरकत नाही. मी फक्त एक साधा प्रश्न विचारला आहे. चव्हाण साहेबांनी सांगितले की, आज जकात वाढली आणि काय केले? तो विषय नाही आहे ते बोलले अधिकाऱ्यांनी बघायचे पण मॅडम आपले अधिकारी काय बोलतात? हमने तो यहाँसे लेटर दे दिया। हमने वापस माल देने का लेटर दे दिया। अभी वो हमारा सुनता नही तो हम क्या करे। ये अधिकारी ऐसे जवाब देते है। तो मुझे समझ मे नही आता है की, प्रशासन और शासन क्या कर रही है? ये जकात का मुद्दा आयेगा वो टाइम का मुद्दा है। आज तो बजेट का मुददा है। मैने साधा सवाल पुछा की, पेनल्टी का पैसा ठेकेदार अग्रवालने जमा किया लोगो से वसुला ८० लाख वो आपने कौनसे खाते मे जमा किया है।

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

सन्मा. महापौर महोदया, मा. आयुक्तांनी जो प्रस्ताव अर्थसंकल्पासोबत दिला. त्यामध्ये प्रामुख्याने जमा आणि खर्चाचा मेळ घालण्याचा दृष्टीने हा प्रस्ताव स्थायी समितीवर सादर केला आणि मी या पूर्वीही सांगितले की स्थायी समितीवर याचा जवळजवळ तीन-चार दिवस सांगोपांग चर्चा झाली आणि त्या चर्चेतून असे निष्पन्न झाले की, ज्या एम.आर.पी. प्राईज आहेत. एम.आर.पी. प्राईज ही प्रत्येक वस्तूची एम.आर.पी. प्राइज ही शासनाने कन्झ्युमर प्रोटेक्शन ॲक्टखाली निर्धारित केलेली किंमत आहे आणि त्या निर्धारित केलेल्या किंमतीवरच जी शंका सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांच्या मनामध्ये होती ज्या निर्धारित केलेल्या एम.आर.पी. प्राईज नुसार त्यावर स्थायी समितीने ठराव क्र. २०९ करताना त्यामध्ये स्पष्ट म्हटले आहे जकातीचा भार एम.आर.पी. नुसार मालाची विक्री होत असते. अशा उत्पादन करणाऱ्या कंम्नन्या जकातीचा भार संपूर्णतः सोसत आहेत आणि अशाचा याच्यावर आपण जकातीची आकारणी प्रस्तावित केलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझे तेच म्हणणे आहे की, एम.आर.पी. नाही आहे. भाईंदर ईस्टच्या अनेक फॅक्टऱ्यांमध्ये छोटे उद्योजक आहेत. चमचे बनवितात, टाळे बनवितात त्याच्यावर एम.आर.पी नाही आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

तो कच्चा माल मध्ये येणार.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बघा मी तुम्हाला उदाहरण देतो. भाईंदर बालाजी नगरमध्ये अगरबत्तीवाला आहे. पाहिजे तर मी त्याला सभागृहात उपस्थित करतो. त्यांनी मार्केटमधून अगरबत्ती आणलेली आहे. अगरबत्तीची प्रिंन्ट प्राईज आणि प्रिंन्ट प्राईज मध्ये बिल हे सादर केल्यानंतरही त्याच्यावर त्यांनी जबरदस्ती केली.

मी गेलो त्यांनी मान्य केले आणि सोडले. पण हा तसा विषय नाही आहे म्हणून या गोष्टींचा आता आमचे सन्मा. नगरसेवक महेंद्रसिंग चौहानने एक बात मेरा माना। मै धन्यवाद देता हूँ की, कुछ समज है। इसका मतलब।

**महेन्द्रसिंग चौहान :-**

मै फिरसे नगरसेवक को कहुँगा की आप अपनी ही बात करे। आपका ज्ञान अच्छा है। आप अपनीही बात करे।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

इसलिए मै बोलता हूँ। मै कभी गलत नही बोलता हूँ। मै कुछ सही बोलता हूँ। आज मेरे मुद्दे को बराबर पहचाना इसलिए मै धन्यवाद देता हुँ। सन्मा. सदस्य महेन्द्रसिंग चौहानने बराबर पहचाना। और उन्होने उसके लिए शिफारस की है। ये एक सभागृह की अच्छी पध्दत है। मै कोई उनका क्रिटीसाइज नही कर रहा हूँ। लेकिन कभी कभी कुछ मुदेद जैसे हमारे कल्याणजी केळकर बार बार कह रहे है। स्थायी समिती मे चर्चा हुई। ऐसी हुई। लेकिन कुछ मुद्दे है जो स्थायी समिती मे जो वाद हुआ था। कल्याण केळकर साहब आप पर जो शब्द वापरा गया था। उसी टाइम ये बजेट की मिटींग तीन घंटे तक तहकुब की गई थी। फिर आप उस समय कहाँ गये थे जब नगरसेवक ने शब्द वापरा था। उसने ये शब्द क्यु वापरा? ये घटना घडती उसके लिए उसने अपशब्द वापरा। और आपकी स्थायी समिती की सभा तीन घंटे तक तहकुब थी। क्यों? इसका कारण जकात पर लोगो के साथ अन्याय हो रहा है। ये आपको आज भले वो नगरसेवक इस बजेट को अच्छा बताते होंगे। जकात पर नागरिको को अन्याय होता है।

**मिलन म्हात्रे :-**

मुझे जब टाइम मिलेगा। तो आपके सब मुददे मै लुँगा। मेरा भाषण बाकी है। मैने ये भी बोला की, हम गलत नही बोले सही बोले। आप अपनी बात करो।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मैने किसीका नाम नही लिया। जकात पे आज तो मिरा भाईंदर मे अन्याय हो रहा है। जकात मिलनी चाहिए, उसमे महापालिका का बढना चाहिए, विकास होना चाहिए, हमारा भी मत है, जिस तरिके से इस प्रशासनने नियम बनाये। उस नियम का इम्प्लीमेन्ट नही होता है। मै नही बोलता हूँ। अनेक नगरसेवक भी बोलते है। यहाँ से अधिकारी ऑर्डर देते है। थोडा खुलासा झाला पाहिजे. मला बजेटवर बोलायचे आहे या जकातीच्या विषयावर मी पाच मिनीटे घेणार आहे. आपण मला परवानगी द्यावी.

**शशिकांत भोईर :-**

आज मिरा भाईंदर महानगरपालिकेचा अर्थसंकल्प मंजुरीसाठी आलेला आहे आपण गेल्यावेळी अर्थसंकल्प मंजुर करुन तो पूर्णत्वात नेलेला आहे आणि वाढ पण अर्थसंकल्पाची झालेली आहे आता जो जकातीविषयी मुददा चालू होता त्या संदर्भात प्रश्न विचारतो ते जरा प्रशासनाने त्याची उत्तर दयायची आहे.

**रिटा शाह :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांच्या प्रश्नाचे उत्तर नंतर दया साहेब मी एक प्रश्न विचारला त्याचे आपण मला उत्तर का देत नाहीत.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह त्याच्याशीच संबंधित आहे. मी पण ते विचारतो.

**रिटा शाह :-**

उत्तर दया उत्तर आपण का देत नाहीत.

**तुळशीदास म्हात्रे :-**

१० टक्के ठेकेदार एक्स्ट्रा घेतले त्याविषयी सन्मा. नगरसेविका रिटा शाह यांनी विचारलेला प्रश्न आहे त्या विषयी काहीतरी उत्तर दया.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

सन्मा. सदस्या रिटा शाह आपण आता जो प्रश्न विचारला त्या संदर्भात मा. महापौरांच्या अनुमताने सांगतो की, आपण जो मुद्दा उपस्थित केल्यानंतर प्रत्येक जकात नाक्यावर तीन शीफ्टमध्ये तीन अधिकारी नियुक्त केले आहेत.

**रिटा शाह :-**

मी फक्त एवढेच विचारले आहे की, जे पेनल्टीचे पैसे जमा झाले आहेत ते कुठल्या खात्यावर जमा केले त्याचे मला उत्तर द्या. नाक्यावर काय केले? नाक्यावर नाकेबंदी ठेवली. त्याबददल मी विचारले नाही.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

त्याची माहिती आम्ही पूर्ण घेतलेली आहे.

**रिटा शाह :-**

साहेब ती गेल्यावर्षीची राशी कुठे जमा केली आहे? ते सांगा तुम्ही काय तयारी केली ते मला विचारायचे नाही त्याची राशी मला दाखवा. किती पेनल्टी तुम्ही जमा केली?

**अजित पाटील :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह यांनी दंडाबददल उपस्थित केले. त्याबददल मी खुलासा करित आहे. नगरपालिकेने १७ मे २००३ पासून जकात वसुलीचा ठेका दिला होता. १७ मे पासून जानेवारी एन्डपर्यंत एकही पैसा दंडात्मक रक्कम जमा झालेली नाही

**रिटा शाह :-**

मला तुम्ही नंतर काय करता ते बघायचे नाही.

**अजित पाटील :-**

नगरपालिकेने १७/२/०४ पासून त्या ठिकाणी जकात नाक्यावर तीन क्लार्कची नेमणूक केली आहे. कारण तक्रारी निवारण करण्यासाठी नेमणूक केली होती. त्यानंतर ३/२/०४ ते २४/२/०४ मध्ये नगरपालिकेकडे १९ तक्रारी जकात चोरी प्रकरणामध्ये आल्या होत्या. त्या १९ तक्रारीपैकी १३ प्रकरणावर निर्णय देउन २० हजार २६३ रुपये दंड रुपाने वसूल केलेले आहेत. नगरपालिका फंडमध्ये जमा आहेत दोन केसमध्ये हेरिंगकरिता बोलवले आहे आणि चार केस आहेत त्याचा पत्ता ट्रेस आऊट होत नाहीत त्या ट्रेस आऊटचे काम चालू आहे. अशा प्रकारे १९ प्रकरणामध्ये नगरपालिकेने कारवाई केलेली आहे आणि १३ प्रकरणामध्ये २० हजार २६३ रुपये दंड रुपाने नगरपालिका फंडात झालेले आहेत.

**रिटा शाह :-**

अजित पाटील साहेब, आपण मागच्या दोन तीन महिन्याचे सांगतात मी संपूर्ण वर्षाचे विचारते आपले सर्व नगरसेवक इथे साक्षी आहेत. सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता स्वतः सांगतात. मी पन्नास हजार रुपये भरले. मग ते कुठे गेले? ते कुठल्या खात्यात जमा झाले.

**अजित पाटील :-**

मी रेकॉर्डप्रमाणे माहिती सांगितली.

**रिटा शाह :-**

मी तुम्हाला दोष देत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

स्वतः त्या ठेकेदाराने एक लाख रुपये मागितले होते अजित पाटील स्वतः गेले आणि सांगितले एक काम करा तुम्ही ५५ हजार रुपये भरा. प्लंम्पिगचे सामान होते. अजित पाटीलने कमी करुन दिले की, ठेकेदाराला ५५ हजार रुपये दया. केळकर साहेब मी तुम्हाला एक दिवशी रात्री फोन केला होता. तुम्ही त्या ठेकेदाराला पत्र दिले होते, जकात घेउन गाडी सोडून द्या. तरी त्या माणसाने गाडी सोडली नाही. नंतर साहेब तुम्ही मला असे उत्तर दिले होते की तो ठेकेदार असे सांगतो. मी प्रशासनाच्या विरोधात कोर्टात जाईन म्हणून तुम्ही जाउन बंड करा. तुम्ही आणि ते युनायटेड फॅक्टरी, ती चोरी पण नव्हती आपण चोरी कुठल्या मालावर सांगतो मी हा मोबाईल आणला १० रुपयाचा आहे आपल्या महापालिकेच्या रेटच्या हिशोबाने समजा ११ रुपये आहे. तुम्ही ११ रुपये जकातवर लावा. ह्याला तुम्ही चोरी समजू शकत नाही. पण त्याचा निर्णय असा असतो की, ही चोरी आहे आपल्याकडे रेटलिस्ट आहे सगळे आहे त्याच्यावर तुम्ही लावा. साहेब त्याच्यावर तुम्ही मला आदेश दिला होता की, तुम्ही जाउन पैसे भरा. तुम्ही नाही भरले तर तो प्रशासनाच्या विरोधात कोर्टात जाईल. म्हणजे तुमच्या लेटरचासुध्दा त्यांनी अपमान केलेला आहे आणि ५० हजार मी भरले अजित पाटील यांनी असे सांगितले तुम्ही ५० हजार भरून टाका १ लाख फाईड मागितले होते. तर ५० हजार तर ती रक्कम कुठे गेली? आणि साहेब तुमचे असे म्हणणे आहे जकात नाक्यावर एक पण चोरी झाली नाही.

**रिटा शाह :-**

साहेब १० पट पैसे घेतले आहेत. कोणाच्या खिशात गेले आता मी स्पष्टपणे विचारते कारण आपल्या बजेटवर ती राशी जमा झालेली नाही. ते त्यांनी वसुल करुन कुठल्या खिशात ठेवले स्वतःच्या

तिजोरीत ठेवले की आपण परत त्याच्यावर कमिशन एजंट वगैरे ठेवले होते. त्यांनी घेतले पैसे कुठे गेले? हा प्रश्न मी विचारलेला आहे. मागच्या दोन तीन महिन्यापासून आपण स्ट्रिक्ट झाले आहे. आपल्याकडे मी एक मॅटर घेउन आली होती त्याची जकात फक्त सहा हजार रुपये महापौर मॅडमकडे मी गेली त्यांनंतर सांगितले की तुम्ही काहीतरी सेटलमेंट करा त्या माणसाने सहाचे पंचवीस हजार घेतले. मग ते बाकीचे पैसे कुठल्या तिजोरीत गेले? कुठल्या खात्यामध्ये आपण जमा केले. त्याचा आम्हाला जवाब द्या. तुम्ही दोन तीन महिने काय केले? त्याचा जवाब मला नको.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

मा. महापौरांच्या अनुमतीने आपला खुलासा करु इच्छितो यापूर्वी जकात अभिकर्त्याने अशा तऱ्हेची ५० टक्के किंवा त्याच्यापेक्षा जास्त रक्कम १० पटींच्या दरात घेतल्याबद्दलची आमच्याकडे लेखी स्वरुपाची अशी कोणतीही तक्रार आजच्या क्षणापर्यंत नगरपालिकेकडे नाही.

**रिटा शाह :-**

साहेब चुकीची माहिती देता. सहा हजार रुपयाची केस तुमच्याकडे आहे त्याची लेखी माहिती माझ्याकडे आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

माझ्याकडे अशा स्वरुपाची लेखी तक्रार आजच्या क्षणी तरी उपलब्ध नाही.

**रिटा शाह :-**

मी तुमच्या टेबलावर दिले आहे. साहेब चुकीचे उत्तर देउ नका हे तुम्हाला शोभत नाही. तुम्हाला आता मागवून दाखवू का? डेप्युटी कमिशनर साहेब आपण चुकीची माहिती सभागृहाला देता. मी तक्रार तुमच्या टेबलावर ठेवली. तुम्ही स्वतः सांगितले असे असे लेटर लिहा आणि माझ्या टेबलावर द्या तुम्हाला दिले होते त्यांनी सहा हजारचे पंचवीस हजार वसूल केलेले आहे. तुम्ही अशा चुकीचे माहिती देउ नका. लेखी तक्रार तुमच्याकडे आहे पाहिजे तर मी तुम्हाला पत्राची कॉपी देते. तुम्ही स्वतः सांगितले पोलिस स्टेशनला जा कोर्टात जा आणि आमच्याकडे लेटर दया. आम्ही तुम्हाला लेटर दिले. कमिशनरकडे मी त्याबददल तक्रार करणार आहे. आमच्या लेटरवर तुम्ही तक्रार केलेली नाही आहे. चुकीची माहिती देउ नका. तुमच्या लेटर नाही म्हणून.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

सन्मा. सदस्या रिटा शाहजी आपण जो मुददा उपस्थित केला. त्या मुददयामध्ये लगेच आपण त्या आयातीकाचा माल तात्काळ याच्यानंतर सोडलेला आहे.

**रिटा शाह :-**

साहेब सोडला नाही सोडला असे मी बोलत नाही. सहा हजाराचे पंचवीस हजार जमा केले. घेतले आणि त्याबददल ची लेखी तक्रार तुमच्या कार्यालयात जमा आहे. मी त्याबददल बोलते.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

जर तशा स्वरुपाची तक्रार असेल त्यावर आजच कारवाई केली जाईल.

**रिटा शाह :-**

साहेब, लहान मुलांसारखे आम्हाला पटवून देउ नका. तुम्ही जवाब देता ते आम्हाला समजते. सर्व नगरसेवकांना माहिती आहे १० पट त्याच्यावर पेनल्टी वसुल केलेली आहे आणि ती आपल्या कार्यालयात जमा झालेली नाही. पट पेनल्टी वसुल करायचे तुम्हालापण माहिती आहे. तुम्ही स्वतःही सांगायचे १० चे १५ भरा. १५ चे २५ भरा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

सन्मा. सदस्या रिटा शाह मी असे कधीही सांगितले नाही.

**रिटा शाह :-**

सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता यांनी आता सांगितले आहे ते आता बोलले.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

त्यांनी काय सांगितले? तो तुम्ही खुलासा करा. मी तुम्हाला दहा पट भरायला सांगितले का?

**नरेंद्र मेहता :-**

साहेब ज्यावेळी तो विषय तुमच्याकडे आला होता की अशी अशी गाडी आहे. त्यांनी अंडरव्हॅल्यु बिलसुध्दा दाखविले होते आणि तो फाइनसुध्दा भरायला तयार आहे. त्या पार्टीने एक लाख मागितले होते. साहेब त्यावेळी मी शिर्डीला होतो. त्या निमित्त तुम्हाला कन्टीन्युअस करुन घ्यायचे होते. सन्मा. सदस्या रिटा शाह पण आलेल्या की असे आहे मग साहेब तुम्ही अजित पाटीलना त्यांच्याकडे पाठविले. आणि ते ५५ हजार रुपये भरायला लावले. ऑक्ट्रॉय वर जकात सात की आठ हजार तुम्ही ५५ हजार रुपये भरायला लावले दुसरे साहेब तुम्ही बोलता की, लेखी तक्रार साहेब कुठलाही नगरसेवक

तुमच्याकडे येतो तक्रार घेउन तो व्हर्बली येतो असे पकडलेले आहे तुम्ही तक्रार स्वीकारतच नाही आणि ठेकेदार काय करतो? गाडी सोडतच नाही.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.):-**

तक्रार स्वीकारत नाही असे कधी झालेले नाही सर्व तऱ्हेच्या तक्रारी स्वीकारल्या जातात.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब जरा ऐकून घ्या ज्यावेळी कुठलाही नगरसेवक तक्रार घेऊन येतो, अशी अशी गाडी पकडलेली आहे तुम्ही ठेकेदाराला बोलवता का? समजा त्यांनी रिसीव्हिंगवर दिली तर ते पत्र तुमच्याकडे चार दिवसापर्यंत तिथपर्यंत ठेकेदार गाडी सोडत नाही. तो बोलतो जब तक नही भरेगा तबतक छोडेगा नही। दुसरी गोष्ट साहेब युनायटेड रबरची तुम्हाला आठवत असेल तुम्ही त्या ठेकेदाराला पत्र पण दिले होते. तुम्ही आउटवर्ड नंबर टाकता. तरी ती गाडी सोडली नाही आणि तुम्हाला आठवत असेल तर तुम्ही उत्तर पण दिले होते. तो ऐकत नाही मी काय करु? साहेब हे बरोबर आहे का? तुम्ही सांगितले की, तो तुमच्या पत्राच्या विरोधात कोर्टात जाईल. महापालिकेने त्याला एक पत्र दिले की, तुम्ही जी काही याची गाडी ऑक्ट्रॉय घेउन सोडून द्या. नंतर आपण जे काही निर्णय असतील त्यावर घेउन आपण त्याला फाइन करु. साहेब त्यावेळी तुम्ही सांगितले तो ऐकत नाही. तो सांगेल ठेकेदाराने तुम्हाला असे उत्तर दिले. तो कोर्टात जाईल तर साहेब ही लेखी तक्रार नाही का? त्याला आपण दुसऱ्या दिवशी दंड भरायला लागला. त्याची सात हजार ऑक्ट्रॉय होती. तरी ४० हजार रुपये भरले.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम विषय ऑक्ट्रॉय चल रहा है। ऑक्ट्रॉय वालोने क्या किया। ऑक्ट्रॉयवाले क्या करता है। ऑक्ट्रॉयवालोने नगरसेवकोको क्या जवाब दिया। लेकिन मुझे बहुत दुःख लगता है। ये एक दुःख करने की बात है क्योकी आज एक महिला महापौर हमारे सभागृह की नेता है। आज आपके अध्यक्षता के अंदर ये सभागृह चलता है। यहाँ बैठे बैठे एक मेंबर को मालुम है की, ठेकेदारने पेनल्टी के हिसाब से पैसे वसुल किये है। उसके पास कोई लेखी पुरावा नही है। नाही उसने लेखी पुरावा भरनेवालो को दिया है। यहाँ बैठे हर किसीको मालुम है। साहेब एक डेप्युटी कमिशनर उठके ऐसा जवाब देता है की पेनल्टी के खाते के हिसाब से हमारे पास लेखी एक भी पैसा जमा नही हुआ है। इससे बडी दुख की घटना कोई भी मिरा भाईंदर महानगरपालिका के शहर के अंदर मुझे नही लगता है। मुझे मेरा जवाब मिल गया है। बाहर पत्रकार बैठे उनको भी समझ मे आ गया है। मुझे क्या जवाब मिला है। इसके लिए ये सवाल मै पिछे लेती हूँ की वो पैसा किधर गया। वो सिर्फ मुझे सोचने की जरुरी नही है। यहाँ सभागृह मै बैठे हुए एक एक क्लार्क से लेके अधिकारी से पीठासन अधिकारी है। अगर ऐसा जवाब मिलता है। एक भी पैसा पेनल्टी के हिसाब से हमने लिया नही है। बात इधर ही खत्म हो गई। ये पैसा कहॉ गया उसके उपर से या तो कमिशन बिठाओ या तो इन्क्वायरी कमिशन बिठाओ की ये पैसा कहॉ गया। बाकी मुझे मेरा जवाब एक डेप्युटी कमिशनर को शोभा देता है। ऐसा उन्होने मुझे एक जवाब दिया है। उससे मै सॅटिसफाइड हूँ ।

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मै सभी नगरसेवकोसे विनंती करता हूँ की, आज विषय नही है। जो आज बजेट के बारे मे विषय चल रहा है।

**रिटा शाह :-**

साहब विषय नही है ऐसा आप मत बोलो ये पैसा कहॉ गया। बजेट मे ये पैसा का उल्लेख नही है ये पुछने का मेरा अधिकार है। विषय कैसे नही है।

**मॉरस रॉड्रीक्स :-**

स्टँडिंग मे आके बोलो या दुसरी महासभा मे आके बोलो।

**रिटा शाह :-**

ये स्टँडिंग का सवाल नही है। पैसा कहाँ गया? ये बजेट मे आना चाहिए ये विषय नही है क्या? स्टँडिंग मे ये विषय ऑलरेडी हो चुका है। आप कैसे जवाब देते हो।

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मै इतना विनंती कर रहा हूँ की नगरसेवकोको खुशी होनी चाहिए की ऐसा बजेट पेश किया है। एक बार बताया महापौर ने एक बार बेल मारी है। आपको १५-१५ मिनीट बात करने के लिए दिये है। आप जरा १५ मिनीट के उपर ध्यान रखिए। नही तो बेल मारते रहेंगे आप महापौर का नही सुनेंगे।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सभापती महोदय साहब आपने अच्छा बजेट पेश किया। ऐसा हमने बोला है। पान नं. ६ मे प्रशासनने ऑक्ट्रॉय से एक भी रुपये दंडात्मक कारवाई से वसुल नही हुआ, ऐसे दिखाया है। और जबकी आपने एक कोटी दिखाया।

**मॉरस रॉड्रीक्स :-**

अगली बार सोचेंगे स्थायी सभा भी है। महासभा भी है। अगली बार उसको देना न देना अपने हाथ मे है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बजेट मे प्रशासनने एक रुपया भी दंडात्मक कारवाई वसुल नही होगी।

**मॉरस रॉड्रीक्स :-**

दंडात्मक रसिट किसके पास होगी। आप लेके आयेंगे। मै उन अधिकारी को जमा करने को बोलुंगा।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मेरे बोलने का मतलब आपको समझा नही साहब आपने इस बजेट को १७१ से १८१ मे लेके गये। आपने एक करोड उत्पन्न जकात से दंडात्मक कारवाई से वसुल है। ऐसे आपने स्थायी समिती मे दिखाया। जबकी आयुक्त साहबने उधर एक पैसा भी दिखाया नही। ये अच्छी बात है स्थायी समितीने एक कोटी उसपर दिखाई है। कितना हो गया वो बात अलग है। लेकिन प्रशासनने उधर एक रुपया भी दंडात्मक कारवाई से वसुल होगा। ऐसे दिखाया नही इसका मतलब आज चल रहा है वो भविष्य मे चलेगा।

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की आता १० टक्के कर वसुली केला की, नाही त्यावर बोलणार नाही फक्त आपल्या निदर्शनास आणून देउ इच्छितो. आपण जेव्हा प्रशासनातर्फे ज्या जकात अभिकर्त्याला पत्र दिले की, हा माल योग्य किंमतीचा आहे हा माल पुन्हा सोडण्यात यावा. त्या पत्रावर कारवाई तर होतच नाही. आताही मी फोन मारुन बघितले, शहानिशा केली. माझ्यासोबत माझे एक मित्र डॉक्टर त्यांची एक मशिन येउन पडलेली होती. जो आयातकर्ता आलेला तो घेउन जात होता आणि आपल्या जकात अधिनियमामध्ये तशी तरतुद आहे आणि नियमामध्ये लिहीलेले आहे की पुन्हा नेत असेल तर त्याला नेउ शकतो जकात न भरता तरी तो हटकून आताही ही मशीन सोडत नाही. आपल्या पत्राचा त्यांनी अपमान केला आहे. आपल्या पत्राची कोणतीही किंमत ठेवलेली नाही. मग अशा अभिकर्त्याला आपण ठेवावच का? त्याच्यावर आपण केस का करु नये? आज या प्रशासनाचा एवढा मोठा प्रश्न आहे. प्रशासनाचे नाव बदनाम होते. नागरिकांच्या मनात तीव्र असंतोष उत्पन्न होत असून आपण त्याच्यावर लगेच कारवाई करणार का? नाही. उद्या करु आज करु असे का? तरी पण तुम्हाला हे संबंधित आहे आता कल्याण केळकर साहेब आहेत. त्यांनीच पत्र दिलेले आहे. त्यांच्या पत्राची किती किंमत ठेवली? तुम्ही फोन करुन त्यांना विचारावे आणि त्यानंतर मला उत्तर द्यावे. मी एक जकात बददल प्रश्न विचारतो. त्याची मला माहिती द्यायची आहे. आपली गेल्या वर्षाची किती मागणी होती? आणि त्यावर २० टक्के वाढ अपेक्षित धरलेली होती का? तसेच सन २००४-०५ साठी एकूण अपेक्षित उत्पन्न किती? याचा जरा मला खुलासा करावा.

**अजित पाटीलः-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. महापालिकेने जकातीचा ठेका मे महिन्यात देण्यात आलेला होता आणि २९ कोटी ७ लाखाची ऑफर आलेली होती २९ कोटी ७ लाखावर चालू वर्षामध्ये १५ टक्के ॲड करुन

**शशिकांत भोईर :-**

आपली मागणी किती होती जकात ठेका कितीला दिला? आपली नगरपालिकेची मागणी किती होती?

**अजित पाटील :-**

बजेटची तरतुद पाहिजे की तुम्हाला मागणी पाहिजे.

**शशिकांत भोईर :-**

मला मागणी पाहिजे.

**अजित पाटीलः-**

मागणी असू शकत नाही.

**शशिकांत भोईर :-**

तरतुदीप्रमाणे मागणी केली होती.

**अजित पाटील :-**

गेल्या वर्षीची बजेटची तरतुद पाहिजे की या वर्षीची?

**शशिकांत भोईर :-**

गेल्या वर्षाची सन २००३-२००४ . आता आपण सन २००४-०५ चा अर्थसंकल्प सादर करीत आहोत. माझ्या अंदाजपत्रकाप्रमाणे ३२ करोड होती.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन २००३-०४ या वर्षामध्ये आपण अर्थसंकल्पामध्ये तरतुद ३० कोटीची दर्शविली होती आणि जेव्हा आपण जकात अभिकर्ता नियुक्तीचा प्रस्ताव केला आणि ज्या निवीदा मागविल्या त्यामध्ये आपण २० टक्के इन्क्ल्युड केले होते. आणि ते इन्क्ल्युड करुन आपण निवीदा मागविली होती.

**शशिकांत भोईर :-**

म्हणजे ३२ कोटी पाहिजे होती २० टक्के इन्क्ल्युड केल्यामुळे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मा. महापौर मॅडम शासनाकडून ज्यावेळेला जकात बंद करण्यात आली होती. त्यावेळी टेन्डर काढण्यापूर्वीचे १२ महिने घेउन जे अनुदान मिळत होते, त्या अनुदानाचे १२ महिन्याचे उत्पन्न पकडून त्यावर २० टक्के ॲड करुन ३० कोटीचे टेन्डर काढण्यात आले होते. म्हणजे टोटल १२ महिन्याचे गर्व्हनमेंटचे अनुदान मिळायचे ते अनुदान प्लस २० टक्के हे धरुन टेंडर काढण्यात आले होते.

**शशिकांत भोईर :-**

म्हणजे ३२ कोटीचे टेन्डर असायला पाहिजे होते.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

३० कोटीचे

**प्रफुल्ल पाटील :-**

३० कोटीची तरतुद आहे पण मागणी कितीची आहे असे आम्ही विचारतो तुम्ही मागणी करताना २० टक्के ॲड करुन करता.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

हो साहेब २ कोटी ४२ लाख दर महिन्याला अनुदान मिळायचे त्याचे १२ महिने काढून जी रक्कम येईल त्यावर २० टक्के ॲड करुन टेन्डर काढले होते

**शशिकांत भोईर :-**

म्हणजे मागणी ३२ कोटी असायला पाहिजे होती. आस्थापना पकडून म्हणजे आपल्याला ३३ कोटी ६० लाख पाहिजे होते. तर या वर्षासाठी २००४-०५ साठी २० टक्के अपेक्षित धरलेली आहे का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

पुढच्या टेन्डरला आपण १५ टक्के धरतो पाटील साहेबांना माहिती आहे. आपण पहिल्या वर्षी २० टक्के, दुसऱ्या वर्षी १५ टक्के ॲड करुन करतो.

**शशिकांत भोईर :-**

१५ टक्के वाढ केली तर ३३.०७ कोटीला १५ टक्के वाढ झाली तर अंदाजे किती होते?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

आता आलेल्या टेन्डरवर फिक्स करावे लागेल. आलेले टेन्डर महासभेने मंजुर केलेले आहे. महासभेने मंजुर केलेले असल्यामुळे गेल्या वर्षीचे मिळालेले इन्कम त्यावर जी.आर.प्रमाणे १५ टक्के ॲड करुन टेन्डर काढायचे.

**शशिकांत भोईर :-**

आपण आता टेन्डर मान्य केले पण आपण मागणी मान्य कुठे केली आहे? मागणी कमी केलेली आहे का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

आपण नवीन टेन्डर काढताना आपल्यासमोर येणारच आहे किती रकमेचे टेन्डर काढायचे महासभेची मंजुरी घेतल्याशिवाय टेन्डर निघणार नाही प्रत्यक्षात मागच्या वेळेला आपण २ कोटी ४२ लाख गुणिले १२ येणाऱ्या रकमेत २० टक्के ॲड करुन आपण टेन्डर काढले होते ते टेन्डर २९ कोटी ७ लाख धरुन १५ टक्के ॲड करायचे का? ३३ कोटी २० लाखावर ॲड करुन करायचे? स्वतंत्र ॲड करायचे. हा प्रस्ताव महासभेपुढे येणार आहे. बजेट प्रोव्हिजन करुन हे जे एम.आर.पी. चे दर स्थायी

समितीचे वाढविले एकूण जकात नियमाप्रमाणे ८६ आयटम आहेत एकूण दरपत्रकाचे ८६ आयटम आहेत ८६ व्या आयटमपैकी आयुक्तसाहेबांनी ३५ आयटमवर दर वाढविण्याच्या अहवाल बजेटसोबत दिला होता. परंतु स्थायी समितीने १३ आयटमचेच दर वाढविले कारण जेवढे एम.आर.पी. आहेत तेवढेच आणि ती वाढीव येणारी रक्कम चार कोटीची पकडलेली आहे आणि जे पुढील वर्षाचे जे ३७ कोटी ५० लाखाचे टेंडर आहे २९ कोटी ७ लाख हे चालू वर्षाचे मंजुर केलेले टेन्डर अधिक १५ टक्के वाढ ४.४५. ३३ कोटी ५० लाख आणि जी एम.आर.पी.ची दरवाढ सुचविलेली आहे ती चार कोटीची आहे असे मिळून ३७ कोटी ५० लाखाचा टेंडरचा प्रस्ताव महासभेपुढे बजेट मंजुर झाल्यानंतर येईल. म्हणजे हे टेन्डर संपायच्या अगोदर

**शशिकांत भोईरः-**

साहेब आयुक्तांनी जो जकातवाढीचा रेट दाखविला आहे त्याच्यामध्ये आपण उत्पन्नात ६ कोटी वाढ दाखविली आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

बरोबर आहे. कारण ३५ आयटमचे दर वाढविण्याचा अहवाल होता. आपण जर पाहिले तर ३५ आयटम आहेत हे ३५ आयटम अगोदर दिले होते. म्हणून सहा कोटी धरले. पण स्थायी समितीने ३५ आयटम मंजुर न करता फक्त १३ आयटम मंजुर केले. १३ आयटमचीच चार कोटी अमाउन्ट पकडली. सहा कोटीची धरली होती त्याऐवजी चार कोटी धरली. म्हणजे पूर्वी ३५ आयटमची दरवाढ करा म्हणून आयुक्तांनी स्थायी समितीला अहवाल सादर करताना बजेट देताना ३५ आयटमवर जकातवाढ सुचविली होती. परंतु स्थायी समितीने ३५ आयटमपैकी फक्त १३ आयटमच मंजुर केले. १३ आयटमची जी चार कोटी आली.

**मिलन म्हात्रे :-**

शिवमुर्ती नाईक साहेब माझ्या मते स्थायी समितीच्या बैठकीच्या वेळेला ऑक्ट्रॉयच्या विषयावर संपूर्णपणे केळकर साहेब हजर होते. हा सर्वस्वी चार्ज केळकर साहेबांकडे आहे. मेहेरबानी करून आपण ही सगळी माहिती केळकर साहेबांना द्या.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

महापौरांनी मला सांगितले बोला म्हणून

**मिलन म्हात्रे :-**

आपण त्यांच्याकडून द्यावी त्यांना तो चार्जच आहे खातच त्यांच्याकडे आहे त्यांनी बोलावे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

आता हा जनरल आयटम आहे.

**मा. महापौर :-**

नाईक साहेबांना मी बोलायला सांगितले

**मिलन म्हात्रे :-**

त्या चार्जचे अधिकारी इकडे आहेत. विदाउट चार्जचा अधिकारी बोलू शकतो का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

प्रश्न असा आहे साहेब प्रशासनाच्या वतीने आम्ही उत्तर देतो.

**मिलन म्हात्रे :-**

तो अधिकारी उपस्थित आहे म्हणजे ते हेल्पलेस आहेत का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

असे नाही आहे. साहेब असे का म्हणता? त्याने आकडेवारी नेउन देण्याऐवजी आम्ही इथे आकडेवारी तयार केली.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब तो प्रश्न नाही आहे ते खात्याचे अधिकारी उपस्थित आहेत त्यांच्या हाताखालचे उपस्थित आहेत. त्यांनी माहिती दयावी.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

असे म्हणता येणार नाही कारण प्रशासन हे अंग आहे आणि संपूर्ण एक आहे असे म्हणता येणार नाही आपण जरा विचार करावा की प्रशासनाच्या वतीने आयुक्तां च्यावतीने प्रत्येक व्यक्ती ही उत्तर देते.

**मिलन म्हात्रे :-**

अधिकारी उपस्थित आहेत त्या विभागाचे अधिकारी याचा अर्थ तुम्हाला कळत नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

आपण नेउन देउन त्यांना सांगण्याऐवजी आम्ही इथे आमच्याकडे आकडेवारी आहे म्हणून बोलतो.

**मिलन म्हात्रे :-**

ती आकडेवारी त्यांच्याजवळ नाही आहे का? म्हणजे त्यांना हा प्रकार कळत नाही .

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

त्याचा असा अर्थ नाही आहे. आयुक्तांनी जे बजेटसोबत आयटम सादर केलेले आहेत ते ३५ आयटम होते त्यानुसार सहा कोटी धरलेले होते. स्थायी समितीने ३५ आयटमपैकी १३ आयटम मंजूर करायचे ठरवले म्हणून चार कोटी ॲड झाले २९ कोटी ७ लाखाचे टेंडर आलेले आहे अधिक १५ टक्के ॲड ४ कोटी ४५ लाख वाढीव प्रस्ताव ३५ आयटम रद्द करुन फक्त १३ आयटम मंजुर केल्यामुळे चार कोटीचा प्रस्ताव स्थायी समितीने मंजुरी दिल्यामुळे वाढीव धरला ३७ कोटी ५० लाखाचा प्रस्ताव स्वतंत्र महासभेपुढे पुढच्या सभेत येणार आहे. म्हणजे ह्या टेन्डरची मुदत संपण्या अगोदर

**मिलन म्हात्रे :-**

महापौर मॅडम आपण जसे आता नाईक साहेबांनी विश्लेषण करायला लावले या संपूर्ण सभागृहामध्ये मला आज बोलायची इच्छा होते. मागच्या कित्येक महिन्यापासून केळकर साहेबांचा कार्यभार आम्ही बघितलेला आहे. यापुढे सभागृहाने पण निर्णय घ्यावा. कृपा करुन आता या ऑक्ट्रॉयच्या विषयावर सगळे सदस्य बोलले आहेत. सर्वस्वीपणे ऑक्ट्रॉयचा नाईक साहेबांकडे पूर्वी होता तसा त्यांच्याकडे द्यावा. म्हणजे जेणेकरुन काहीतरी निष्पन्न निघेल. अधिकाऱ्याचे पत्र तो ऑक्ट्रॉयवाला मानत नाही. आपल्या नगरपालिकेने त्याला शोकॉज नोटिस काढली पाहिजे हे स्थायी समितीमध्ये पण झाले.

**शशिकांत भोईर :-**

आजही मानले नाही आताही तुम्ही शहानिशा करु शकता. ती मशीन आतापर्यंत तशीच आहे.

**मिलन म्हात्रे :-**

स्थायी समितीकडून तुमची नोटिस का जात नाही? त्याचे टेन्डर टर्मिनेट करण्याचे तुमचे पत्र गेले पाहिजे. वर्षभर आपण हे सगळे का बघत राहिलो? हे केळकर साहेबांचे काम आहे.

**शशिकांत भोईर :-**

माझी प्रशासनाला विनंती आहे. कृपया जे विभागाचे अधिकारी बसलेले आहेत त्यांनीच माहिती द्यावी कारण ते त्याच्याशी संबंधित आहेत. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेबांनी योग्य मुद्दा उपस्थित केला.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य शशिकांतजी भोईर मीच उत्तर देणार होतो. परंतु गतवर्षी संदर्भात जो तुम्ही प्रश्न विचारला त्या संबंधीची माहिती मा. नाईक साहेबांना होती. त्यांनी विस्तृत अशी माहिती आपल्याला गेल्या वर्षी काय झाले. अर्थसंकल्पात किती तरतुद होती? आणि किती कोटीमध्ये आपण ऑक्ट्रॉय दिला या संदर्भातील उत्तराची आपण त्यांना मागणी केली होती आणि आता आपणाला जी माहिती हवी होती त्याची विस्तृत अशी माहिती प्रशासनाच्या वतीने दिली माझे आणि नाईक साहेबानी गल्लत करण्याचा काही प्रश्न नाही. कारण की शेवटी उत्तर देणे हे प्रशासनाच्या वतीने उत्तर दिलेले आहे आणि याच्यामध्ये कोणत्याही तऱ्हेचा गैरसमज करुन घेण्याचा प्रश्न नाही आहे. सन्मा. सदस्य मिलनजी म्हात्रे आपण जे सांगितले त्याप्रमाणे त्या प्रश्नाच्या उत्तराची माहिती माझ्याकडेही उपलब्ध आहे आणि ती मीही देउ शकतो. असा भाग नाही की नाईक साहेब आणि माझ्यामध्ये गल्लत करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही शेवटी आम्ही दोघेही प्रशासनाचे दुवा आहोत आणि प्रशासनाच्या वतीने दिले गेलेले उत्तर हे योग्य असे आहे धन्यवाद.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम नाईक साहेब असू देत किंवा केळकर साहेब असू देत दोघेही डेप्युटी कमिशनर आहेत. ए ग्रेडचे ऑफिसर आहेत. जकातवाले चोऱ्या करतात, जकात ठेकेदार गुंडागर्दी करतात, म्हणून अधिकारी कामे करित नाहीत असे नाही आहे. पण केळकर साहेब आपण वाईट वाटून घेउ नका आपण कुठेतरी चुकतो. कारण आपले पत्र दिले आपण परत एकदा ऑक्ट्रॉय पत्र दिले आपण एकदा असेही पत्र दिले की, त्यांचा माल ते परत घेउन जातात पण तुमच्या पत्राचे तो आदर करीत नाही. तुम्ही स्वतः मागे बोलले होते की, तो मला ऐकत नाही. मा. आयुक्त साहेबांकडे तक्रार करणार आहे. मग महापौर मॅडम त्या ठेकेदाराला आपण शोकॉज नोटिस का पाठवायची नाही, त्याचे टेंडर का टर्मिनेट करायचे नाही, त्याचे डिपॉझिट जप्त का करु नये, असे सभागृहाने ठरवायला पाहिजे.

कारण ऑफिसर कुठलाही कमी जास्त नसतो. ऑफिसर बरोबर असतो. पण ऑफिसरचे ते ऐकत नाही. ती केळकर साहेबांची स्वतःची स्तुती आहे की, तो मला ऐकत नाही. मॅडम आताही कुठल्याही ठेकेदाराला कायदेशीर पेनल्टी घ्यायचा अधिकार नाही, महापालिकेलासुद्धा नाही. कारण अशी मॅटर कोर्टात जाते आणि कोर्टातर्फे आपल्याला डायरेक्शन आणि डिसीजन मिळते त्याच्यावर आपण पेनल्टी वसुल करतो. मग आपण आता २० हजार पेनल्टी जमा केलेली आहे. कुठल्या बेसवर आणि कुठल्या बायलॉजच्या हिशोबाने आपण केलेले आहे. मग माझी या सभागृहामध्ये अशी मागणी आहे की, मागचा जो अग्रवाल म्हणून ठेकेदार आहे त्याचे टेन्डर टर्मिनेट करुन त्याने त्याचे भरलेले डिपॉझिट जप्त करावे अशी माझी मागणी आहे.

**मुक्ता रांजणकर :-**

या मागणीला माझे समर्थन आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. पीठासन अधिकारी बजेटवर चर्चा सुरु असताना जकात ह्या पहिल्या विषयावर अनेक सदस्यांनी ठेकेदाराबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केलेली आहे. सभागृहाने आपले कामकाज करीत असताना सभाशास्त्राच्या नियमाप्रमाणे बजेटला मंजुरी देण्याचे प्रत्येक वर्षी काम केलेले आहे. त्यामुळे यंदासुध्दा या बजेटला मंजुरी मिळेल याबद्दल तिळमात्र शंका नाही. परंतु एकंदरीत सभागृहामध्ये सदस्यांनी अभिकर्त्याबाबत जे गैरप्रकार अभिकर्त्याने दिलेले आहेत, त्याबद्दल जे निवेदन केलेले आहे, ते निवेदन करीत असताना या ठिकाणी एक गोष्ट मात्र निश्चितपणे सभागृहाने नोंद घेतली पाहिजे, ती म्हणजे सभागृह नेहमी कुठलेही ठराव करुन देत असते. बजेट मंजुरी करुन देत असते. परंतु त्याची अंमलबजावणी करताना बजेटमध्ये नोंद केलेल्या वसुलीच्या रकमा त्या वसुली करीत असताना जे काही जकातीचे नियम लागू आहेत त्याचे उल्लंघन करुन स्वतःच्या स्वार्थासाठी काही गोष्टीचा गैरफायदा घेउन काही डेफिशन्शीज प्रशासनामध्ये आढळल्या आहेत आणि त्या सदस्यांनी या ठिकाणी निवेदन केलेले आहे आणि त्याचा फायदा हा अभिकर्ता घेत आहे असे सर्व ठिकाणी वातावरण दिसत आहे. एकंदरीत जी काही वसुली त्यांनी एवढ्या कालावधीत केलेली आहे त्याबाबत संपूर्ण मिरा भाईंदरच्या जनतेमध्ये असंतोष माजलेला आहे. ज्यावेळी पर्याय जकातीला सेस असतानासुध्दा सभागृहामध्ये मोठ्या मनाने सभागृहाच्या सदस्यांनी एकच गोष्ट समोर लक्षात ठेवली की, महानगरपालिकेच्या विकास कामासाठी लवकर पैसा उपलब्ध व्हावा म्हणून आम्ही जो उपकराचा पर्याय होता. तो डावलून जकातीला अनुमोदन सर्वांनी दिले होते आणि त्याचा गैरफायदा अभिकर्त्यांनी घेतलेला आहे आणि त्याचे परिणाम, लोकप्रतिनिधीची प्रतिमा जनमानसामध्ये दिवसेंदिवस डागळत चाललेली प्रतिमा आहे. त्याची आपण कुठेतरी या ठिकाणी नोंद घ्याविशी वाटते. प्रशासन कशा पध्दतीने काम करीत आहेत या ठिकाणी मला जास्त बोलण्याची गरज नाही. आता झालेल्या चर्चेवरून स्पष्ट झालेले आहे किंबहुना जेव्हा बजेटमध्ये तरतुदी केल्या जातात त्या तरतुदीच्या अनुषंगाने जी वसुली आपल्याला ठेकेदारामार्फत करावयाची असते, ती वसुली करित असताना ठेकेदार नियमानुसार करतो की, नाही करतो हे पाहण्याची प्राथमिक जबाबदारी प्रशासनाची होती. जकातीसंबंधीची जे नियम आम्ही करायला पाहिजे होते ते गेल्या एक वर्षात आमची अपेक्षा होती की, ज्या नियमाद्वारे तो जकात अभिकर्ता आमच्या जनतेवर अन्याय करुन जे नियमामध्ये नाही. ते नियमामध्ये आहे असे ठासून महाराष्ट्र ऑक्ट्रॉय रुल्स १९६८ च्या तरतुदीचा तो वापर करुन आमच्या लोकांवर अन्याय करित आहे आणि प्रशासन मात्र हे उघडया डोळ्यांनी पाहत आहे लोकप्रतिनिधींच्या म्हणण्याला कुठेही किंमत राहिलेली नाही आणि अशा नियमांची रचना प्रशासनाने करुन एक वर्षाच्या आत असे नियम शासनाकडे एका वर्षाच्या आत असे नियम मंजुरीसाठी पाठवायला पाहिजे होते. ज्याद्वारे त्या नियमांच्या आधारे त्या जकात अभिकर्त्यावर बंधन घालू शकलो असतो. पण दुर्देवाने प्रशासनालाच यामध्ये स्वारस्य राहिलेले नाही आणि म्हणून अभिकर्त्याला एक प्रकारे मदत करण्याचा जो मार्ग प्रशासनाने अवलंबलेला आहे. तो अतिशय लज्जास्पद आहे असे मी या ठिकाणी मांडतो. दुसरी बाब आतासुध्दा आम्ही नवीन बजेटसाठी ज्या काही तरतुदी केलेल्या आहेत त्या तरतुदीची एकंदर विगतवार माहिती जेंव्हा उपआयुक्त नाईक साहेब यांनी आम्हाला दिली त्यावरुन एक स्पष्ट होते की, शासनाने जकातीचे अनुदान जेव्हा सुरु केले तेंव्हा प्रत्यक्ष नगरपालिकेने एका वर्षामध्ये शेवटच्या वर्षामध्ये वसुल केलेली जकातीची रक्कम त्याच्यावर २० टक्के जास्त आकारणी करुन तेवढ्या रकमेचे अनुदान आतापर्यंत आम्हाला शासनाने दिलेले आहे. प्रत्येक वर्षी अनुदान मागताना २० टक्के रक्कम ॲड करुन आम्हांला अनुदान मिळालेले आहे. गेल्या वर्षी जेव्हा २० टक्के ॲड करुन आम्ही टेन्डर मागणी ठरविली, ती मागणी साडे ३४ कोटीच्या दरम्यान असताना २९.७० कोटीच्या टेन्डरला शासनाने अंतिम मंजुरी दिली आणि ह्या वर्षी जेव्हा आम्हाला पुन्हा मागणी करायची आहे. मागणीची रक्कम ठरवायची आहे तेव्हा आम्ही मुळ रकमेला फाटा देउन गेल्या

वर्षी टेन्डर कितीला गेले ही रक्कम जर आम्ही धरली तर ती चुकीच्या पध्दतीने होईल कृपया शासनाचे परिपत्रक अतिशय डिटेलमध्ये जाउन वाचणे किंवा ते सभागृहापुढे आणणे गरजेचे आहे. कारण गेल्या वर्षीची मागणीची रक्कम जर आम्ही धरली तर साडे ३४ कोटी रुपयावर २० टक्क्यानंतर तो १५ टक्के आणावा असे शासनाचे परिपत्रक आहे. असे जरी गृहीत धरले तर साडे ३४ टक्क्यांवर १५ टक्के जर आम्ही धरले तर आज आम्ही जी करवाढ सुचविलेली आहे ती कुठलीही करवाढ आम्हाला न लावता तेवढे पैसे आम्हाला मिळू शकतात. नवीन टेन्डर काढताना मागणीची रक्कम साडे ३४ कोटी अधिक १५ टक्के म्हणजे ३९ कोटी रुपये ही मागणीचीच रक्कम होते. तद्नंतर ऑक्ट्रॉय वाढवायचे न वाढवायचे आणि आलेल्या ऑक्ट्रॉयचा जो प्रस्ताव आहे तो योग्य असल्यावर ३९ कोटीच्या वर उर्वरित साडे चार कोटी किंवा आयुक्त साहेबांनी सहा कोटी असे प्रस्तुत केले तर ४५ कोटी रुपयाची या ठिकाणी नोंद व्हायला पाहिजे. परंतु आम्ही प्रत्यक्षात हे करित असताना मुळ परिपत्रकाला एका साईडला ठेवून डावलून आम्ही आमची सुरु केलेली आहे. ती पण अत्यंत खेदजनक बाब आहे. सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. उपआयुक्त साहेब आपणच बघा. आयुक्त साहेबांनी जी काही माहिती आपल्याला दिलेली आहे त्याचा जरी आपण विचार केला तर ३९.५० कोटी रुपये जेव्हा वाढ धरलेली आहे तेव्हा आपल्याला हे निश्चितपणे दिसते की, त्याच्यामध्ये सहा कोटी तर उरलेली रक्कम किती? म्हणजे उरलेली रक्कम ३३ कोटी आली. तुम्ही जर असे म्हणत असाल की, टेन्डरची रक्कम आम्हाला २९.७० कोटी रुपये धरायची आहे तीही चुकीची आहे. म्हणजे याचा अर्थ असा आहे की, आयुक्त साहेबांनीसुध्दा हा विचार करुनच ३९.५० कोटी आहे. मग त्यांनी सहा कोटी वाढविले का नाही? ३० कोटी जर तुमचे २००३-०४ चे उत्पन्न होते. तर सहा कोटी धरुन ३६ कोटी झाले असते आणि स्थायी समितीने जी काही करवाढीमध्ये घट केलेली आहे. म्हणजे करवाढीमध्ये कमी केलेली आहे तर त्यांची सुध्दा ३४ कोटी झाली असती आणि म्हणून कुठेतरी अशा प्रकारे आकड्यांच्या रचनेमध्ये इनडायरेक्टली ऑर डायरेक्टली अभियकर्त्याचा फायदा करुन द्यायचा प्रशासनाचा प्रयत्न असेल तर तो या ठिकाणी स्पष्टपणे त्यांनी निवेदन केले पाहिजे की, याद्वारे एक दुसरी बाब अतिशय महत्वाची आहे अनुक्रमांक १३ ते अनुक्रमांक ५७ मध्ये जकातवाढ प्रस्तुत केली आहे. प्रशासनाने ही बाब ह्या ठिकाणी स्पष्ट करावी की, जकात जी वाढ केलेली आहे ती अनुक्रमांक १३ ते ५७ मध्ये याद्वारे नक्की साडे चार कोटीची वाढ होणार आहे की, सहा कोटीची आणि ती होणार तर त्याचा बेस काय? तुम्ही या डिसीजनला कशा प्रकारे आलात? किती करोड रुपयांचा माल आमच्या भाईंदरच्या हद्दीमध्ये येत आहे तशा प्रकारची नोंद आमच्या जकातीच्या दरवाजावर जिथे जकातीला प्रवेश करताना जकात घेतली जाते त्या ठिकाणी जशी नोंद आहे की, डबाबंद मासळी या आयटमखाली इतक्या लाख रुपयाचा माल गेल्या वर्षी आला, भारतीय मिठाई इतक्या लाख रुपयांची आली, ३१ क्रमांकाखाली फटाके आले, ३२ क्रमांकाने दिपमाला आणि इतर हे सगळे आयटम आहेत. इतक्या वस्तू इतक्या कोटी रुपयाच्या गेल्या वर्षी आल्या. त्या इतक्या कोटी रुपयांच्या ह्या वर्षी येणार आहेत आणि म्हणून त्याच्यावर वाढ ६० पैशाच्या जागी १ रुपया, दोन रुपयाच्या जागी ३ रुपये अशी धरली तर ती साडे चार कोटीच होते किंवा सहा कोटीच होते. याच्यापेक्षा कमी किंवा जास्त होत नाही याबाबत स्पष्ट निवेदन इथे आयुक्तांनी करणे गरजेचे आहे. पहिले असे निवेदन आहे की, ज्या ठिकाणी आपण शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे मागणी ह्या ठिकाणी नोंदवायला पाहिजे कारण तुम्ही टेन्डर कराल. टेन्डर प्रत्यक्ष उभारली जाईल ती नंतरची कारवाई. परंतु बजेटमध्ये आम्हाला जी मागणी ठरवायची ती आम्हाला प्रत्यक्ष कायद्यान्वये शासनाने ठरवून दिलेल्या नियमानुसार आम्हाला किती मिळाले पाहिजे? ती आम्ही लिहायला पाहिजे हे नाही की, टेन्डर २९.७० चे झाले. मग त्याच्यावर १५ टक्के पुढच्या वर्षी २० टक्केच टेन्डर आले मग शासन त्याला मान्यता पण देइल कारण मागच्या वर्षीच्या आपल्याला अनुभव आहे एक टेन्डर आले तरी शासन मान्यता देते अर्धे आले तरी देतील २० कोटीचे आले तरी देतील आणि दहा कोटीचे आले तरी देतील. मग पुढच्या वर्षाला आम्ही १० कोटी अधिक १५ टक्के अशी मागणी धरायची का? हे संपूर्णपणे चुकीचे आहे, पध्दतच चुकीची आहे. कृपया याच्यावर आपण निवेदन करा. तिसरी बाब मघापासून एक किंवा दोन तासाच्या चर्चेमध्ये जकातीबद्दल जे काही प्रश्न या ठिकाणी आले, वर्षभरात नक्कीच अशा प्रश्नावर आपण काही सोडवायचा प्रयत्न केला नाही म्हणून आजच्या बजेटला सभेमध्ये प्रश्न आले. कधीही प्रशासनाने हे पाहिजे नाही की, जेंव्हा जकात अभिकर्ता एखादा आयाती माल घेउन येतो तो सांगतो माल आठ टन आहे, वजनाची पावती आहे तरीसुध्दा अभिकर्ता सांगतो हे आम्हाला मान्य नाही, हा दहा टनाचा माल आहे. परंतु प्रशासनाने अशा प्रकारच्या कुठेही नोटिसा लावल्या नाहीत की, वजनाची कुठली स्लिप ग्राह्य धरावी. जवळच्या काट्यावर करुन आणलेला वजनकाटा मग तुम्ही अशा अभिकर्त्याला इन्सिस्ट का करित नाही? की जर तुला हे वजन मान्य नसेल तर तुझ्या खर्चाने हे वजन करुन घे. मग ते वजन करण्याचे साहित्य स्वतः जकातीच्या

ठिकाणी लाव आणि त्यापासून त्या वजनाची नक्की शहानिशा करुन मग पुढे आयातीकाला अशा प्रकारचा दंड कर दुसरी प्रशासनाच्या बाबतीत खेदाची बाब आहे की, एखाद्या मालाची किंमत ठरविण्याचे दस्तऐवज काय असतात? कोणीतरी क्ष व्यक्तीवर फुलस्केपच्या पेपरवर लिहून दिले. या मालाचा रेट अमुक आहे तर तो मान्य करायचा नाही. ही योग्य बाब आहे परंतु एखादया कंपनीचा गेटपास इज मोस्ट ॲथॉन्टिकल डॉक्युमेंट. त्याच्यापेक्षा दुसरी कुठलीही ॲथॉन्टिक डॉक्युमेंट असू शकत नाही त्या किमतीचे मुल्य ठरविणारे तरीसुध्दा त्या गेटपासवर अभिकर्ता मानायला तयार होत नाही. प्रशासनाने अशा कधीही आयातीकांना किंवा जाहिर नोटिस लावलेल्या नाहीत की, कर ठरविण्यासाठी किंवा मुल्य निर्धारणासाठी कुठले दस्तऐवज हे समजण्यांत यावे. एक गेटपास दोन बिल, बिल कुठले तर बिलावर सेल्स टॅक्स नंबर, सेन्ट्रल सेल्स टॅक्स नंबर हा असावा, ते रजिस्टर्ड असावे, असे कुठले तरी नियम आपण कधीही लावले नाहीत. त्याच्यामुळे उद्या गेटपास घेउन येणारासुध्दा आयातिक आहे. त्याच्याकडूनसुध्दा १० टक्के रक्कम या जकात अभिकर्त्याने दंडापोटी वसुल केलेली आहे. ही सुध्दा शरमेची बाब आहे. एवढी मोठी महानगरपालिका, एवढी मोठी अवाढव्य आस्थापना, अक्राळविक्राळ कर्मचारी वर्ग अकांडतांडव मांडणाऱ्या अभिकर्त्यावर कुठल्याही प्रकारचे बंधन आणू शकत नाही. तिसरी महत्वाची बाब आहे. कुठल्याही महानगरपालिकेचे तुम्ही जेंव्हा जकातवाढीसाठी ठाण्याचे, मुंबईचे उदाहरण देता तेव्हा तुम्ही बघा तिकडची व्यवस्था कशी आहे. रेतीच्या गाड्या, विटांच्या गाड्या, मशिनरी अवजड पार्ट अशा प्रत्येकाला वेगवेगळे ट्रॅक ठरवून दिलेत. आज तुम्ही जकात नाक्यावर गेलात तर तुमची गाडीसुध्दा काढायला रस्ता रहात नाही. बी.एस.टी. आली तर त्या ट्रान्सपोर्टरला साईडला जाउन पुढे जावे लागते आणि तो म्हणतो माझी लक्ष्मणरेषा ओलांडली तर तुला आता १० टक्के दंड भरावा लागेल. हे आयातीकाला करण्यास भाग पाडणारे अभिकर्ते असतात. तेव्हा आमचे प्रशासनाचे लोक कधीही नसतात. ते असे कधीही सांगत नाहीत तुमच्या पार्किंगमध्ये या पार्किंग लेन ठरविलेली आहे. या जकातीसाठी गाड्यांसाठी लेन ठरविलेली आहे जकातीसाठी तिच लेन, ठेलेवाल्यांसाठी पण तिच लेन, टँकरवाल्यांसाठी पण तिच, टुरिस्टवाल्यांसाठी पण तिच, सगळया बि.एस.टी.साठी पण तिच आणि जेव्हा एखादा ट्रांसपोर्टर ट्राफिकच्या प्राब्लेममध्ये जेव्हा गाडी पुढे नेतो. त्याचीच वाट तो जकात अभिकर्ता पाहत असतो. लेट हिम कमिट दी मिस्टेक ॲन्ड देन वील चार्ज दी पेनल्टी आणि हे सगळे घडत असताना अनेक तक्रारी आपल्याकडे आल्या. पण छोट्या छोट्या बाबी आहेत. आपण आता सांगितले की, अनुसूचीप्रमाणे इतक्या मालाला इतकी जकात लागली पाहिजे. कुठेही अशाप्रकारची तुम्ही दरपत्रके देखील लावलेली नाहीत मॅडम सांगायला लाज वाटते की, जेव्हा महिला प्रवासी स्टेशनवर रेल्वेच्या डब्यातून उतरतात. त्यांच्या पिशवित काय असते कोण जाणे. अल्लाउद्दीन खिलजीचा जादुचा दिवा असतो की, बिचाऱ्या कुटुंबासाठी घेतलेली दादरवरुन स्वस्त मिळणारी भाजी असते. ती पिशवी अशा प्रकारे खेचली जाते की, कधी कधी त्या पिशविचे दोन तुकडे होतात आणि जकात अभिकर्ता त्यांना इन्सिस्ट करतो. पण आमचे अधिकारी किंवा कर्मचारी त्यांना संरक्षण देण्यासाठी कुठेही दिसत नाही. आपल्याकडे रेल्वे प्रवासी संघाची अनेक पत्रे आलेली आहेत. त्याचीसुध्दा आपण दखल घेतली पाहिजे. म्हणून जकात अभिकर्ते येतील जकात अभिकर्ते जातील. पण एक अग्रवाल नावाचा जकात अभिकर्ता या नगरपालिकेमध्ये लोकांना फसविण्याचा, लोकांना त्रास देण्याचा उच्चांक गाठून गेलेला आहे. ही सुध्दा बाब तुम्ही मुख्याधिकारी असताना तुमच्याच कारकिर्दित घडलेली आहे याचा आपण विचार करा आणि याच्यावर सगळ्या उपाययोजना करा. मी सांगितलेल्या दोन विषयावर कृपया स्पष्ट निवेदन करावे आणि त्याप्रमाणे त्या बजेटमध्ये तरतुद करावी जेणेकरुन तुम्हाला त्यातून वाढ करायची असेल तर अजून तुम्हाला साडे चार कोटी रुपये मिळतील. नक्कीच विकासाच्या कामासाठी जास्त पैसा मिळेल अशी माझी आपल्याला विनंती आहे कृपया निवेदन करा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

मा. महापौर महोदया सन्मा. सदस्य प्रफुल्लजी पाटील यांनी ज्या व्यथा सांगितल्या त्यांनी व्यथेमध्ये जकात अभिकर्त्यास प्रशासनाकडून सहकार्य दिले जाते ही जी भूमिका स्पष्ट केली ते प्रशासनाच्या दृष्टीने समर्थनीय नाही. वास्तविक आपणाला माहिती आहे याच वर्षी जकात आपल्या महानगरपालिकेने सुरु केली त्यांनी काही मुद्दे अर्थातच चांगले मांडले. त्यामध्ये जकात नाक्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. रस्त्यावर आता जी जकातीची वाहने थांबतात आणि ती वाहने पुढे गेल्यानंतर जर जकात अभिकर्ता जकात चोरीचा त्यांच्यावर आरोप ठेवून जर पकडत असेल अशा स्वरूपाचे त्यांनी निवेदन केले आणि त्याच्या दुसऱ्या निवेदनामध्ये त्यांनी हेही म्हटले आहे, काही त्यांनी जकातीचे उत्पन्न वाढीच्या दृष्टीनेही सुचना केल्या त्या काही सुचनाचे आम्ही निश्चितपणे पालन करु. परंतु त्यामध्ये जकात अभिकर्त्याकडून अनेक तक्रारी माझ्याकडे येतात. अनेक तक्रारींवर मी सुनावणी

दिली मा. आयुक्त साहेबांनीदेखील सुनावणी दिली आणि यामध्ये आमच्या असे निदर्शनास आले की, एखाद्या वस्तूची किंमत पाच लाख असते आणि आयातिक फक्त २५ हजाराचे बिल आणतो. हे कसे समर्थनीय असू शकेल? अनेक याच्यामध्ये अंडरव्हॅल्यू किंमत राहते आणि आमच्या काही प्रकरणात असेही निदर्शनास आले की, जकात अभिकर्त्याला प्रोटेक्ट करण्याचा प्रश्नच नाही. तसे आम्ही कधीही प्रोटेक्ट केलेले नाही. उद्देश असा आहे की, अंडर एस्टिमेट व्हॅल्यु आज जर कोणी बिलाचे आणत असेल तर ते निश्चीतपणे समर्थनीय सुध्दा नाही आणि मोठ्या प्रमाणात तक्रारी ह्याच जास्त असतात असे आमच्या निदर्शनास आले. प्रामुख्याने तक्रारीचे निराकरण करताना आता काही महिन्यापूर्वी आम्ही तीन शिफ्टमध्ये, तीन जकात अधिकारी तिथे नियुक्त केले आणि त्यांना तिथल्या तिथेच समस्या सोडविण्यासाठी सुचना देण्यात आलेल्या आहेत आणि अनेक प्रकरणात आपण जे सांगितले की, रेल्वेच्या ट्रॅकवर जात असताना एक सुटकेस उघडली गेली आणि त्या सुटकेसमध्ये कोणीही ५० किंवा १०० घड्याळे आणत नसतो. त्या सुटकेसमध्ये जवळ जवळ १५० घड्याळे होती, कॅल्क्युलेटर्स होते आणि अशा अनेक जकातपात्र मालाच्या वस्तू ह्या सुटकेसच्या माध्यमातून मोठया प्रमाणात साड्या सुटकेसमधून येतात आणि त्या साड्या ह्या काही घरगुती स्वरुपासाठी एक दोन साडया राहणार. ५० ते १०० साड्या ह्या घरगुतीसाठी नाहीत आणि त्या सुटकेस मोठया प्रमाणात रेल्वेच्या माध्यमातून येते आणि गेल्या वर्षभरात आम्ही जकातीच्यासाठी जकात उत्पन्न वाढीच्या दृष्टीने मा. आयुक्त साहेब यांनी जो प्रस्ताव सादर केला, सन्मा. सदस्य प्रफुल्लजी पाटील यांनी प्रस्तावित केले की, अगोदर सहा कोटीच्यामध्ये तरतूद केली. परंतु स्थायी समितीने ती तरतुद केवळ १३ आयटमवरच ती ग्राहय धरली बाकी इतर आयटम त्यांनी डिलीट केले. त्यामुळे ही काही एवढ्या मोठया प्रमाणात पूर्वी सहा कोटी पकडण्यात आली होती ती सहा कोटी शक्य होणार नाही. कारण ती स्थायी समितीने केवळ १३ आयटमच त्यामध्ये ग्राह्य धरलेले आहेत आणि त्यांच्या इतर सुचनांचा आम्ही निश्चितपणे विचार करु आणि अशा तऱ्हेचे पुढच्या वेळी जकात अभिकर्ता त्यांनी सांगितल्याप्रमाणे नवीन नियमसुध्दा आम्ही प्रस्तावित केलेले आहेत. येत्या काही दिवसांतच ते नव्याने केलेले नियम हे आपल्या सभेत मंजुरीसाठी येणारच आहेत लवकरात लवकर ते नियम पण सादर करण्यात येतील जकात अभिकर्ता कोण असावा? येणार जाणार त्याबद्दल काही वाद नाही. हा अभिकर्ता पुढच्या वेळी राहिल किंवा राहणार नाही. त्याच्याशी आम्हाला प्रशासनाशी काही संबंध नाही. परंतु जकात अभिकर्ता पुन्हा अशा तऱ्हेची जर हे होत असेल तर त्याच्यावर निश्चितपणे आम्ही वेळोवेळी सुनावणी देउन कारवाई केलेली आहे आणि करत आहोत. पुढेही करणार धन्यवाद.

**शशिकांत भोईर :-**

आपल्या प्रशासनाने एक पत्र दिलेले आहे. जी आयात करणार आहे त्याला पण पत्र देउनसुध्दा आपल्या महापालिकेचे पत्र आहे, पत्र देउनसुध्दा तो माल का सोडण्यात आला नाही? ते स्पष्टीकरण सांगितले नाही. आपण तीन अधिकारी ठेवले हे साहेबांनी स्पष्ट सांगितले. त्यांच्यावर काय कारवाई करतात? त्याचे स्पष्टीकरण दिले नाही. आम्ही तीन ठेवले पण काय गणपती मांडले की, गौर मांडली. ते सांगायचे स्पष्ट करा. त्यांच्यावर काय आशिर्वाद देतात की, नुसते हात बांधून बसले की, अभिकर्ता त्याच्यावर पिस्तूल ठेवून बसला आहे असे त्यांनी स्पष्टीकरण त्यांनी का केले नाही? आताही ती व्यक्ती तिकडेच आहे तर मग आपला अधिकारी काय करतो? ते स्पष्टीकरण केले नाही. तुमच्या पत्राची अवहेलना करतो त्याच्यावर तुम्ही काही बोललात की नाही. आम्ही हे केले ते केले. पण तुम्ही पत्र दिले त्यावर काय ॲक्शन करतात? तुमच्या पत्राला जुमानत नाही आणि दिडशे घड्याळे तुम्ही दाखविली.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेब आपण लोकलमध्ये विदाउट तिकीट बसल्यानंतर आपणाला तुम्ही जर म्हटले मी भाईंदर हुन बसलो होतो. तिकिट चेकर तुम्हाला विरार पासूनच फाईन लावणार.

**शशिकांत भोईर :-**

साहेब ते चुकीचे आहे मी तुमच्यावर आरोप करतो. तुम्हाला स्पष्टीकरण जमत नाही. ज्यावेळी प्रवासी ट्रेनमध्ये बसेल तेव्हा तो टी.सी. पकडेल. प्लॅटफॉर्म वर जाउन तो तिकिट काढत असेल तेव्हा तो प्रवाशाला पकडणार नाही.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेब मी त्याला सख्त अशा सुचना दिल्या आहेत आणि मला आता हे माहिती नव्हते आता तुम्ही विषय सांगितला की, अद्याप माल सोडलेला नाही. परंतु मी त्याला परवा दिले पण काल तो मला भेटला नाही.

**शशिकांत भोईर :-**

तुमच्या त्या पत्राला डिमान्डच नाही. मग तो कोणत्या शरमेने येईल. तुमच्या महापालिकेची इज्जत नाही असे तुम्ही स्पष्टीकरण केले. १५० घड्याळे पकडली. त्यावर त्यांनी किती पेनल्टी आकारली? त्याचे स्पष्टीकरण केले का? आणि वसुली नगरपालिकेमध्ये जमा केली आहे का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

आपल्याला या संदर्भात सर्व स्पष्टीकरण अजित पाटील यांनी दिलेले आहे किती दंडात्मक वसुली केली?

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही बोललात की, १५० घड्याळे पकडले आणि त्याच्यावर काहीतरी त्यांनी कारवाई केली असेल. मग त्याच्याकडून किती वसुली केली? ते त्यांनी सांगितले नाही. त्याची १५० घड्याळे दाखविली. कॅल्क्युलेटर होते ते पण दाखविले.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

त्याची वसुली झालेली आहे

**शशिकांत भोईर :-**

साहेब तुम्ही त्याची बाजू मांडत आहात हे आता स्पष्ट दिसते. हे केले ते केले. सोमवारी पत्र दिलेले आहे. त्याचा त्याने अपमान केलेला आहे. आतापर्यंत त्या पत्राला किंमतही दिलेली नाही. तर तुम्ही अशा अभिकर्त्याला पाठीशी राखून काय करणार? तुमचे त्याबद्दल काय म्हणणे आहे?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

त्याच्याबाबत निश्चित कारवाई केली जाईल.

**शशिकांत भोईर :-**

कधी.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

आजच केली जाईल.

**शशिकांत भोईर :-**

कॉन्ट्रक्ट संपल्यावर करु नका एवढे निश्चित.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. जकातीच्या संदर्भात आज सभागृहामध्ये सर्वच सन्मा. सदस्यांनी जकातीच्या वसुलीच्या विरोधात एकंदरीत विरुध्द असा सुर काढलेला आहे आणि माझेसुध्दा याबाबत तेच मत आहे. प्रथम महापालिकेने ज्यावेळेला त्याला जकातीचा ठेका दिला त्यावेळेला आपण अटीशर्ती त्याच्याकडून मंजुर करुन घेतल्या गेल्या नाही आहेत आणि त्यांनी त्या करुनसुध्दा दिल्या नाही आहेत. पहिली चुकी आपली तिथे झाली. सभागृहापुढे ठेवल्यासुध्दा नाही आहेत असेसुध्दा आहे. दुसरी चुकी जकातीचा ठेका करित असताना जकात ज्या ज्या नाक्यावरुन वसुल केली जाते, लाल दिवे लावले जातात आणि असे कुठेही लाल दिवे लावले गेले नाही आहेत. आज मिरा भाईंदरमध्ये त्याचे एवढे नाके आहेत. आजुबाजुच्या महापालिकेमध्ये बघा. प्रवेश करतानाच त्यांचे लाल दिवे आहेत थांबा जकात भरा आणि पुढे चला अशी सोय मिरा भाईंदरच्या कुठल्याही नाक्यावर महापालिकेच्या किंवा त्या ठेकेदाराच्या वतीने कधीही केलेली नाही आहे. प्रथम महापालिकेची चुकी इथेच झालेली आहे. मिरा भाईंदरमध्ये नवीन येणारा व्यक्ती किंवा माल घेउन येणारा किंवा अन्य व्यक्ती त्याला तिथे कुठल्याही पध्दतीचा सिग्नल दिसला नसल्या कारणाने तो डायरेक्ट आतमध्ये येतो आणि डायरेक्ट आतमध्ये गेल्यानंतर त्याच्यामागे हे जकातकर्ते एखादया कुठल्यातरी पिक्चरच्या स्टाईलमध्ये त्याच्यामागे गाडी घेउन धावतात आणि मग त्याच्यावर आपले कुठले क्षेत्र आहे? त्या त्या क्षेत्राच्या बाहेरसुध्दा आपला लाल दिवा नाही आहे आणि त्याला पकडून अशा पध्दतीने फिल्मी स्टाइलमध्ये पकडून सगळया बाजूने घेराव घालून त्याच्याकडून जुलमी वसुली केली जाते आणि ते प्रकरण इथे महापालिकेमध्ये येत नाही. त्याच्याकडून त्याच्या दंडाची वसुली केली जाते. माझ्या अशा चार पार्ट्यांकडून त्यांनी वसुली केलेली आहे आणि ते इथे आलेले नाही आहेत म्हणजे त्यांच्याशी माझा संपर्क झाला असे पण ते इथे आलेले नाही आहेत एकाकडून त्यांनी २५ हजाराची रक्कम वसुली केली, तीन हजाराची पावती झाली, बाकी गडप. बाकीच्यांकडून त्यांनी १५ हजाराची रक्कम वसुली केली, दोन हजाराची पावती झाली, बाकी गडप. महापालिकेला ही दंडाची रक्कम वसुल करता येत नाही. महापालिकेचे नुकसान होत आहे तरी या महापालिकेच्या प्रशासनाचे डोळे अजूनसुध्दा उघडत नाही आहेत. याच्यावर कठोर जुलमी वसुली चाललेली आहे. आज मिरा भाईंदर महापालिकेमध्ये आपण औद्योगिक वसाहतीमध्ये ३० ते ३५ टक्के कंपन्या या मिरा भाईंदर सोडून अन्य विभागामध्ये गेलेल्या आहेत. अन्य ज्या काही राहिलेल्या

आहेत त्यामध्ये पूर्ण अलबेल म्हणजे चार वाजता या पूर्ण कंपन्या सामसुम झालेल्या आहेत. हे कशामुळे झालेले आहे? याचे जरा आपण पृथक्करण करुन घ्या. आज आपण इथे जकात वाढवतो आहे पण येणारी जकात आपल्याला मिळणार आहे काय? याचेसुध्दा भान ठेवा. माझे म्हणणे आहे जकात मिळाली पाहिजे. जकात चांगल्या पध्दतीने वसुल झाली पाहिजे आणि प्रशासनाने कारखानदारांना चांगल्या पध्दतीचे सहकार्य करायला पाहिजे. चांगल्या सवलती द्यायला पाहिजेत तरच आपल्याला जकात वाढेल ही अशी जुलमी जकात वसुली करुन मिरा भाईंदरमध्ये औद्योगिक वसाहती उभ्या राहणार नाही आहेत आणि आज मिरा भाईंदरच्या वसुलीमध्ये मिरा भाईंदरच्या विकासामध्ये जकात हा मुख्य भाग आहे म्हणून आपल्याला तो डावलता येणार नाही आहे. मा. महापौरांना, सन्मा. सभागृहाला मी तशी विनंती करतो, जकातीच्या संदर्भात खरोखरच सखोल आणि चांगल्या पध्दतीने विचार करुन मिरा भाईंदरचे जकातीचे उत्पन्न चांगलेच वाढेल अशी मी आजच्या या सभेमध्ये विनंती करतो.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम जकात के उपर बहुतही डिस्कशन हो गया। सारे नगरसेवक की एकही मागणी है की, अधिकारी कोई खराब होता नही है। केलकर साहब अपनी कोशिश करते है। पत्र भी देते है लेकिन सब कुछ ठिक है। लेकिन अग्रवाल करके जो हमने ठेकेदार लिया है। वो आदमी मुझे ऐसा लगता है, प्रशासन और शासन दोनो के उपर हाव्ही हो गया है तो मुझे ऐसा लगता है, मैने आज भी मागणी किया है की उसका टेन्डर टर्मिनेट करो। और उसकी डिपॉझिट जप्त करो। ऐसे मागणी का समर्थन मिला है।

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते, आताच आपल्याला केळकर साहेबांनी सांगितले की, साड्यांचा विषय निघाला होता. साड्या सुटकेस मधून आणतात. पण साहेब मी काय म्हणते लग्नासाठी काही नागरिक साड्या आणतात. या साड्यांनासुध्दा हा जकात कर लावला जातो. साहेब हे चुकीचे आहे. हा लागू नये कारण ज्यावेळी ती लोक सांगतात आमच्या घरी लग्न आहे आज ५०-१०० साड्यासुध्दा आम्ही आणू शकतो. मग त्याच्यावर सुध्दा जकात लावतात. ते व्यवसाय करित नाही लग्नासाठी आणलेल्या साड्यांनासुध्दा त्याच्यावर जकात लावली जाते हे चुकीचे आहे. त्याच्यावर आपण लक्ष द्यावे आणि वर्षातून एकदाच येतो. दहा वेळा कोणी लग्न करित नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या २००४-०५ चा मुळ अर्थसंकल्प सुरुवातीला आमच्याकडे म्हणजे स्थायी समितीला सादर झाला. त्यामध्ये जवळजवळ तीन-चार दिवस बहुतेक सर्व प्रकरणावर सर्व विभागावार आर्थिक तरतुदी करण्याकरिता जसे जसे विभागाने स्वतःची जमेची आणि खर्चाची बाजू याचे अंदाज सर्वप्रथम प्रशासनाने म्हणजे मा. आयुक्तांनी आमच्याकडे स्थायी समितीला दिले. त्यानंतर स्थायी समितीने एकमात्र आहे की, जसे आयुक्तांनी जे अंदाज दिले तसे अंदाज स्थायी समितीने बिल्कुल मान्य केले नाहीत. त्याच्यामध्ये बऱ्याचश्या ज्या ज्या तफावती आम्हाला आढळल्या त्या तफावती स्थायी समितीतील विरोधक या नात्याने आम्ही त्या त्या वेळेला मांडल्या. त्या वेळेला माझ्या समवेत भारतीय जनता पार्टीचे तीन नगरसेवक, शिवसेनेचा एक नगरसेवक, आणि मी स्वतः जनता दलाचा एक नगरसेवक, तीनपैकी दोन दिवस हजर असलेले आघाडीचे सन्मा. सदस्य अशोक पाटील या सर्वांनी याच्यावर आपापल्या सुचना मांडल्या. त्या सुचना मांडत असताना स्थायी समितीचे सभापती मा. मॉरस रॉड्रिक्स यांनी त्याच्यावर कोणताही आखडता हात न घेता या सर्व सुचनांचा विचार करुन या अर्थसंकल्पामध्ये त्यांची नोंद करुन घेतली या ठिकाणी अनेक लोड ज्या नोंदी झाल्या नव्हत्या. त्या नोंदी सुध्दा या पुस्तकामध्ये करुन घेतल्या. मघापासून बसुन मी ते पाहिले की, या नोंदी केलेल्या आहेत की नाहीत. माझे मित्र सहकारी नगरसेवक सन्मा. ओमप्रकाशजी अग्रवाल यांनी मघाशी सभागृहामध्ये जो उल्लेख केला आणि जकातीचा ठेका एक वर्षा अगोदर या सभागृहामध्ये ज्या पध्दतीने दिला गेला ती पध्दतीच मुळ वादांकित होती. त्यावेळेला मात्र या सभागृहानी सर्वांनी त्याला समर्थन केले. भले महापालिकेची आर्थिक बाजू असो किंवा नसो. स्वतःच्या घरचा कर्ता पुरुष कमाई करुन आणतो. पण ती कुठल्या प्रकारे कमाई करुन आणतो त्याच्यावर त्या घरातील चारित्र्य म्हणा किंवा जो एक चांगला भाग असतो तो अवलंबून असतो. उद्या एखाद्या ठेकेदाराने चोऱ्या माऱ्या करुन महापालिकेची तिजोरी भरली तर त्याचे वाईट परिणाम आपल्याला भोगावे लागणार आहेत आणि ते आपण आता भोगतो आहे. हे त्याच वेळेला आम्ही सांगितले होते. ज्यावेळेला चुकीच्या पध्दतीने ठेका या प्रशासनाने तिकडे पास केला आणि बहुसंख्य नगरसेवकांनी त्याच्या बाजूने मतदान केले ही धोक्याची घंटा त्याचवेळेला वाजली होती. ज्यावेळेला आम्ही विरोधी पक्षामध्ये चार नगरसेवकांनी मतदान केले आणि आता आम्हाला कळून चुकले आहे आणि

पटत आहे त्यावेळेला चार नगरसेवकांची जी भूमिका होती ती योग्य होती अयोग्य नव्हती. आज या अर्थसंकल्पामध्ये पान नं ६ वर खाली जी एक कोटी रुपयांची तरतूद केली. ती सुध्दा स्थायी समितीमध्ये ही तरतूद करतेवेळी प्रशासनाबरोबर मला स्वतःला भांडावे लागले. कारण प्रशासनाने ही तरतूद पूर्णपणे केलेली नव्हती. याचाच असा अर्थ आहे की २००३-०४ या सालामध्ये दंडच दाखविला नव्हता. म्हणजे येण्याचा प्रश्नच येत नाही. ही प्रशासनाची भूमिका होती. कारण बजेटमध्ये ती तरतुद नव्हतीच. पण यावेळेला एक कोटी रुपयानी ती तरतुद करायला लावलेली आहे. कारण जर तरतुद असेल तर येणे का आले नाही? हा पुढच्या सभेत आपल्याला विचारायचा अधिकार आहे किंवा जर एक कोटी रुपयाची तरतूद आहे. तर आतापर्यंत दंड किती वसुल झाला? मी त्या विषयावर आमच्या सन्मा. उपआयुक्तांना बोललो की, जवळजवळ नऊ ते दहा महिन्यामध्ये ठेकेदाराचा एकही रुपया आपल्याकडे वादादीत रक्कम म्हणून जमा झालेला नाही आहे. सगळयात उत्तम आणि चांगला उपाय आहे की, त्याला आपण गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये त्याचे नाव दिले पाहिजे. म्हणजे महाराष्ट्रात बऱ्याचश्या महानगरपालिका त्याला इन्व्हाईट करतील आणि न टेन्डर घेता त्याला टेन्डर देउन टाकतील. कारण त्याच्यासारखा चांगला कोणीच ठेका घेतलेला नाही आणि पैसे पण आणून दिलेले नाहीत. केळकर साहेब एकतर या सर्व चर्चेच्या अगोदर सर्वात पहिला जो मागच्या महासभेला मी प्रस्ताव मांडला होता त्यामध्ये माझा एक प्रस्ताव ऑक्ट्रॉयच्या संदर्भात पण होता. त्या वेळेला पत्र क्र. जावक क्र. मनपा आयुक्त ११७/११/७/७०/२००३-०४ दिनांक १७-२-०४ ला आयुक्तांनी मला एक पत्र दिलेले आहे. विषय मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण १(२)१ चे ज नुसार प्रस्ताव स्वीकारणेबाबत जकातीबाबत आपला १६/०२/०४ चा प्रस्ताव मिळाला. त्याबाबत १७/२/०४ च्या बैठकीत चर्चा झाल्याप्रमाणे त्यास अनुसरुन कळविण्यात येते की संबंधित जकात अभिकर्त्यास पुढिल स्थायी समितीवर चर्चा करण्याकरिता बोलावण्यात येईल. याच्यावर मा. आयुक्तांची सही आहे आणि हे आश्वासन मिळाल्यानंतर मी माझा प्रस्ताव मागे घेतलेला आहे ही चर्चा सुरु होते वेळीच आपण पटकन प्रशासनाच्या वतीने सर्व सदस्यांना माहिती द्यायला पाहिजे होते की, येत्या स्थायी समितीसमोर किंवा गटनेत्यांच्या सभेत परत ठरल्यानुसार गटनेते स्थायी समितीचे सदस्य यांचेसमोर त्या अभिकर्त्यास इथे बोलवणार आहोत. सर्व सन्मा. सदस्य या ठिकाणचे जे व्यापारी प्रतिनिधी आहेत या सर्वांनी जकात अभिकर्त्याच्या विरोधात ज्या ज्या काही अनुभव आणि तक्रारी किंवा पुरावे असतील ते त्या सभेमध्ये सादर करावेत असे आपण प्रशासनाच्या वतीने मांडायला पाहिजे होते. आपण जे मांडले नाही आज आपण जे मांडले नाही ते मला मुद्दामहून इकडे सगळयांच्या समोर सांगावे लागते. कारण जनतेला या लोकप्रतिनिधीना हे कळले पाहिजे की, जो ठेकेदार जवळजवळ दहा दहा महिने आपल्याला त्रास देत आहे. कोणाच्या संगनमताने ते तर मी त्यावेळेला बोलून गेलो आपल्याला मी स्थायी समितीमध्ये बोललो आपल्याला ते वाईट वाटले पण आम्हाला नाक्या नाक्यावर लोक बोलतात. तुम्ही पटकन सभागृहाचा त्याग करुन गेलात. सभापतींची परवानगी न घेता. आम्ही काय गावचा आणि महापालिकेचा त्याग करायचा का? प्रत्येक व्यापारी दुकानात अडवून आम्हाला बोलतो. आम्ही या शहराचा त्याग करु शकत नाही आम्ही आमच्या व्यथा तुम्हाला कळविल्या. या ठिकाणी जकात अभिकर्त्याबददल बोलायचे झाले तर पूर्ण दिवस ही सभा चालेल. तिकडे असाही एक प्रश्न उपस्थित झाला की, महासभेमध्ये त्याला बोलवा. माझी सुचना होती जर एम.टी.एन.एल.चे अधिकारी येऊ शकत असतील, जर बी.एस.सी.एस.चे येउ शकत असतील, आणखी एखादे कुठले अधिकारी आपण आपल्या महासभेत मागे स्टेमचे आले. हा त्यांच्यापेक्षा काय उंच नाही आहे हा आपलाच सब-कॉन्ट्रक्टर आहे. ज्या दिवशी तुम्ही बोलवाल तो पटकन हजर झाला पाहिजे. या महापालिकेच्या सत्ताधारी पक्षातील एक नगरसेविका महिला नगरसेविका, ज्येष्ठ नगरसेविका त्या ऑक्ट्रॉय नाका नंबर ७ वर त्यांची एवढी अवहेलना केली की, ती बाई तिथे ढसाढसा रडलेली आहे हे लक्षात ठेवा. राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि कॉंग्रेसवाल्यांना खास करुन माझे सांगणे आणि विचारणे आहे ही परिस्थिती आपल्या पक्षानेच आपल्या नगरसेविकेवर आणलेली आहे. तुमच्या पक्षाची नगरसेविका नाक्यावर खऱ्या प्रकरणात भांडायला गेली असता तिचा घोर अपमान केला आणि ही सन्मा. नगरसेविका त्या नाक्यावर रडलेली आहे. त्या नगरसेविकेची अवस्था मला काशिमिरा पोलिस स्टेशनमध्ये कळली. तिकडच्या अधिकाऱ्यांनी मला सांगितले की, साहेब हे फार चाललेले आहे. काशिमिरा पोलिस स्टेशनमध्ये सब इन्स्पेक्टरने सन्मा. सदस्या जयाबाई भोईर, काकी यांचे नांव दिले गेले. त्या भले बोलत नसतील. पण मला काशिमिराच्या सब इन्स्पेक्टरने नाव दिले. मी पहिले नाव दिले नव्हते. लक्षात ठेवा, हा प्रश्न महत्वाचा नाही आहे. या पूर्ण दहा महिन्यामध्ये नगरपालिका प्रशासनाचे जर असे म्हणणे असेल त्या ठेकेदाराने जर व्यवस्थित काम केले असेल तर आतापर्यंत दहा महिने त्यांनी एकही ताबा पावती घेउन दिलेली नाही. या दहा महिन्यामध्ये ठेकेदाराने नियमाच्या तरतुदीनुसार कधीही ताबा पावती त्या माणसाला कुठल्याही आयातीकाला दिलेली

नाही. त्यांचे ट्रक त्यांनी आपल्या ताब्यात ठेवले आहेत. त्यांचा माल त्यांनी आपल्या ताब्यात ठेवला आहे. नियमानुसार ही ताबा पावती दिली गेली पाहिजे. ती आजपर्यंत दिली गेली नाही. एका प्रकरणात रात्री तीन-तीन वाजेपर्यंत जागून ती ताबा पावती काशीमिरा पोलिस स्टेशनमध्ये त्यांच्याकडून घेतलेली आहे. प्रशासनाचे काम नाही आहे. ताबा पावतीचे पुस्तक महानगरपालिकेने दिले पाहिजे जसे टी.एम.सी.मध्ये आहे. टी.एम.सी.मध्ये जर एखादा वाद उत्पन्न झाला तर डिपॉझिटची रक्कम ताबा पावतीची रक्कम दंडात्मक पावतीची बुक आता जो मघापासून जो दोन तीन तास वाद चाललेला आहे. त्यांच्याकडे आपण दंडात्मक पावतीची बुक दिलेलीच नाही आहेत. तो ऑक्ट्रॉयच्या पावत्या फाडून देतो. मॅटर सेटल होतो. लाखपैकी २५ हजारामध्ये जर प्रकरण याच्यामध्ये जर आपल्याला त्यांच्याशी समझौता झाला तर त्या २५ हजाराची जी रक्कम ऑक्ट्रॉय म्हणून दाखवतो जकात म्हणून दाखवितो म्हणून आपल्याकडे एकही रक्कम एक रुपया एवढया नउ दहा महिन्यामध्ये वसुल झालेली नाही. प्रशासनाने मला लेखी दिलेली आहे. माझी स्वतःची उच्च न्यायालयामध्ये केस याबाबत आहे ती चालू आहे केस बंद झालेली नाही आहे आणि ही पुढेदेखील चालू राहणार आहे. प्रशासनाने लेखी दिलेले आहे. की दहा महिन्यामध्ये कुठेही दंडाची एक रुपया रक्कम वसुल झालेली नाही. आपल्या महापालिकेचे बजेट हे सेन्ट्रलचे लोक तपासणी करणार आहेत. आपली जी इकडच्या बजेटची ऑडीटची जी काही तपासणी आहे. ती सेन्ट्रलवरून होणार आहे. तिथेसुध्दा हा मुददा उपस्थित होइल की, दहा महिन्यात एकही वाढ निष्पन्न झालेली नाही. कुठल्याही याच्यामध्ये आपण साधा हाउस टॅक्स जरी घेतला तरी त्याच्यामध्ये वाद होतो. तर या एवढ्या मोठया रकमेत एकही वाद उपस्थित झालेला नाही आहे. या ऑक्ट्रॉयच्या संपूर्ण ह्याच्यामध्ये अभिकर्त्याला लवकरात लवकर बोलवावे अशी माझी या सभेमध्ये नम्र विनंती आहे. बाकी बजेटमध्ये संपूर्णपणे शिक्षण विभाग याच्यावर आम्ही कुठलीही दरवाढ सुचविलेली नाही. आणखी एक सांगतो आपल्याला या महापालिकेचे आता आणखी अभिकर्त्याकडून बदनामीचे हे चालू आहे की संपूर्णपणे ऑक्ट्रॉयवर चार टक्के वाढ केलेली आहे. केळकर साहेब हे बघा नीट लक्षात घ्या. ही महासभा झाल्यानंतर महापालिकेच्या वतीने लगेच तुम्ही प्रेसनोट घेतली पाहिजे. प्रेस कॉन्फरन्स घेतली पाहिजे. आमच्याकडे व्यापारी वर्ग येउन भेटतो की पूर्वीपेक्षा प्रत्येक हयाच्यावर आपण चार टक्के दरवाढ केलेली आहे. आणि त्याला रितसर मान्यता मिळाली आहे. महासभेत जर आपण ही दरवाढ चार टक्के केलेली नसेल तर आजच्या आज प्रशासनाने याचा खुलासा केला पाहिजे आणि तो आपण करावा कारण त्याचा फरक पटकन त्या चेकनाक्यावर पडणार आहे आणि या चेकनाक्यावर अजूनसुध्दा आपली दरसुची कुठल्याही याच्यावर लावलेली नाही. ती जाहिररित्या आपली दरसुची ठेवली पाहिजे. म्हणजे बाकीचे अन्य वाद होणार नाहीत. बहुतेक या बजेटमध्ये ज्या ज्या सुचना आम्ही आमच्या मांडल्या त्या संपूर्णपणे आलेल्या आहेत. अनेक नवीन नवीन प्रस्तावित प्रकल्प, नाट्यगृहे, क्रिडांगण वगैरे यांचा विकास, स्मशानभूमी, त्याच्यानंतर बगिचे, क्रिडांगणे, नवीन शाळा या सर्वांचा याच्यामध्ये उल्लेख आहे. उल्लेख करण्यासारखे भरपूर आहे. जो अगोदर वाद झाला हे वाद स्थायी समितीत सुध्दा झाले होते. त्याचवेळेला बहुतेक आम्ही त्याच्यामध्ये उल्लेखित केलेले आहेत फक्त एवढेच आहे या पुस्तकामध्ये जे वन विभागाकरिता आम्ही यापूर्वी सतरा लाखाची एक तरतुद दाखविलेली होती ती पुढच्या पानावर दाखविली पाहिजे. पान नंबर २६ वृक्षारोपण कार्यक्रम इकडे जी १ कोटी १५ लाख दाखविली आहे. त्याच्यामध्ये १७ लाख ॲड करुन १३२ करावी. ही थोडी प्रिंटींग मिस्टेक असु शकते. प्रशासनाने ती सुधारावी. तसेच थोडया ग्रॅमॅटिकल मिस्टेक झालेल्या आहेत ही जी १ कोटीची दंडात्मक रकमेची इकडे नोंद आहे ती पान नं ६ अंदाजपत्रक पार्ट नं १ वर महसुली जमा याच्यामध्ये पान नं. ६ वर ११ वर जकात चुकवेगिरी पोटी व मिळालेली रक्कम दंड १ कोटी रुपये हा जो लोड आहे हा स्थायी समितीमध्ये प्रशासनाने सुचविलेला नसताना स्थायी सर्वप्रथम हा लोड निर्माण केलेला आहे. तसेच या अंदाजपत्रकात सर्वप्रथम यावर्षी विकास आराखडा संरक्षक निधी म्हणूनसुध्दा एक नवीन निधी आपण उपस्थित केलेला आहे आणि बरेचसे नवीन काही लोड यापूर्वी नव्हते ते आपण सुधारित लोड या पुस्तकात समाविष्ट करुन घेतलेले आहेत. एकूणच जरी थोड्या जास्त रकमेचा अर्थसंकल्प झाला तरीसुध्दा कोणतीही दरवाढ किंवा करवाढ सर्वसामान्य करदाते नागरिक या ठिकाणचे जे आपल्या इकडचे व्यापारी उदयोजक आणि सर्व थरातील म्हणजे अगदी खालच्या स्तरापासून ते वरच्या स्तरापर्यंत राहणारे सर्व नागरिक यांच्यावर कुठलीही करवाढ न लादलेला असा अर्थसंकल्प असेल. तसेच ३० नंबर पानावर अंदाजपत्रक पार्ट नं. २ भांडवली खर्च याच्यामध्ये ३० नंबर पानावर ३ उद्याने विकास व नवीन बांधकाम या लोडमध्ये वन विभाग, वाहन खाते अशी नोंद करावी असे मला याच्यामध्ये सुचवावासे वाटते. पुढची जी पुस्तिका आपल्याला तयार करायची आहे. या पुस्तिकेमध्ये याची नोंद घ्यावी. वन विभाग वाहन खरेदी हे असे करावे कारण याच्यामध्ये आपण १७ लाखाची तरतुद केलेली आहे ती आपण इथे पुढच्या पानावर ॲजेस्ट केलेली

आहे.  तर त्यामध्ये या नोंदी करुन घ्याव्यात.  कोणतीही करवाढ नसलेला अर्थसंकल्प आज महापालिकेने मंजुर करावा अशी मी सभागृहाला विनंती करतो.

**जयाबाई भोईर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे म्हणाले की, मी अक्षरशः पोलिस चौकीत रडली हे सर्व खोटं आहे आणि मी माझ्या ताकदीने जो मनुष्य त्यांनी अडविला होता.  त्यांना मी सोडून आणलेला आहे.  मी तिथे काही रडली नाही.  मी काही माघार घेतली नाही.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे आपण नाक्यावर गेला होता ही गोष्ट खरी आहे वाद उत्पन्न झाला होता ही गोष्ट खरी आहे.

**महेंद्रसिंग चौहान :-**

झासी की रानी है।  वो क्या रोयेगी।

**मिलन म्हात्रे :-**

झासी की रानी भी रोई थी।

**जयाबाई भोईर :-**

मला झासीच्या राणीची उपमा नको.  आता तुम्ही रडली हा शब्द वापरला म्हणून मी बोलते. मी रडणारी नाही आणि मला रडायचे काही कारण नव्हते.

**रोहिदास पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो.  आपण सभागृहात २००४-०५ च्या अर्थसंकल्पावर चर्चा आपण सर्व करित आहोत.  ती चर्चा करते वेळी म्हणजे वेगवेगळया विषयावर चर्चा होणे आवश्यक असताना जकात हा एकच विषय चर्चेला आला.  याच्यावर आपण सकाळी ११.३० वाजल्यापासून चर्चा करित आहोत.  वेगवेगळया सदस्यांनी आपापल्या अनुभवांची मते मांडली.  सभागृहाने त्याची नोंद करुन घेतली असेल अशी मी अपेक्षा करतो एकतर मी पहिल्यांदा दोन तीन गोष्टींचा असा खुलासा मागेन की, हे अंदाजपत्रकाचे पुस्तक माझ्या हातात दिले आहे.  याच्यात प्रस्तावित वाढीव दर म्हणजे जिथे असा प्रयत्न आहे की तिथे दरवाढ झाली नाही म्हणजे तीन आधी होता आताही तीनच आहे.  असा त्यांचा साधारण बोलण्याचा अर्थ निघतो.  पण ते लिहिले आहे की, सदर प्रस्तावित वाढीव दर कदाचित ज्या पध्दतीने आता ही चर्चा चालली आहे आणि ठेकेदार आता हा नसेल उदया दुसरा असेल तरी पण तो त्याचे आजपासून कागद दाखवायला सुरुवात करेल का?  की तीन टक्क्याचे?  अजून तीन टक्के वाढले तर तिथे दरवाढ नाही.  असा जर गोड शब्द असता तर तो चांगला झाला असता असे मला वाटते.  केळकर साहेब लक्षात आले का?  मी काय म्हणतो ते ज्या ठिकाणी आपली दरवाढ वाढलीच नाही त्या ठिकाणी दरवाढ नाही असा जर शब्द असेल तर तो योग्य ठरेल.  कारण जरा गोंधळ होतो. मघापासून चर्चा झाली की, एकतर या अर्थसंकल्पामध्ये जे दिलेले आहे.  त्यामध्ये एकाच ठिकाणी दरवाढ दिलेली आहे की, जकातीचे उत्पन्न झालेले आहे.  भारतीय जनता पार्टीच्या भूमिकेतून मी स्पष्ट मांडतो.  आम्ही असे अभिप्रेत धरलेले होते की, या शहराच्या विकासासाठी अर्थ संकल्प सादर करतेवेळी आपण सर्वसामान्य नागरिकांवर कोणतीही दरवाढ कोणतीही करवाढ करु नये.  ही आमची स्पष्ट भूमिका आहे.  आज वर्षभराच्या अनुभवाने जेव्हा जकातीचा ठेका द्यायचाच होता.  ही जकात लागूच नाही.  अशा भूमिकेतून भारतीय जनता पार्टीने मत मांडले होते.  ठेकेदाराचे जुने अनुभव आपण सभागृहात स्पष्ट मांडले होते.  तरीसुध्दा त्याच ठेकेदाराला हा ठेका दिला.  इथपर्यंत ठिक आहे पण ठेकेदाराने जेव्हा ही वसुली चालू केली.  त्यांचे प्रत्येक नगरसेवकाने आपापले स्पष्ट अनुभव मांडलेले आहेत.  ते व्यक्तिगतही आहेत आणि सर्वसामान्याचे पण आहेत ही सर्व बाब लक्षात घेउन भारतीय जनता पार्टीचे आमदार जगन्नाथ पाटील यांनी या महापालिकेला मोर्चाची नोटिस दिली.  निवेदन झाले, चर्चा झाली आणि त्यावेळी महापालिकेच्या वतीने स्पष्ट अश्वासन दिले की, आम्ही तिथे तीन अधिकारी नेमू.  तीन अधिकारी नेमल्यानंतर त्यांनी किती वसुली केली?  आताही केळकर साहेब काय गोंधळतात माहिती पडत नाही.  अजित पाटीलही गोंधळले की, त्या दिवसापासून किती वसुली केली?  तेही सांगत नाही.  वसुली किती होईल?  अजून त्यांचा मार्च, एप्रिल बाकी आहे आणि १८ मे पर्यंत तरी तुम्ही वसुली पकडत नसाल तेही चूक आहे.  जशी सभागृहातील सदस्यांनी किंवा सभागृहाच्या बाहेर असलेल्या नागरिकांनी, व्यापाऱ्यांनी आपल्याकडे ज्या तक्रारी आलेल्या आहेत.  त्या तक्रारींची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून जर आपण केले तर आता जर तुम्ही सांगता की, पुढच्या वर्षी एक कोटी रुपयाचे उत्पन्न येईल.  आताच्या या तीन महिन्यामध्ये एक कोटीच्या एक तृतीयांश करा. तेवढे उत्पन्न तुम्हाला या वर्षी मिळेल ही एक बाब झाली आणि आता जसे महापौरांच्याबद्दल बोलतात हे फिलगुड आहे.  मी या जकातीच्या बाबतीत महापौरांचे किती अपयश आहे हे सभागृहाच्या समोर

आणतो. आता ही जर जबाबदारी महापौर घेणार नाही तर कोण घेणार? त्या ठिकाणी लाइन लागत नाही त्या ठिकाणी सिग्नल व्यवस्था नाही. त्या ठिकाणी जे अधिकारी नेमले आहेत. अजित पाटील यांच्याकडे कुठलाही मोबाईल नाही. एखाद्यावर माल आणणाऱ्यावर जो अन्याय होतोय त्याला असे वाटते की, माझ्यावर अन्याय झाला. अन्यायाचे निवारण करण्यासाठी अधिकारी आहेत आणि ते अधिकारी उपलब्ध नाहीत. येणारा ट्रक संध्याकाळपासून दुसऱ्या दिवशीच्या संध्याकाळपर्यंत उभा राहिल. कदाचित त्या ट्रकवाल्याची चुक असेल जशी दोन्ही बाजूचे मघाशी निवेदन झाले. आपण लक्षात घ्यायला पाहिजे की, जेव्हा १५० घडयाळे मिळाले तर आपण कारवाई करुन आपण ठोस उत्तर देउ शकले असते. पण आपण उत्तर दिले नाहीत. त्यांची बाजू मांडण्याच्या दृष्टीकोनातून आपण बोलला असाल की, जकातवाल्यांची तुम्ही बाजू घेता असेही बोलत नाही. आपली जबाबदारी काय आहे? या महापालिकेकडून सर्वसामान्याला आधार मिळायला पाहिजे, न्याय मिळाला पाहिजे. आता तरी या अधिकाऱ्यांना मोबाईल द्या की, जेणेकरुन ते मोबाईल घेउन लोकांना भेटतील, नाहीतर नुसते अधिकारी नेमले सांगून काही फायदा नाही. अधिकाऱ्यांची तिकडची उपस्थिती असल्याने आपले नोटिस बोर्ड आजही तिथे नाही आहे. त्यामुळे जर तुमच्यावर जर अन्याय तो यांच्याकडे लेखी तोंडी तुम्ही प्रत्यक्ष तक्रार करा अधिकारी नेमले पण अधिकारी तिथे २४ तास भेटत नाहीत. हा एक भाग झाला आज जकातीचा भाग करते वेळी आपण त्या ठिकाणी जकात नाक्यावर आपला नाका आहे आपण महापालिकेने प्रस्ताव त्यांना देणे जरुर आहे की त्याची व्यवस्था कशी असावी? आज त्या जागेवर या ठिकाणी येणारे मोठे ट्रक असे उभे राहतील. छोट्या गाड्या अशा उभ्या राहतील. हातात माल घेउन येणारा माणूस असा टॅक्स भरेल. पण तशी व्यवस्था आपण केली नाही. ती ठेकेदाराच्या व्यवस्थेतून झालेली आहे आणि जसे अनेक नगरसेवकांनी सांगितले की, ठेकेदार मालवाल्याला पुढे जाउ देतो आणि गाडी पुढे थांबवितो आणि थांबते वेळी तो ज्या पध्दतीने वसुल करतो. मी त्याच्यावर बोलत नाही. पण ही वस्तुस्थिती आहे ते आपले अपयश आहे. आपण त्या ठिकाणी दुर्लक्ष केले आणि म्हणून लोक त्रस्त झाले. आम्ही दरवाढीचे किंवा जकातवाढीचे समर्थन का करित नाही तर संपूर्ण मिरा भाईंदरमधील मग तो मासळीवाला असू दे. उत्तनचा कोळी जरी जात असेल तरी तो हैराण होतो. मग तो बांगडीवाला असेल तोही हैराण होतो. घरच्या घरी जो शिलाईची काम करतो. तो येणार असेल तरी तो हैराण होतो. पण हे एकच काम फक्त जकातवाढीला आपण दिले नाही. याच्याबददल महापालिकेने त्यापेक्षा सत्ताधारी पक्षाने त्या ठेकेदाराचे समर्थन केले नसते आणि त्याला जर योग्य समज दिली असती तर ते फार सोपे झाले असते. असे मला पुन्हा म्हणायचे आहे. या अर्थसंकल्पाच्या त्रुटीमध्ये मी तीन चार गोष्टी आपल्या लक्षात आणतो. की जकात न वाढवतासुध्दा आपण हाच अर्थसंकल्प खर्चाच्या बाबतीत काटकसर करुन जसे आपण म्हणतो की, दरवेळी आपण तरतुद करतो. कत्तलखान्याची तरतुद केली आजही आपल्याकडे तरतुद आहे पण प्रस्ताव नाही आहे. आज मासळी मार्केट हे मिरा भाईंदरमधील एक मोठे सेंटर आहे. डहाणूपासून मुंबईपर्यंत मिरा भाईंदरच्या हद्दीमध्ये स्टेशन जवळचे मासळी मार्केट हे आपल्याला उत्पन्नाचे साधन आहे. पण त्या ठिकाणी मासळी मार्केट व्हावे असा आपला कोणताही प्रयत्न नाही आहे की, त्यातून आपले उत्पन्न वाढेल. पण आजची स्थिती अशी आहे की, स्टेशनवरुन माणूस उतरला त्या मासळीची घाण घेउन हैराण होतो आणि त्या ठिकाणी आपण आधार न दिल्यामुळे रेल्वे पोलिस त्या गरिब महिलांना सळो की पळो करुन ठेवतात. नको ती भाषा वापरतात आणि त्यातूनही त्याचे उदरनिर्वाहाचे साधन म्हणून मासळीचा बाजार करावा लागतो. आपण आजच्या या अंदाजपत्रकामध्ये स्टेशन जवळचे मासळी मार्केट अशी कोणतीही तरतुद आपल्याकडे नाही आहे. या अंदाजपत्रकामध्ये आपण अंदाजपत्रक बनवते वेळी आपण या शहराच्या विकासाच्या दृष्टीने तरतुदी करतो. मासळी मार्केट नाही आहे. या वर्षामध्ये आम्ही या ठिकाणी सब्जी मार्केट तयार करु. असे पूर्वेला आणि पूर्वेच्या दृष्टीकोनातून पण मी तुम्हाला निश्चित सांगतो की, अशी कोणतीही योजना या अंदाजपत्रकामध्ये मी सांगू शकेन हा टिकेचा विषय नाही. पण पूर्वेला २५ नगरसेवक आहेत की, ठोस असा निधी या कामासाठी वापरला जाईल अशी यामध्ये कोणतीही तरतुद झालेली नाही अंदाजपत्रकात तरतुद नसेल तर पुढच्या वर्षी जरी आपण ठरविले तर कोणते काम करणार आहोत? महापालिकेचे जसे आज पश्चिमेला कार्यालय आहे. पूर्वेला फायरब्रिगेडचे ऑफिस होणे जरुरी आहे, पूर्वेला महापालिकेचे कार्यालय होणे जरुरी आहे, पूर्वेला दवाखान्याची इमारत होणे जरूरी आहे, पूर्वेला स्वतंत्र अशी मोठी वाचनालयाची इमारत होणे जरुर आहे पण त्या हेडखाली यात तरतुद केलेली नाही. माझी विनंती आहे की, आपण याच्यात फायनल फिगर घेते वेळी पूर्वेच्या दृष्टीने ज्या ज्या आवश्यक घटनेची तरतुद बांधकाम खात्याने तरतुद घेतली पण ती या हेडखाली म्हणून नाही. आम्हाला तरतुद पाहिजे सभापती महोदय आम्ही तुम्हाला विनंती करतो की, त्या दृष्टीकोनातून त्याची तरतुद होणे आवश्यक आहे. अन्यथा हे जे अंदाजपत्रक आहे ज्या उत्पन्नाच्या बाजू आहेत. त्याही

आपल्यासमोर आल्या आहेत. ज्या खर्चाच्या बाजू आहेत. त्याही समोर आल्या आहेत आणि जशी मघाशी मागणी केली की आपण कितीची जकातीमध्ये उत्पन्नाची मागणी करित आहात. हे कायद्यात बसून क्लिअर करुन घेतले तर फक्त एम.आर.पी. ज्याचे प्रिंटेड येते हे क्लिअर कट आहे की, आयुक्तांनी स्थायी समितीमध्ये चर्चा करते वेळी कदाचित कोणी म्हणेल की, ते स्थायी समितीमध्ये होते, भाजपाचे तीन होते, शिवसेनेचा एक होता, जनता दलाचा एक होता हे निवेदन करण्यापुरते ठिक आहे. पण त्या दिवशीचे जे होते त्या बैठकीतील तीनही दिवसाचे जे मेहनत करुन बजेट बनविले त्यावेळी अशीच भूमिका होती की, जे प्रिंटेड प्राइजवर येणार आहे सभापती महोदयांचे तर स्पष्ट बोलणे होते आमची भूमिका होती. त्यांचीही होती की, शिक्षण कर, अग्निशामक दलामधील कर आणि जकातीचे कर हा कोणताही कर वाढवायचा नाही. ही भाजपाची भूमिका होती. तरी महापालिकेवर उत्पन्न मिळावे आणि नागरिकांना त्रास होउ नये त्या लिमिटेड कंपन्या आहेत त्या लिमिटेड कंपनीच्या जर त्यातून टॅक्स कापला जात असेल तर तो टॅक्स द्यायला आपण संमती देउ या. अशी संमती आम्ही दिली होती. पण नंतर आपण जे आमच्या हातात पुस्तक दिले टिपणी दिली. त्यामध्ये सिमेंट, पेट्रोल आले आणखी दुसऱ्या लहान सहान वस्तु आल्या की, ज्याच्यावर कुठेही प्रिंटेड प्राईज नाही आहे आणि त्याच्यावर जकात वाढलेली आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

नाही. आपण सिमेंट आणि बिल्डिंगच्या मटेरिअलसाठी सर्व स्थायी समितीच्या सभासदांनी सिगरेट आणि बिल्डिंग मटेरियलवर आपण करवाढ केलेली आहे. त्यामध्ये असे नाही की, प्रिंटींग असेल त्यावरच करवाढ आहे. प्रिंटींग फक्त एम.आर.पी. असते. ती सिमेंट, दगड, रेती, माती, विटा याच्यावर काही नाही. अशा करावर एक टक्का वाढविला आहे, दोन टक्क्याऐवजी.

**रोहिदास पाटील :-**

मी तेच म्हणतो की आपण आपली भूमिका अशी होती की तेही न वाढविता अजून अभ्यास करा. तेही न वाढविता ही तुम्हाला आवश्यक खर्चा साठी असलेली रक्कम मिळू शकते. जकातीचे उत्पन्न वाढू शकते. पाण्याचे उत्पन्न वाढू शकते.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आपण नागरिकांवर न वाढविता आपल्याकडे उत्पन्न कुठून येणार आहे? नागरिकांवर करवाढ केलेलीच नाही आपण करवाढ केली नाही. तर आपली पुढची कामे कशी होतील?

**रोहिदास पाटील :-**

मी पुन्हा खुलासा करतो की तुम्ही असे म्हणता की नागरिकांवर करवाढ केली नाही. जो पेट्रोल भरतो. इथून पेट्रोल घेणार ते वाढणारच नागरिकांकडून घेणार, सिमेंट आहे तर सिमेंटकडूनच पैसे घेणार. सिमेंट कंपनीचे आपण लावले तरी तसे सिमेंट मिळत नाही. सभापती महोदय हिन्दुस्तान लिव्हर किंवा मोठया कंपन्या आहेत. त्यांचे जे प्रिंटेड येते त्याच्यावर असेल तर वेगळी गोष्ट आहे अन्यथा तुम्हाला हे बोलायला लागेल की आम्ही सर्वसामान्यांवर कर वाढविलेला आहे आम्हाला बोलायला लागेल की वाढविलेल्या कराला आमच्या भारतीय जनता पार्टीचा विरोध आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो की, आजच्या या अर्थसंकल्पावर चर्चा होताना सन्मा. सदस्य रोहिदासजी पाटील यांनी चांगल्या अशा लोकप्रिय प्रस्तावांची सुतवाच करुन या शहराला मार्केटची गरज आहे. या शहराला ही गरज आहे, ती गरज आहे व्यक्त केले आहे. त्याच्या गरजा आणि सुचना अनंत असल्या तरी अर्थसंकल्प ही अशी गोष्ट आहे की आपल्याला साधारणपणे तिजोरीचे भान ठेवूनच मागावे लागते आणि तेवढेच काहीतरी उलट मिळत असते. जेव्हा स्थायी समितीने तीन दिवस मॅरेथॉन डिस्कशन करुन हा अर्थसंकल्प तयार करणे आयुक्तांनी सादर केलेला अर्थसंकल्प निरनिराळे मुद्दे उपस्थित करुन प्रतिप्रश्न करुन ह्या अर्थसंकल्पाला एक वस्तुनिष्ठ स्वरुप देण्याचा प्रयत्न केला त्या सर्व सभासदांचे, मग याच्यामध्ये बी.जे.पी.चे सुध्दा सन्मा. सदस्य आहेत, शिवसेना, जनतादल, कॉंग्रेसचे आहेत. या सर्व मंडळींना त्यांच्या बुध्दी कौशल्याचा वापर करुन त्यांच्या अनुभवाचा विचार पुढे आणून हा अर्थसंकल्प जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ ठेवण्याचा प्रयत्न केला. याच्यामध्ये लपविण्यासारखे काही नाही. बजेटच्या वेळी अशा चर्चा होतच असतात आणि विरोधी बाकावरील लोक हे बजेट असेच आहे, हे बजेट स्विकारण्यासारखे नाही, हे बजेट लोकाभिमुख नाही, हे बजेट विकासाभिमुख नाही असे बोलून नेहमी सत्ताधारी पक्षाच्या मनामध्ये आणि त्यांच्या सदस्यामध्ये गोंधळ माजविण्याचा प्रयत्न करतात. ही लोकशाहीची प्रथा आहे. ती मान्य करायला काही अडचण नाही. पण काही केले तरीसुध्दा जर बजेट व्यवस्थित हाताळायचे असेल आणि मर्यादित स्वरुपात आवश्यक तेवढे प्रस्ताव या बजेटमध्ये जरी असतील तरी पण हे प्रस्ताव पूर्णत्वात नेण्यासाठी ते विकसित

करण्यासाठी आपल्याला उत्पन्नाचे स्त्रोत काय आहे? हे तपासून पहायला पाहिजे आणि मग खात्यानेच केलेल्या सुचना आणि स्थायी समितीने केलेले एन्डोसिमेन्ट विचारात घेतले तर या बजेटच्या उत्पन्नाच्या वाढीसाठी माफक प्रमाणामध्ये काही वस्तूवर हा जकात कर वाढविणे आवश्यक आहे. अशी सत्ताधारी पक्षाची भूमिका आहे ती भूमिका मांडताना म्हणूनच मी ठराव अशा प्रकारे मांडत आहे की, हे बजेट मंजुर करण्याच्या पूर्वी या बजेटच्या उत्पन्नात प्रस्तावित केलेला हा जो जकात वाढीचा भाग आहे. ही जकात वाढ खरे तर चर्चा होताना झाली की घरगुती गॅसवरदेखील चर्चा झाली आम्ही तर असे मांडले की, सगळया महिला भगिनी येतील आणि गॅस सिलींडरवर वाढ केली तर आपल्याला लाटण्याने मारतील अशी चर्चा यासाठी केली की सर्वसामान्य माणसाला त्रास होउ नये पण आपण गेली दहा वर्षे महापालिकेच्या या अर्थसंकल्पामध्ये पाणीपट्टीवर एवढा तोटा झाला. मी अगोदरच्या या प्रस्तावितामध्ये बोलताना सांगितले की, जवळजवळ चार ठिकाणी आपल्याला प्रचंड त्रुटी आहेत. त्या त्रुटी भरुन काढायच्या आहेत म्हणून सत्ताधारी पक्षाची भूमिका आहे की, स्थायी समितीने ठराव नं. २०९ प्रमाणे जे पारित केलेले आहे आणि जी दरवाढ प्रस्तावित केलेली आहे ती दरवाढ समर्थनीय आहे म्हणून त्या दरवाढीचे समर्थन करित असताना मी त्याबद्दलचा ठराव मांडत आहे. ठराव असा आहे स्थायी समिती ठराव नं २०९ दिनांक ११/०२/०४ ने सध्याच्या जकात दरसुचीमधील काही आयटमवर जकात दरवाढ सुचविलेली आहे. महापालिकेचे उत्पन्नाचे मार्ग मर्यादित आहेत. शहरातील नागरिकांना नागरी सुविधा देणे महापालिकेचे कर्तव्य असले तरीदेखील महापालिकेच्या मर्यादित उत्पन्नामध्ये अडचणीचे होत आहे. महापालिकेच्या २००४-०५ च्या अंदाजपत्रकामध्ये शहरातील प्रमुख रस्ते विकसित करणे, मार्केट बांधणे, शहरात सार्वजनिक दवाखाने सुरु झाले आहेत. चौपाटी विकसित करावयाची आहे. दोन चौपाट्या विकसित करावयाच्या आहेत. या कामाचा प्रामुख्याने समावेश आहे. या कामासाठी निधी लागणार आहे. या कामामुळे नागरिकांना सुविधा उपलब्ध होणार आहेत. महापालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे जकात दरसुचीमधील खालील नमुद केलेल्या ॲटमवर जकात दर वाढविण्यास महापालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होईल. ते जकात दर असे आहेत. आपल्याला दिलेल्या टिपणीमध्ये बंद डबा, मासळी, खवा, मिठाई, मुरंबा वगैरे दोन टक्क्यावरुन तीन टक्क्यामध्ये एक टक्का वाढ सुचविलेली आहे. सर्व प्रकारची भारतीय मिठाई याच्यावर १० किलो मिठाईवर एक रुपयाऐवजी दोन रुपये सुचविण्यांत आली आहे. फटाके, दारुकाम वगैरेसाठी एक रुपया वाढ प्रस्तावित केलेली आहे. दिपमाला, ग्लोब, चिमण्या यांच्यावर एक रुपया वाढ ठरविलेली आहे. पोट्याश, रिठा, सोडा वगैरेवर एक टक्क्याऐवजी दोन टक्के वाढ सुचविण्यांत आली आहे. अशुद्ध तेल (क्रुड ऑइल) याच्यावर ४० पैसे वाढ सुचविण्यांत आली आहे. तसेच द्रवरुप पेट्रोलिअम गॅस म्हणजे घरगुती गॅस सोडून एक रुपया वाढ करण्यांत आलेली आहे. सर्व प्रकारच्या सिमेंन्टवर दीड रुपयाची वाढ प्रस्तावित करण्यांत आलेली आहे. कोळशाचे वगैरे जे पदार्थ आहेत, दगडी, चुना, आग्रा दगड वगैरे त्याच्यावर एक टक्का सुचविण्यांत आलेली आहे. केसांचे तेल, सुगंधी तेले वगैरेवर दोन टक्क्याऐवजी तीन टक्के. कात्र्या, वस्तरे, सेफ्टी रेझर्स वगैरे दोन टक्क्याऐवजी तीन टक्के. सिगारेट, सिगार व धुम्रपानासाठी हुक्का, चिरुट, लायटर्स वगैरेवर तीन टक्क्याऐवजी चार टक्के. वर नमुद केल्याप्रमाणे प्रस्तावीत वाढीव दर लागु करण्यांस ही सभा मंजुरी देत आहे. सदर जकात दरवाढ ही दिनांक १८/०५/२००४ पासून लागु करण्यांत यावी असा मी ठराव मांडत आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

या ठरावाला मी अनुमोदन देत आहे.

**शरद पाटील :-**

मला एक विचारायचे आहे. फक्त दुरुस्ती आहे ती विचारायची आहे घरगुती गॅस सोडून केलेले आहे ती एक टक्के दोन टक्के केलेले आहे पण आमच्या ह्याच्यात चार टक्के केलेली आहे. महापौर मॅडम आणि उपआयुक्त साहेब ह्याच्यामध्ये दोन टक्के दिली आहे आणि ह्याच्यामध्ये चार टक्के दिले आहे ती चुक सुधारुन घ्यावी ३८ नंबरवर. घरगुती वापराचा गॅस वगळून याच्यामध्ये बरोबर दोन टक्के केलेली आहे आणि आपल्या बजेटचे जे बुक दिले त्यात चार टक्के आहे.

**अजित पाटील :-**

ठरावामध्ये दोन टक्के आहे ती प्रिंटींग मिस्टेक आहे प्रस्ताव स्टॅंडिंग कमिटीच्या ठरावाप्रमाणे प्रस्ताव केलेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

मॅडम दुरुस्तीची सुचना आहे. जकात कराची मागणी ठरविण्यासाठी शासनाच्या परिपत्रकानुसार सन २००४-०५ या वर्षासाठी अपेक्षित वसुली रक्कम ठरवावी. त्यामध्ये सन २००४-०५ या वर्षासाठी अपेक्षित आस्थापना व स्टेशनरीचा खर्च गृहीत धरुन येणाऱ्या रकमेची तरतुद अंदाजपत्रकाच्या पान क्र.

१ वर दर्शविण्यात यावी. सदर रकमेची व स्थायी समितीच्या रकमेतील तफावत प्रस्तावित करातील घट किंवा वाढ रदद करुन काढण्यात यावी, अशी मी दुरुस्तीची सुचना मांडत आहे त्याचप्रमाणे बोट रायडिंगची २००४-०५ सालातील अपेक्षित रक्कम मागील सालातील प्रत्यक्ष वसुली रकमेच्या रु. १० लाखापेक्षा कमी दर्शवली असल्याने मनपाचे आर्थिक नुकसान तर ठेकेदाराचा आर्थिक फायदा टाळण्यासाठी सदर वाढ १२ लाख करण्यात यावी. असा मी ठराव मांडत आहे.

**अशोक पाटील :-**

मी अनुमोदन देत आहे.

**चंद्रकांत वैती :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे २००३-०४ वर्षाचे सुधारित अंदाजपत्रक वर्ष २००४-०५ चे मुळ अंदाजपत्रक, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार आज सभागृहासमोर हे ठेवण्यात आलेले आहे. तत्पूर्वी हे बजेट मा. आयुक्तांनी त्यांच्या अंदाजपत्रकानुसार मा. स्थायी समितीचे सभापती यांच्याकडे सादर केले होते या विषयावर सर्व पक्षाच्या आतापर्यंत ज्यांचा उल्लेख झाला ते भाजपाचे सदस्य, जनता दल, शिवसेनेचे सदस्य आणि सत्ताधारी सर्वांची सर्वकश चर्चा झाली आणि याच्यामध्ये आपण एक गोष्ट ठरविली होती की विकास करताना मिरा भाईंदर शहराचा विकास हा एकच केंद्रबिंदू ठरवून या बजेटवर तीन दिवस मॅरेथॉन चर्चा झाली आणि त्याच्यामध्ये सरतेशेवटी १७१ कोटीचे अंदाज हे आयुक्तांनी दिले होते.

**लिओ कोलासो :-**

मा. आयुक्त साहेबांच्या परवानगीने जकातवाढीच्या संदर्भामध्ये जो काही ठराव सत्तारुढ पक्षाने मांडला त्याला सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी दुरुस्ती सुचवून सन्मा. सदस्य अशोक पाटील यांनी त्याला अनुमोदन दिलेले आहे. सत्ताधारी पक्षाची भूमिका आहे की जो ठराव स्टेबल करण्यात आलेला आहे. तोच ठराव आपण स्विकारण्यात यावा. उपसुचना असेल तर उपसुचना मताला घेण्यात यावी. त्याला आमची काहीही हरकत नाही.

**चंद्रकांत वैती :-**

सचिव साहेब सन्मा. सभागृह नेते लिओ कोलासो साहेब यांनी सुचना केली. तर आधी त्याच्यावर निर्णय व्हावा.

**प्र. सचिव :-**

महापौरांच्या परवानगीने सुचक सन्मा. सदस्य शशिकांत भोईर आणि अनुमोदक सन्मा. सदस्य अशोक पाटील यांची एक उपसुचना आलेली आहे. दुरुस्ती सुचना आलेली आहे, वाचून दाखवितो. जकात कराची मागणी ठरविण्यासाठी शासनाच्या परिपत्रकानुसार सन २००४-०५ या वर्षासाठी अपेक्षित वसुली रक्कम ठरवावी. त्यामध्ये सन २००४-०५ च्या वर्षासाठी अपेक्षित आस्थापना स्टेशनरीचा खर्च गृहीत धरून येणाऱ्या रक्कमेची तरतुद अंदाजपत्रकाच्या पान क्र. १ वर दर्शविण्यात यावी सदर रकमेची व स्थायी समितीच्या रकमेतील तफावत प्रस्तावीत करातील घट किंवा वाढ रद्द करुन काढण्यात यावी. अशी मी दुरुस्तीची सुचना मांडत आहे. त्याचप्रमाणे बोट रायडिंगची २००४-०५ सालातील अपेक्षित रक्कम मागील सालातील प्रत्यक्ष वसुली रक्कम रु. १० लाखापेक्षा कमी दर्शविली असल्याने मनपाचे आर्थिक नुकसान तर ठेकेदाराचा आर्थिक फायदा टाळण्यासाठी सदर वाढ १२ लाख करण्यात यावी अशी सुचना आहे.

**लिओ कोलासो :-**

सुचना आहे आणि नियमाप्रमाणे उपसुचना मताला घेतली पाहिजे.

**प्र. सचिव :-**

दरवाढीला दुरुस्ती आहे. दरवाढ करुन घट किंवा वाढ रद्द करुन काढण्यात यावी असे आहे. दुसरी बोट रायडिंगमध्ये १० लाखाची रकमेत वाढ १२ लाख करण्यात यावी अशी सुचना आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त सा़े.):-**

परंतु तुम्हाला फक्त एक माहिती देतो. मी माझे बोलणे संयुक्तिक नाही. तरीदेखील एक कल्पना देतो यामध्ये पाटील साहेबांनी जी दरवाढ आहे. ती दरवाढ रद्द करुन म्हटलेले आहे त्याबद्दल तुमचे मत असू शकेल पण बाकीचे प्रोसीजर आहे ते वापरावे लागेल. पुढच्या वर्षाचे टेन्डर काढण्यासाठी जी रक्कम काढायची आहे ती रक्कम हीच प्रोसिजर आहे. आस्थापनेचा खर्च ५० टक्के आलेल्या रकमेच्या १० टक्के वाढ.

**लिओ कोलासो :-**

आयुक्त साहेब पण अशा याची आवश्यकता नाही की, तुम्ही फॉरमॅटमध्येच ते काम करित आहात आजपर्यंत नियमावलीप्रमाणे ही रक्कम आपण निश्चित करित आहोत.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.):-**

ते बोट रायडिंगचे १० ऐवजी १२

**लिओ कोलासो :-**

आम्ही ते मान्य करु.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त साो.):-**

ते मी तुमच्यापुढे मांडतो असे म्हटले तुम्हाला मी फक्त हे सांगितले की, यामध्ये त्यांनी दरवाढ रद्द करुन म्हटलेले आहे. तेव्हा काय निर्णय घ्यायचा तो सभागृहाने घ्यावा. फक्त प्रोसिजर जी जकात रक्कम काढायची आहे. कशी काढावी हे सांगितलेले आहे जकात वाढीबददल इथे निर्णय आपल्या सभागृहाने घ्यावा.

**लिओ कोलासो :-**

आपण प्रोसिजरप्रमाणे जे सांगता ते प्रोसिजर आहेच. त्याच्यासाठी अशा स्वरुपाच्या सुचनेची आवश्यकता आहे का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.):-**

याच्यामध्ये दोन मुददे आले दरवाढ तुम्ही सुचविली? या ठरावामध्ये दरवाढ रद्द करुन म्हटलेले आहे. दोन्ही आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

ठराव व्यवस्थित वाचा.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त साो.):-**

प्रस्तावित करातील घट किंवा वाढ रद्द करुन

**प्रफुल्ल पाटील :-**

घट झाली तरी वाढ करावी असा त्याचा अर्थ आहे. आयुक्तांनी साडे सहाची सुचना केली होती. तुम्ही दोन कोटी घट कमी केली मग ती तुमच्या नियमात बसणारी असेल तर ते आयुक्त मान्य करतील. तुम्ही ठराव किती करा. शासनाचे परिपत्रक काय सांगते? आमच्या ठरावानुसार मागणी करुन तुम्ही टेन्डर काढणार आहात का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.):-**

शासन निर्णयाचे प्रोसिजर फॉलो करुन दिलेले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

तेच मी म्हणतो. गेल्या वेळी जेव्हा ३० कोटी रुपये बजेट प्रोव्हिजन केलेली तेव्हा तुम्ही ३२ कोटीच्या टेंडरची मागणी केली होती तुम्ही वाढीव केली आणि ह्यावेळीसुध्दा आयुक्तांनी साडे सहा कोटीची वाढ केलेली आहे आणि स्थायी समितीने ती घट केलेली आहे जर घट कमी असेल ती वाढवावी. आणि वाढ जास्त असेल तर ती कमी करावी.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.):-**

म्हणजे तुमचे म्हणणे आयुक्तांनी जी रक्कम सुचविली ती रक्कम कमी होती.

**प्रफुल्ल पाटील :-**

शासनाच्या परिपत्रकानुसार जेव्हा तुम्ही याचे कॅल्क्युलेशन कराल कारण तुम्हाला मागणी ठरवायला लागेल . बजेट तरतुद काहीही असु दे. बजेट तरतुद असली म्हणजे एखादे टेन्डर कमी आले म्हणजे आम्ही थोडेच रदद केले ते शासनाकडे पाठविले आम्ही जरी आज ३० किंवा २७ कोटीची प्रोव्हिजन केली आणि उद्या प्रत्यक्ष २५ कोटीच वसुल झाली तर आम्ही थोडेच स्थायी समिती अध्यक्षांना जबाबदार धरणार आहोत की, त्यांनी आर्थिक नुकसान केले म्हणून आणि अशा वेळी परिपत्रकाप्रमाणे जेव्हा तुम्ही काढाल आणि आयुक्तांनी साडे सहा कोटी रुपये ठरविली आहे ती जर योग्य असेल तर तिच तुम्हाला करावी लागेल आणि ती जर घट असेल तर तुम्हाला घट करावी लागेल.

**मोहन पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छितो की, आता जो सभागृह नेत्यांनी ठराव मांडलेला आहे. त्यानंतर लेखी स्वरुपामध्ये ती उपसुचना आली त्या सुचना अशा मांडता आल्या असत्या. पण ती सुचना अशा लेखी स्वरुपात दिल्या कारणाने कायद्याने जी सुचना त्यांनी मांडलेली आहे त्याच्यावर मतदान घेणे आवश्यक आहे. ती लेखी स्वरूपात आली नसती तर वेगळा प्रश्न होता. त्याच्यावर ठरावही झाला, अनुमोदनही झाले म्हणून ती उपसुचना मताला घेणे फार जरुरी आहे. म्हणून महापौर मॅडम मी आपल्याला विनंती करतो. ती उपसुचना मतदानाला घ्यावी.

**रोहिदास पाटील :-**

ठराव मांडते वेळी उपसुचना आली जसे आम्ही आमच्या पक्षाचे मत मांडले तेही तुम्हाला त्यामध्ये नोंद घ्यावे लागेल. ठराव तुम्ही मांडला ते बरोबर आहे. म्हणजे जे प्रिंटेड शिवाय आहे त्याला भारतीय जनता पार्टीच्या उपस्थित नगरसेवकांचा विरोध आहे. हे यामध्ये घ्यावे लागेल.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

तुमच्या माहितीसाठी सांगतो. शासनाकडून येणारे वार्षिक अनुदान २६ कोटी ५५ लाख ७२ हजार, आस्थापनेवरील वेतनासाठी होणारा खर्च ६८ लाख १० हजार. ५० टक्के खर्च ६८ लाख १० हजार २०० फक्त मी माहिती सांगतो. त्यात काय झालेले आहे? आयुक्तांनी जे रेट दिले ते ३५ आयटमचे वाढवायला दिले आहेत. स्थायी समितीने ते रद्द केले. रद्द करुन फक्त १३ आयटम मंजुर केले. १३ आयटमची कॉस्ट होती ती चार कोटी साहेबांनी जे ३५ आयटम सुचविले ते होतात ६ कोटी. ६ कोटीऐवजी ४ कोटी स्थायी समितीने शिफारस केली. त्यामध्ये मागील वर्षी जे टेन्डर काढलेले होते. त्यात एकच मुद्दा आहे की, आलेल्या टेन्डरमध्ये चार कोटी प्लस करायचे का पुर्वी टेन्डर मागविण्याची जी रक्कम आहे. त्यामध्ये चार कोटी ॲड होणार आहेत. पण ज्यावेळेला तो स्वतंत्र विषय येईल त्यावेळी सभागृहात निर्णय होईल. परंतु, आता जी तुम्ही दरवाढ सुचविलेली आहे ती चार कोटीची स्थायी समितीने जी शिफारस केलेली आहे. ती मंजुर करण्याविषयी. आता बजेटमध्ये दाखवायला पाहिजे. आता रक्कम बजेटमध्ये दाखविण्यासाठी वाढ जी सुचविलेली आहे. ती वाढ स्थायी समितीने चार कोटीची सुचविली आणि आयुक्तांनी सहा कोटींची सुचविली. ती रक्कम आणि टेन्डर मागणी जी केली ती २९ कोटी ७ लाख मंजुर केली. गव्हर्नमेंटने जी परिपत्रकाने सुचविलेली पहिली टेन्डर काढताना १५ टक्के आणि नंतर दोन महिने २८/४/९४ ला १० टक्के सुचविली. तर आता जी गव्हर्नमेन्टने त्याला मंजुरी दिली. ती १५ टक्के ॲड करुन जे टेन्डर मागविले होते. पण प्रत्यक्षात १० टक्के ॲड करुन २९ कोटी १७ लाखाची होती. ती ७ लाख आली. त्यामुळे गव्हर्नमेन्टने त्याला मंजुरी दिली. तर आता मंजुर टेन्डर रकमेमध्ये ४ कोटी धरुन टेन्डर बजेट रक्कम दाखवायची का पुर्वीची ३२ कोटी ६८ लाख ५८ हजार ६६० मध्ये हा मुद्दा आहे. म्हणजे टेन्डर अमाउन्ट धरायची की, टेन्डर पब्लिश केलेली अमाउन्ट धरायची आणि प्रशासनाचे असे मत आहे की, टेन्डर मंजुर केलेले आहे. त्यामध्ये ४ कोटी ॲड करुन टेन्डर प्रसिद्ध करावे म्हणुन रक्कम भरलेली आहे. म्हणजे २९ कोटी ७ लाख अधिक १० टक्के अधिक आजची वाढीव चार कोटी रुपये असे प्रोव्हिजन करुन ३७ कोटी ५० लाख रुपये बजेट प्रोव्हिजन करुन प्रशासनाने दाखविलेले आहे. रोहिदास पाटील साहेब यांचे जे मत आहे. आयुक्तांनी जे ३५ आयटम वाढीचे सुचविले होते. त्यातले रद्द करुन १३ आयटमचीच वाढ केली. त्यामुळे आयुक्तांनी काय सुचविले ते सभागृहाला माहिती व्हायला पाहिजे म्हणुन ते आयटम दिले. ते आता स्थायी समितीनेच अमान्य करुन पाठविलेले आहेत. आणि स्थायी समितीने फक्त १३ आयटम मंजुर केलेले आहेत. जी एम.आर.पी. आहे तीच ग्राह्य होणार आणि ती १८/५/०४ नंतर लागु होणार. त्यामुळे आयुक्तांनी सुचविलेले जे आयटम आहेत. ते आयटम अमान्य झाले. त्यामधील फक्त १३ आयटम मान्य केले आणि ते हे टेन्डर संपल्यानंतर पुढच्या टेन्डरला हे दर लागू होणार आहेत.

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, ह्यामध्ये काही वाद नाही. जे १३ आयटम राहिले. त्यामध्येही जी प्रिन्टेड प्राइज आहे ते नाहीत. दुसरे आहेत. त्यामुळे प्रिन्टेड प्राइजसाठी संमती देतो की, त्याचे उत्पन्न महापालिकेने घ्यावे. पण ज्याच्यावर प्रिन्टेड प्राइज नाही आहे की, जे नागरिकांकडुन वसुल केले जाणार आहेत. त्याला आम्ही संमती देत नाही. त्याला जकातीला दरवाढ करायला आम्ही संमती देत नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

साहेब, आता काय करायचे तो सभागृह निर्णय घेणार. मी यासाठी तुम्हाला मुद्दा सांगितला. आयुक्तांनी बजेट सादर करताना ३५ आयटमवर दरवाढ सुचविली होती. हे सभागृहाला माहिती होण्यासाठी या बजेटबरोबर दिलेली आहे. परंतु, स्थायी समितीने मंजुर करताना फक्त १३ आयटम मंजुर केलेले आहेत. ते १३ आयटम मंजुर केल्यानंतर ती लागु १८/५/०४ पासुन होतील. तो निर्णय सभागृहाने घ्यायचा आहे. पण जे आयुक्तांनी ३५ आयटम दिलेले आहेत. ते काय दिले? कोणकोणत्या आयटमवर करावा असे दिले होते. हे आपल्याला माहिती व्हावे म्हणुन दिलेले आहे.

**मोहन पाटील :-**

आपल्याला ते दिलेले आहे आणि आम्ही ते मान्य केलेले आहे आणि असा ठरावही मांडलेला आहे. विरोधी पक्ष म्हणुन कुत्र्याची शेपटी वाकडी असलेल्याप्रमाणे ती विरोधात्मक भुमिका असतेच की, चांगला मांडलेला प्रस्ताव त्यावर टिकाटिपणी झाली पाहिजे. असे मघाशी सभागृह नेत्यांनी सांगितलेच आहे. आपण विकासाचे काम करतो. त्या विकासाच्या कामामध्ये आमच्या भागामध्ये एखादे विशेष

काम व्हावे याच्या विषयी आपण मागणी करतो. आम्ही जेव्हा विकासाच्या कामासाठी करवाढ सुचवितो ती करवाढ का सुचवावी? त्या विकासकर्त्यांना त्या विकासाचा त्या ठिकाणी फन्ड झाला पाहिजे. मिळाला पाहिजे ही आमची सत्ताधारी पक्षाची भुमिका असते आणि त्या भुमिकेला विरोधी पक्षांनी साथ दिली पाहिजे. पण विकासाचे काम असेल तेव्हा आमचे हात पुढे असतात की, आमच्या प्रभागात किंवा विभागात विशिष्ट काम झाले पाहिजे. मग त्यावेळी आम्ही विचार करित नाही की, या प्रभागामध्ये काम करताना त्या बजेटमध्ये हा फन्ड कमी पडतो. हा विचार आम्ही कधी करित नाही. जेव्हा आम्हाला प्रभागामध्ये काम पाहिजे. तेव्हा आम्ही पुढे असतो आणि त्या प्रभागात काम करताना विकासाचे काम करताना जो निधी आम्हाला हवा आहे. तो निधी जेव्हा आम्हाला पाहिजे असतो. तो निधी मिळाला पाहिजे. तेव्हा आम्ही मागे असतो. म्हणजे आम्ही १३ आयटममध्ये वाढ दाखविली. जेव्हा संपुर्ण वाढ स्थायी समितीपुढे आली होती. तेव्हा ७५ पैकी १३ आयटमवर वाढ आम्ही मागितली. तेव्हा ते सदस्य त्या ठिकाणी होते. त्यांनी मान्यता दिली. ती मॅरेथॉन त्याची स्पर्धा चालु होती. मॅरेथॉन चर्चा सुरु होती. त्याच्यामुळे एकाच सभेत आम्ही एका दालनामध्ये गेलो आणि त्या दालनामध्ये आम्ही मान्य केले. हा विषय झाला नाही. त्या दालनाच्या तीन दिवस बाहेर आलो. तेव्हा आमच्या सदस्याशी आम्ही चर्चा केली असेल आमच्या गटाशी आम्ही चर्चा केली असेल हे मान्य करीत नाही. तुम्ही केले असेल की नसेल परंतु, प्रत्येक भागामध्ये ८५, ८६ आयटम असताना आम्ही जेव्हा १३ आयटमच मान्य करतो. तेव्हा सर्वसामान्य सदस्यांनी तो विचार केला पाहिजे आणि ज्या १३ आयटमवर आम्ही वाढ सुचविलेली आहे. ती वाढ सुचवत असताना त्याच्यावर नागरिकांवर जो भार पडला पाहिजे तो पडणार नाही. याची दक्षता घेतली तर मघाशी आम्ही या गॅसवर चर्चा केली. घरगुती गॅस वगळुन आम्ही बोललो. सिमेन्टवर चर्चा केली. तेव्हा व्यापारी वर्गाचा विचार केला की, आज कन्स्ट्रक्शनमध्ये असलेली मार्जिन कन्स्ट्रक्शनच्या विकास कामामध्ये असलेली मार्जिन त्या मार्जिनचा विचार केला म्हणुन आम्ही सिमेन्टचे पैसे वाढविले. अशा पद्धतीने जी ठराविक वाढ आहे ती वाढविले आणि ८५ आयटममधील १३ आयटम सोडुन जे इतर आयटम आहेत त्याच्यावर नागरिकांवर कुठेही भुर्दंड पडु नये. याची आपण दक्षता घेतली. याची दक्षता घेऊनच आपण दरवाढ केली. तर मघाशी नाईक साहेबांनी उल्लेख केला त्याप्रमाणे चार कोटी आणखी वाढले असते. चार कोटी, सहा कोटी वाढ आम्ही घेतली नाही. ठराविक वाढ घेतली. परंतु, नेहमीप्रमाणे विरोधी म्हणुन भुमिका मोडायची म्हणजे विकास काम करीत असताना विरोधी भुमिका आम्ही बोलत नाही. तेव्हा आम्ही आग्रहाने हात उंच करतो की, हे विरोधकांनी सुचविले की आम्ही सुचविले. पेपरात बातम्या येतात. तिथे पण आम्ही केले. हे आम्ही केले मान्य आहे. ते तुम्ही करा. आम्ही कुठे तुम्हाला अमान्य करतो. परंतु, जेव्हा १३च आयटमवर आम्ही वाढ सुचविलेली आहे आणि ती सर्वमान्य स्थायी समितीने सर्वानुमते या ठिकाणी मंजुरी आणलेली आहे. तरीसुद्धा आपला नेहमीप्रमाणे पवित्रा आहे की, विरोधक म्हणुन आम्ही भुमिका मांडतो. मग मागच्या वेळेला बजेटची सभा झाली. तेव्हा या ठिकाणी जकातीचा विषय आला. तेव्हा नरो वा कुंजरो वा का झाले? तो मुद्दा तुम्ही मांडा. मग तेव्हा तुमची भुमिका नरो वा कुंजरो वा होती. मग अशावेळी प्रत्येक वेळेला विकासाचे काम करताना प्रशासनाने लक्षात घेतले पाहिजे. आम्ही कधी सत्ताधारी म्हणुन बघितले नाही. की ते राष्ट्रवादींना काम देऊन ते काम झाले पाहिजे. काँग्रेसना काम देऊन ते काम झाले पाहिजे. किंवा बीजेपीने काम दिले म्हणुन ते झाले नाही पाहिजे अशी भुमिका आम्ही कधी मांडली का? आम्ही भुमिका मांडत नाही. मग जेव्हा हा प्रस्ताव मांडल्यानंतर जो येणारा निधी आहे. त्या निधीचा तुम्ही वापर करणार आहात. आम्हीही करणार आहोत. अनुषंगाने मिरा भाईंदरचा विकासही होणार आहे. अशी भुमिका आपण प्रत्येक वेळेला मांडली पाहिजे. नुसते विरोधी पक्ष म्हणुन आम्ही भुमिका मांडतो. आम्हाला याचा विरोध आहे. आणि विरोध आहे ही भुमिका होऊ शकत नाही. विरोधासाठी विरोध चुकीचा आहे. चांगल्या कामासाठी विरोध करा. आपण विरोधी भुमिका मांडायची का? धन्यवाद.

**मिलन पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो, जेव्हा स्थायी समितीचे बजेट जेव्हा स्थायी समितीमध्ये आघाडीचे सुद्धा सदस्य होते आणि भारतीय जनता पार्टीचे सुद्धा सदस्य आहेत. हे स्थायी समितीमध्ये सन्मा. सदस्य अशोक पाटील देखील होते आणि सन्मा. सदस्य अशोक पाटील यांनीसुद्धा त्या स्थायी समितीमध्ये या बजेटला समर्थन केलेले आहे आणि हे समर्थन असताना जे ६ कोटीचे आयुक्तांनी सुचविलेले होते. त्यांनी समर्थन केलेले आहे आणि आता ते उपसुचना मांडतात म्हणजे काय? अगोदर त्यांनी बजेटला मान्यता दिली. मग त्यांची मान्यता होती की, नाही आणि ते आता उपसुचना मांडतात तेव्हा त्यांना मतदानाचे कळले नव्हते की, आयुक्तांनी जे सहा कोटीचे केले. ते त्यांना कळले नव्हते का?

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील जरा स्वतःला आवरा. एखादया स्थायी समितीने जर ठराव केला तर जरुर नाही. की, महासभेने मंजुर करावा आणि जर असे असेल तर मग महासभेला विषय का आणता?

**मिलन पाटील :-**

तुमचे मेंबर सक्षम होत का नाही? तेव्हा त्यांनी समर्थन दिले आणि आता सभागृहामध्ये विरोध करता. उपसुचना मांडता. याचा अर्थ काय?

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही आम्हाला शिकवु नका. तुम्ही तुमचे बोला. तुम्हाला जे समर्थन करायचे ते समर्थन करा. आम्ही विरोध केला.

**मिलन पाटील :-**

तुमचे मेंबर स्थायी समितीमध्ये पाठविलेले आहेत. ते सक्षम नाहीत. तिथे समर्थन करतात आणि इथे आल्यानंतर विरोध करतात. उपसुचना मांडतात. त्यांना हे कळले नव्हते का? वोटिंग होतात. त्यांना कळले

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम, तुमच्या उपस्थितीत अशाप्रकारे आपलाच एक सदस्य आमच्यावर असे आरोप करतो हे योग्य नाही आहे. आम्ही असे म्हटले नाही की, स्थायी समिती मुर्ख होती म्हणुन त्यांनी असे म्हटले आहे. त्यांनी आमच्यावर आरोप केला आम्ही केला नाही. त्यांनी आरोप केला. तुम्ही त्यांना आरोप मागे घ्यायला लावा. हट्ट पण नाही धरणार. नाही घेतला तर काही फरक पडत नाही. पण अशा प्रकारे तुम्ही आघाडीच्या लोकांची अवहेलना करणार असाल तर ती वेळ तुमच्यावर पण येईल मग तेव्हा तयार रहा आणि म्हणुन मी या ठिकाणी पुन्हा सांगतो जी उपसुचना मांडलेली आहे त्याचा शांतपणे आपण विचार करा.

**हेलन गोविंद :-**

पाटील साहेब, तुम्ही चुकीचे बोलता. असे कसे नेहमी बोलता. प्रत्येक बाबतीमध्ये तुमचा कुठल्यापण कामामध्ये विरोध असतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्हाला आमचा विरोध वाटायला लागला म्हणुन आम्ही इकडे बसलो.

**हेलन गोविंद :-**

पाटील साहेब, जेव्हा तुम्ही होते तेव्हा तुम्ही कामासाठी किती विरोध केला ते आम्हाला माहिती आहे. तुम्ही आता शिकवु नका. जेव्हा आमची कामे असतात तेव्हा आम्हाला कामे करु देत नाहीत.

**प्रफुल्ल पाटील :-**

आता माझ्याकडे कामे असतील तर सांगा मी करुन देतो.

**हेलन गोविंद :-**

होती तेव्हा केली नाहीत. तेव्हा राजकारण करीत राहिले.

**प्रफुल्ल पाटील :-**

करुन घ्या.

**हेलन गोविंद :-**

करुन घ्या म्हणजे काय? आम्ही राजकारण करायचे आणि सगळ्या पक्षाची कामे करुन घेतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

आम्ही तुमच्या सदस्यांबद्दल कधीही अशा प्रकारचे आरोप केलेले नाहीत. आम्ही शांतपणे जो विषय मांडला. त्याचे मी तुम्हाला परत स्पष्टीकरण करुन सांगतो. आवडले तर घ्या. नाही तर नका घेऊ. तुमच्या ठरावाला आम्ही कुठेही विरोध केलेला नाही. आम्ही जी सुचना मांडली आहे. ती अतिशय योग्य मांडली आहे. कायद्याच्या नियमामध्ये बसणारी आहे आणि आपल्या जर वाटले तर आपण त्याच्यावर मतदान घ्या. कशाला हे पाहिजे. तुम्हाला जर असे वाटते स्थायी समितीला सगळे होते. तर महासभा कशाला बोलवता. तिथेच सांगा स्थायी समितीचा निर्णय झालेला आहे. महासभेची गरज नाही.

**मा. महापौर :-**

सदरचा विषय सचिवांनी मतदानास टाकावा.

**प्र. सचिव :-**

महापौरांच्या परवानगीने, जकात दरवाढीवर प्रथम ठराव सन्मा. सदस्य लिओ कोलासो अनुमोदन सन्मा. सदस्य चंद्रकांत मोदी यांनी केले होते. त्याच्यावर जी दुरुस्ती सुचना आलेली आहे. ती मी प्रथम मतदानास टाकतो. फक्त सुचना आहे ती मी सभागृहाला वाचुन दाखवतो. जकात कराची मागणी ठरविण्यासाठी शासनाच्या परिपत्रकानुसार सन २००४-०५ या वर्षासाठी अपेक्षित वसुली रक्कम ठरवावी. त्यामध्ये सन २००४-०५ या वर्षासाठी अपेक्षित आस्थापना खर्च, स्टेशनरीचा खर्च गृहित धरुन येणाऱ्या रक्कमेची तरतुद अंदाजपत्रकाच्या पान क्र. १ वर दर्शविण्यात यावी. सदर रकमेची व स्थायी समितीच्या रक्कमेतील तफावत प्रस्तावित करातील घट किंवा वाढ रद्द करुन काढण्यात यावी. अशी मी दुरुस्तीची सुचना मांडत आहे. त्याचप्रमाणे बोट राइडिंगची २००४-०५ सालातील अपेक्षित रक्कम मागील सालातील प्रत्यक्ष वसुलीच्या रक्कम रु. १० लाखपेक्षा कमी दर्शविली असल्याने मनपाने आर्थिक नुकसान करुन ठेकेदाराचा आर्थिक फायदा टाळण्यासाठी सदर वाढ १२ लाख करण्यात यावी सुचक आहेत सन्मा. सदस्य शशिकांत भोईर, अनुमोदक आहेत सन्मा. सदस्य अशोक बळवंत पाटील. सुचनेच्या विरोधात आहेत त्यांनी जागेवर उभे राहून विरोध नोंदवायचा आहे.

**(सभागृहातील निर्णयानुसार मतदान हात वर करुन घेण्यांत आले.)**

**प्र. सचिव :-**

सुचनेच्या विरोधात ४० आहेत.

**याकुब कुरेशी :-**

सचिव साहेब, डायसवर बसले त्यांना मोजले नाही असे वाटते. नांवे वाचून दाखवावी.

**प्र. सचिव :-**

दुरुस्तीच्या सुचनेच्या विरोधात असलेल्या सभासदांची नावे वाचुन दाखवतो.

१) गोविन्द हेलन
२) पाटील चिंतामण कमलावर
३) डिसुझा ज्युडी थॉमस
४) आसिफ गुलाब शेख
५) ठाकुर नितीन गोपीनाथ,
६) दिनेश नलावडे
७) जयंत महादेव पाटील
८) निर्मला बाबुराव सावळे
९) रविंद्र भीमदेव माळी
१०) केशव रामभाऊ घरत
११) ज्योत्स्ना जालिंदर हसनाळे
उर्फ
पुजा प्रताप शिंदे
१२) जिवी हिरा वाडे
१३) गावंड आत्माराम बाळाराम
१४) अनिता जयवंत पाटील
१५) गावंड हरेश लक्ष्मण
१६) भोईर जयाबाई यशवंत
१७) सुर्यकांत अनंतराव भोईर
१८) सुरेखा यशवंत गायकवाड
१९) वैती चंद्रकांत सिताराम
२०) चंद्रकांत मोदी
२१) शफिक अहमद खान
२२) उमा विश्वनाथ सपार
२३) ग्रिटा फॅरो स्टिफन
२४) मेन्डोसा स्टिवन जॉन
२५) रोहिदास आत्माराम पाटील
२६) मेन्डोसा मायरा गिल्बर्ट
२७) कुरेशी याकुब इस्माइल
२८) कोलासो लिओ इजिदोर

२९) अल्मेडा जेन्वी युस्टस
३०) रॉड्रिक्स मॉरस जोसेफ
३१) महेन्द्रसिंग चौहान
३२) मोहन मधुकर पाटील
३३) मुक्ता प्रविण रांजणकर
३४) प्रेमनाथ गजानन पाटील
३५) नरेन्द्र मेहता
३६) तुळशीदास दत्तु म्हात्रे
३७) पाटील मिलन गोविन्द
३८) उर्मिला कोमल भामरे
३९) शानु गोहिल
४०) पाटील प्रभात प्रकाश

दुरुस्तीच्या सुचनेच्या बाजूने असलेल्या सभासंदांची नावे वाचुन दाखवतो.
१) अशोक बळवंत पाटील
२) पाटील अनंत रामचंद्र
३) संगीता विजय म्हात्रे
४) मिलन म्हात्रे
५) तिवारी सुरेन्द्रप्रसाद मुरलीधर
६) म्हात्रे नयना गजानन
७) अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी
८) करंबेळे प्रियांका प्रकाश
९) सिंग मदन उदितनारायण
१०) पाटील रोहिदास शंकर
११) भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
१२) भोईर गजानन लक्ष्मण
१३) पाटील लीला गुरुनाथ
१४) पाटील प्रफुल्ल काशीनाथ
१५) पाटील अशोक पांडुरंग
१६) घोन्सालवीस जोजफ जॉन
१७) कोलासो जेम्स इजिदोर
१८) रतन कृष्णा पाटील
१९) पाटील शरद केशव
२०) गोयंका सुधा लक्ष्मीकांत
२१) भोईर शशिकांत जगन्नाथ
२२) शुभांगी सिताराम नाईक
२३) शहा रक्षा एस.
२४) जैन रमेश धरमचंद

मतदानाच्या वेळी सभागृहा बाहेर गेलेल्या सदस्यांची नांवे.
१) हॅरल बोर्जीस
२) ध्रुवकिशोर पाटील
३) हंसु कमलकुमार पांडे
४) रिटा शहा

**आसिफ शेख :-**

निर्णय घोषित करा.

**प्र. सचिव :-**

उपस्थित सदस्यांपैकी दुरुस्ती सुचनेच्या विरोधात ४० सदस्य व दुरुस्ती सुचनेच्या बाजूने २४ सदस्य, ४ सदस्य सभागृहाच्या बाहेर आहेत.

**मा. महापौर :-**

जकात कर दुरुस्तीच्या सुचनेच्या विरोधात ४० सदस्य, दुरुस्तीच्या बाजूने २४ सदस्य तसेच ४ सदस्य सभागृहाच्या बाहेर गेल्याने सदरची उपसुचना फेटाळण्यांत येत आहे व मुळ ठराव मंजुर करीत आहे.

**ठराव क्र. ६१(अ) :-**

जकात कराची मागणी ठरविण्यासाठी शासनाच्या परिपत्रकानुसार सन २००४-०५ या वर्षासाठी अपेक्षित वसुली रक्कम ठरवावी. त्यामध्ये सन २००४-०५ या वर्षासाठी अपेक्षित आस्थापना खर्च, स्टेशनरीचा खर्च गृहित धरुन येणाऱ्या रक्कमेची तरतुद अंदाजपत्रकाच्या पान क्र. १ वर दर्शविण्यात यावी. सदर रकमेची व स्थायी समितीच्या रक्कमेतील तफावत प्रस्तावित करातील घट किंवा वाढ रद्द करुन काढण्यात यावी. अशी मी दुरुस्तीची सुचना मांडत आहे. त्याचप्रमाणे बोट राइडिंगची २००४-०५ सालातील अपेक्षित रक्कम मागील सालातील प्रत्यक्ष वसुलीच्या रक्कम रु. १० लाखपेक्षा कमी दर्शविली असल्याने मनपाने आर्थिक नुकसान करुन ठेकेदाराचा आर्थिक फायदा टाळण्यासाठी सदर वाढ १२ लाख करण्यात यावी.

दुरुस्तीच्या सुचनेच्या विरोधात असलेल्या सभासंदांची नावे.

१) गोविन्द हेलन
२) पाटील चिंतामण कमलावर
३) डिसुझा ज्युडी थॉमस
४) आसिफ गुलाब शेख
५) ठाकुर नितीन गोपीनाथ,
६) दिनेश नलावडे
७) जयंत महादेव पाटील
८) निर्मला बाबुराव सावळे
९) रविंद्र भीमदेव माळी
१०) केशव रामभाऊ घरत
११) ज्योत्स्ना जालिंदर हसनाळे
उर्फ
पुजा प्रताप शिंदे
१२) जिवी हिरा वाडे
१३) गावंड आत्माराम बाळाराम
१४) अनिता जयवंत पाटील
१५) गावंड हरेश लक्ष्मण
१६) भोईर जयाबाई यशवंत
१७) सुर्यकांत अनंतराव भोईर
१८) सुरेखा यशवंत गायकवाड
१९) वैती चंद्रकांत सिताराम
२०) चंद्रकांत मोदी
२१) शफिक अहमद खान
२२) उमा विश्वनाथ सपार
२३) ग्रिटा फॅरो स्टिफन
२४) मेन्डोसा स्टिवन जॉन
२५) रोहिदास आत्माराम पाटील
२६) मेन्डोसा मायरा गिल्बर्ट
२७) कुरेशी याकुब इस्माइल
२८) कोलासो लिओ इजिदोर
२९) अल्मेडा जेन्वी युस्टस
३०) रॉड्रिक्स मॉरस जोसेफ
३१) महेन्द्रसिंग चौहान
३२) मोहन मधुकर पाटील
३३) मुक्ता प्रविण रांजणकर
३४) प्रेमनाथ गजानन पाटील

३५) नरेन्द्र मेहता
३६) तुळशीदास दत्तु म्हात्रे
३७) पाटील मिलन गोविन्द
३८) उर्मिला कोमल भामरे
३९) शानु गोहिल
४०) पाटील प्रभात प्रकाश

दुरुस्तीच्या सुचनेच्या बाजूने असलेल्या सभासंदांची नावे
१) अशोक बळवंत पाटील
२) पाटील अनंत रामचंद्र
३) संगीता विजय म्हात्रे
४) मिलन म्हात्रे
५) तिवारी सुरेन्द्रप्रसाद मुरलीधर
६) म्हात्रे नयना गजानन
७) अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी
८) करंबेळे प्रियांका प्रकाश
९) सिंग मदन उदितनारायण
१०) पाटील रोहिदास शंकर
११) भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
१२) भोईर गजानन लक्ष्मण
१३) पाटील लीला गुरुनाथ
१४) पाटील प्रफुल्ल काशीनाथ
१५) पाटील अशोक पांडुरंग
१६) घोन्सालवीस जोजफ जॉन
१७) कोलासो जेम्स इजिदोर
१८) रतन कृष्णा पाटील
१९) पाटील शरद केशव
२०) गोयंका सुधा लक्ष्मीकांत
२१) भोईर शशिकांत जगन्नाथ
२२) शुभांगी सिताराम नाईक
२३) शहा रक्षा एस.
२४) जैन रमेश धरमचंद

मतदानाच्या वेळी सभागृहाबाहेर गेलेल्या सदस्यांची नांवे.
१) हॅरल बोर्जीस
२) ध्रुवकिशोर पाटील
३) हंसु कमलकुमार पांडे
४) रिटा शहा

जकात कर दुरुस्तीच्या सुचनेच्या विरोधात ४० सदस्य, दुरुस्तीच्या बाजूने २४ सदस्य तसेच ४ सदस्य सभागृहाच्या बाहेर गेल्याने सदरची उपसुचना फेटाळण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. शशिकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. अशोक बळवंत पाटील.**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

ठरावाचे वाचन करुन सदरचा ठराव फेटाळण्यांत आला.

**चंद्रकांत वैती :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका वित्तीय वर्ष २००३-०४ चे सुधारीत अंदाजपत्रक व वर्ष २००४-०५ चे मुळ अंदाजपत्रक

**प्र. सचिव :-**

अगोदर सुचना तिच्या बाजुने आणि विरोधात जे आहे तेही नोंदवायचे आहे.

**चंद्रकांत वैती :-**

अजुन काउन्टिंग घ्यायची आहे का? आपण आता जाहिर केले आहे ना.

**प्र. सचिव :-**

नाही. ही सुचना केली.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सभागृह नेत्यांनी जो ठराव मांडला होता आणि सन्मा. सदस्य चंद्रकांत मोदी यांनी अनुमोदन दिले होते.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने की, या सभागृहामध्ये आजच्या या सभेसाठी आणि विशेषतः मतदानाच्यावेळी शिवमुर्ती नाईक यासारखे एक ज्येष्ठ अनुभवी उपआयुक्त अधिकारी जेव्हा ऑफिशिएट करीत आहेत. तेव्हा त्यांची जी सुचना आहे. याही पलिकडे पुन्हा एकदा मतदान बाजुने घेण्यात यावे. तर त्याला आमची संमती आहे.

**प्र. सचिव :-**

जो दरवाढीचा मुळ ठराव मांडलेला होता. सुचक होते सन्मा. सदस्य लिओ कोलासो आणि अनुमोदक होते सन्मा. सदस्य चंद्रकांत मोदी. या ठरावाच्या जे विरोधात आहेत त्यांनी हात वर करायचे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर आहे.

**प्रकरण क्र. ६९ :-**

स्थायी समिती ठराव क्र. २०९ दि. ११/२/२००४ ने जकात दर वाढीस केलेल्या शिफारशी.

**ठराव क्र. ६१(ब) :-**

स्थायी समिती ठराव नं २०९ दिनांक ११/०२/०४ ने सध्याच्या जकात दरसुचीमधील काही ॲटमवर जकात दरवाढ सुचविलेली आहे. महापालिकेचे उत्पन्नाचे मार्ग मर्यादीत आहेत. शहरातील नागरिकांना, नागरी सुविधा देणे कर्तव्य असले तरी देखील महापालिकेच्या मर्यादीत उत्पन्नामध्ये अडचणीचे होत आहे. महापालिकेच्या २००४-२००५ च्या अंदाजपत्रकामध्ये शहरातील प्रमुख रस्ते विकसित करणे, मार्केट बांधणे, शहरात सार्वजनिक दवाखाने सुरु झाले आहेत, चौपाटी विकसित करणे ह्या कामाचा प्रामुख्याने समावेश आहे. या कामासाठी निधी लागणार आहे. ह्या कामामुळे नागरिकांना सुविधा उपलब्ध होणार आहेत.

महापालिकेचे उत्पन्नामध्ये वाढ होण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे जकात दर सुची मधील खालील नमुद केलेल्या ॲटमवर जकात दर वाढविण्यास महापालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होईल.

| ॲ. क्र. | मालाचे वर्णन | सध्याचा दर | प्रस्तावित वाढीव दर |
|---|---|---|---|
| | | किंमतीवर | किंमतीवर |
| | | दर शेकडा | दर शेकडा |
| १३. | डबा बंद मासळी, खवा मिठाई, मुरंबा व जेली, गोठवलेली परिरक्षित दुध, आईस्क्रीम, सर्वप्रकारचे फरिनशियन अन्न, लोणची, कोको, कोकोचे बी व चॉकलेट्स, बिस्किटे व केक, डुकराची पातळ चरबी (लॉर्ड) किंवा प्राण्यांची खाद्य चरबी, मावा दुधाची मलई, चका व दही, फळांचे रस, सरबते व सर्व पेये ग्लुकोज, डेक्स्ट्रोज किंवा कोणत्याही फळाची साखर, (खाद्यतेलांव्यतिरिक्त) तेलाच्या दुकानातील माल, परिक्षित किराणा माल बेकींग किंवा करी पावडर, सकरीन, सर्व प्रकारचे खद्य व रंग व अर्क, इतर सर्व प्रकारचे ग्लुकोज, सातुचे वाळलेले सत्व (माल्ट एक्ट्रॉक्स्क्ट्रॅट) मध, पापड, बटाट्याचे वेफर, कोणत्याही वापरासाठी जतन केलेले मांस आणि होलमिल्क किंवा टोन्ड मिल्क किंवा स्किम मिल्क पावडर किंवा नीरा यांच्याव्यतिरिक्त विशेषरित्या तरतुद न करण्यात आलेले सर्व | २.०० | ३.०० |

| अ. क्र. | मालाचे वर्णन | सध्याचा दर किंमतीवर दर शेकडा | प्रस्तावित वाढीव दर किंमतीवर दर शेकडा |
|---|---|---|---|
| | प्रकारचे अन्न किंवा पेय. | | |
| १९. | सर्व प्रकारची भारतीय मिठाई, ब्रेड बरी, चिवडा. | प्रति १० किलोला १.०० | प्रति १० किलोला २.०० |
| ३१. | फटाके, दारुकाम व त्याचे घटक भाग, कॅल्शीयम, कारबाईड व रक्षणवर्ति (सेप्टोफ्युज) | ३.०० | ४.०० |
| ३२. | दीपमाला, ग्लोब, चिमण्या, विजेचे बल्ब व विजेच्या किंवा गॅसच्या प्रकाशासाठी असलेल्या वस्तू. | २.०० | ३.०० |
| ३४. | पोट्याश, रिठा, सोडा, तुरटी, लबण पदार्थ, शिकेकाई, धुण्याचा सोडा, परिष्कृत सोरा मीठ, फिनेल व कपडे, फरशी भांडी धुताना वापरण्यात येणारे इतर पदार्थ. | १.०० | २.०० |
| ३८. | (ब) अशुद्ध तेल (क्रुड ऑईल) | ०.६० | १.०० |
| ४४. | सर्व प्रकारचे सिमेंट. | २.५० | ४.०० |
| ४५. | कोळशाचे डांबर (कोलटार, असफाल्ट, बिट्युमेन, फरसबंदी, दगड, मॅगनीझ, इमरी दगड किंवा चुरा, चुन्याची धकी (चॉक्सपावडर), दगडाच्या चिपा (स्टोन चिप्स) दगडाची पूड, आग्रा दगड, इमारतीचे दगड, खंगर (क्लिंकर) व कोळशाची राख. | ३.०० | ४.०० |
| ४६. | चकाकी दिलेल्या विटा व फरशा, संगमरवरी दगड, भट्टीच्या विटा, विटा व सर्व प्रकारची छप्परी कौले, फ्लोअरींग टाईल्स, फरशीच्या लाद्या, इत्यादी. चायना मोझाईक चिप्स, मोझाईकचा संगमरवरी दगड, मोझाईक किंवा टेरॅझोची कौले, मातीचे नळ, सिमेंटचे नळ आणि ॲसवेस्टॉस सिमेंट पत्रे. | ३.०० | ४.०० |
| ५३. | (अ) केसांचे तेल, सुगंधी तेले, सर्व प्रकारची सुगंधी द्रव्ये, सेंटस्, अत्तर, सुगंधित वस्तु, उदबत्त्या, सुगंधित रसायने, सर्व प्रकारची सौंदर्य प्रसाधने, दाढीचे क्रीम, दाढीचे साबण, दंत मंजन, टुट पेस्ट, पोमेड, फण्या, ब्रश, आरसे, केसाच्या पिना, ब्रेसेस, गोटेर्स, सस्पेंडर्स.<br>(ब) कात्र्या, वस्तारे, सेफ्टी रेझर्स, ब्लेडस्, सुरे, चाकु, चमचे, काटे, कटलरी सर्व प्रकारची, सर्व प्रकारच्या सुऱ्या, कुलूप व किल्ल्या, स्टोव्ह व पेट्रोमॅक्स आणि त्यांचे भाग व उपसाधने आणि लोखंडी सामान. | २.००<br>२.०० | ३.००<br>३.०० |
| ५७. | सिगारेट्स व सिगर, सिगार व सिगारेट होल्डर्स, स्मोकिंग पाईप, सिगरेचा कागदर, पाईपचा, सिगारेटचा तंबाखु, तंबाखुच्या केसेस, पोचेस, सिगार व सिगारेट ठेवण्याच्या डब्या, हुक्का व धुम्रपानासाठी आवश्यक वस्तू व सिगारेट लायटर्स. | ३.०० | ४.०० |

वर नमुद केल्याप्रमाणे प्रस्तावीत वाढीव दर लागू करणेंस मंजुरी देण्यास येत आहे. सदरहु जकात दर वाढ दि. १८/५/२००४ पासुन लागु करण्यात यावी.

ठरावाच्या बाजूने असलेल्या सभासंदांची नावे.

१) गोविन्द हेलन
२) पाटील चिंतामण कमलावर
३) डिसुझा ज्युडी थॉमस
४) आसिफ गुलाब शेख
५) ठाकुर नितीन गोपीनाथ,

६) दिनेश नलावडे
७) जयंत महादेव पाटील
८) निर्मला बाबुराव सावळे
९) रविंद्र भीमदेव माळी
१०) केशव रामभाऊ घरत
११) ज्योत्स्ना जालिंदर हसनाळे
उर्फ
पुजा प्रताप शिंदे
१२) जिवी हिरा वाडे
१३) गावंड आत्माराम बाळाराम
१४) अनिता जयवंत पाटील
१५) गावंड हरेश लक्ष्मण
१६) भोईर जयाबाई यशवंत
१७) सुर्यकांत अनंतराव भोईर
१८) सुरेखा यशवंत गायकवाड
१९) वैती चंद्रकांत सिताराम
२०) चंद्रकांत मोदी
२१) शफिक अहमद खान
२२) उमा विश्वनाथ सपार
२३) ग्रिटा फॅरो स्टिफन
२४) मेन्डोसा स्टिवन जॉन
२५) रोहिदास आत्माराम पाटील
२६) मेन्डोसा मायरा गिल्बर्ट
२७) कुरेशी याकुब इस्माइल
२८) कोलासो लिओ इजिदोर
२९) अल्मेडा जेन्वी युस्टस
३०) रॉड्रिक्स मॉरस जोसेफ
३१) महेन्द्रसिंग चौहान
३२) मोहन मधुकर पाटील
३३) मुक्ता प्रविण रांजणकर
३४) प्रेमनाथ गजानन पाटील
३५) नरेन्द्र मेहता
३६) तुळशीदास दत्तु म्हात्रे
३७) पाटील मिलन गोविन्द
३८) उर्मिला कोमल भामरे
३९) शानु गोहिल
४०) पाटील प्रभात प्रकाश

ठरावाच्या विरोधात असलेल्या सभासंदांची नावे.

१) अशोक बळवंत पाटील
२) पाटील अनंत रामचंद्र
३) संगीता विजय म्हात्रे
४) मिलन म्हात्रे
५) तिवारी सुरेन्द्रप्रसाद मुरलीधर
६) म्हात्रे नयना गजानन
७) अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी
८) करंबेळे प्रियांका प्रकाश
९) सिंग मदन उदितनारायण
१०) पाटील रोहिदास शंकर
११) भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
१२) भोईर गजानन लक्ष्मण

१३) पाटील लीला गुरुनाथ
१४) पाटील प्रफुल्ल काशीनाथ
१५) पाटील अशोक पांडुरंग
१६) घोन्सालवीस जोजफ जॉन
१७) कोलासो जेम्स इजिदोर
१८) रतन कृष्णा पाटील
१९) पाटील शरद केशव
२०) गोयंका सुधा लक्ष्मीकांत
२१) भोईर शशिकांत जगन्नाथ
२२) शुभांगी सिताराम नाईक
२३) शहा रक्षा एस.
२४) जैन रमेश धरमचंद

मतदानाच्या वेळी सभागृहा बाहेर गेलेल्या सदस्यांची नांवे.

१) हॅरल बोर्जीस
२) ध्रुवकिशोर पाटील
३) हंसु कमलकुमार पांडे
४) रिटा शहा

जकात कर वाढीच्या ठरावाच्या बाजूने ४० सदस्य, वाढीच्या विरोधात २४ सदस्य आहेत. तसेच ४ सदस्य सभागृहाच्या बाहेर गेल्याने सदरचा ठराव बहुमताने मंजुर करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. लिओ कोलासो.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

ठरावाचे वाचन करुन सदरचा ठराव मंजुर करण्यांत आला.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर मॅडम, मिरा भाईंदर महानगरपालिका वित्तीय वर्ष २००३-०४ चे सुधारीत अंदाजपत्रक व वर्ष २००४-०५ चे मुळ अंदाजपत्रक प्रकरण क्र. १३, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००३-०४ वर्षाचे सुधारित अंदाजपत्रक.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौर मॅडम, मला या विषयावर बोलायचे आहे. ठराव मांडु नका.

**चंद्रकांत वैती :-**

ठराव मांडल्यानंतर उपसुचना विचारात घेता येतील. तुम्ही अजुन उपसुचना करु शकता.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

याच्यावर चर्चा होऊ नये म्हणुन तुम्ही काय बोलायचे ते बोला. पाटीलसाहेब आम्ही नेहमी सभागृहामध्ये तुम्हाला सहकार्याची भुमिका करतो. तुम्ही असे करायचे नाही हे सभागृह आहे. मी मॅडमकडे टाईम मागितलेला आहे. तुम्ही असे काय करता? मॅडम, पान नं. ५ वर दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत ५० लाखाचा निधी दाखविलेला आहे. सन २००२ आणि २००१ या वर्षी ५० लाख रुपये. २००१-०२ ला निधी आलेला नाही आहे. २००२-०३ ला २० लाख निधी फक्त आलेला आहे. पुन्हा २००३-०४ ला ५० लाख रुपये निधी दलित वस्ती योजनेअंतर्गत मिळणार आहे. अशी आपण शासनाकडे मागणी करणार आहोत किंवा मागणी केलेली आहे किंवा तो फन्ड येणार आहे. परंतु, सदर दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत एक करोड वीस लाखाच्या विकासाची कामे मंजुर झालेली आहेत. परंतु, अजुन त्या शासनाकडुन आपल्याला फन्ड उपलब्ध झालेला नाही आहे. निधी उपलब्ध झालेले नाही आहेत. त्यामुळे ती विकास कामे जनरल फन्डातुन करणार की त्यासाठी याच्यामध्ये आपण कोणती आर्थिक तरतुद केलेली आहे. याचा कृपया खुलासा व्हावा.

**दिपक खांबित :-**

साहेब, एक कोटी दहा लाखाच्या कामावर मंजुरी दिली होती. त्यापैकी फक्त वीस लाखाची दोनच कामे आपण हाती घेतली. आणि आता आपण नव्वद कोटीचा नवीन प्रस्ताव दलित वस्तीमध्ये पाठविलेला आहे. त्यातुन ५० लाख आपल्याला मंजुर होतात.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

पण बाकी ४० लाखाची जी विकास कामे आहेत. ती आपण कुठल्या फंडातुन करणार आहोत.

**दिपक खांबित :-**

सभागृहाने ठरवावे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

तेच तर ठरवा. कारण तुमच्याकडे लेखाशीर्ष नसते. त्यामुळे तुम्ही आता पुन्हा काय सांगता. ऑडीटला प्रॉब्लेम येतो. तो ऑडिटला प्रॉब्लेम येणार असेल तर तुम्ही आता इथे क्लिअर दया. की, तुम्ही कुठल्या फन्डातुन ती कामे करणार आहात? की पुन्हा आणखी दोन वर्षे आम्हाला वाट बघायला लागणार आहे.

**दिपक खांबित :-**

दुर्बल घटक किंवा जनरल फन्डातुनसुद्धा देऊ शकतो.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मग ते तुम्ही आजच्या ह्या अर्थसंकल्पामध्ये क्लिअर करुन घ्या. की कुठल्या ह्याच्यातुन आपण ती विकास कामे करणार आहोत.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मा. महापौर एक कोटी दहा लाखाचे बजेट प्रोव्हिजन केलेले आहे. त्यापैकी वीस लाख रुपये आलेले आहेत. ५० लाख रुपये मिळणार आहेत. तर यदाकदाचित आपण धरलेल्या बजेटप्रमाणे जर रक्कम मिळाली नाही. तर आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकासाठी जे प्रोव्हिजन केलेले आहे. त्याचा या कामासाठी वापर केला जाईल. आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकासाठी जे पाच टक्के प्रोव्हिजन असते. त्या पाच टक्केच्या रक्कमेतुन गव्हर्नमेन्टचा ग्रॅन्ट पूर्णपणे आला नाही तर इनर सेक्शन मधुन तो खर्च करुन भागवु.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

कारण गेल्या वेळेला दलित वस्तीची जी विकासाची कामे आपण मंजुर केली होती. त्यासाठी फक्त वीस लाखाचा निधी शासनाकडुन आला आणि बाकीची कामे अजुन आपण पेन्डींग ठेवली का? कारण आपण शासनाच्या निधीची वाट बघतो. जनरल फन्डात मी वारंवार महासभेत हा विषय उचलला की, जनरल फन्डातुन ही कामे व्हावी. परंतु ती कामे केली नाहीत. कारण आपल्याकडे तशी तरतुद नव्हती. जर समजा दलित वस्तीचा फन्ड आपल्याला उपलब्ध झाला नाही. हा ५० लाख रुपये आपण तरतुद केली. म्हणजे येणार असे म्हणतो. जर समजा हा उपलब्ध झाला नाही. मग ती कामे कुठल्या ह्याच्यातुन आपण करणार आहोत. कमकुवत दुर्बल घटकातुन ही कामे करणार आहोत. मग त्यासाठी माझे हे म्हणणे आहे की, जर आपण दुर्बल घटकातुन ही कामे करणार असु. तर त्यासाठी ७६ लाखाचा फन्ड आपण राखीव ठेवलेला आहे. मग पुन्हा दुसरी कामे आपण ह्याच्यासाठी मंजुर करु नये. कारण जी मागचीच कामे अजुन पेन्डिग आहेत. माझा हा विषय होता मागची कामे अजुन पेन्डीग आहेत. तर ती कामे करण्यासाठी हा फन्ड अजुन पण राखीव ठेवावा.

**प्रभात पाटील :-**

या विषयाला अनुसरुन मला आणखी बोलावेसे वाटते की, मागच्या वेळेला महिला बाल कल्याणचा फन्ड असाच दुसरीकडे वापरला गेला वाटत असेल की, बजेटच्या संदर्भात हा विषय नाही आहे. परंतु, शेवटी महिला बाल कल्याणचा जो फन्ड होता तो दुसऱ्या कामासाठी वापरला. आता मला वाटते महिला बालकल्याण समिती फर्म झालेली आहे. आणि तिला लवकरच तसा आकार देण्यांत यावा. म्हणजे तो जो ५२ लाखाचा फन्ड महिला बालकल्याणला दिला आहे. तो या वर्षी दुसरीकडे कुठे वापरण्याची आपल्यावर वेळ येऊ नये. कारण त्याचीसुद्धा बरीचशी कामे विकासाच्या दृष्टीने आपल्याकडे बाकी आहेत आणि नगरसेवक निधी फक्त १२ हजारांनी वाढविला आहे. आपण जशी वाढ देतो १२ टक्के वाढ झाली. महागाई वाढ झाली. तर बांधकामाचे जे साहित्य येणार आहे. त्याच्यावर पण १२ टक्के वाढ गृहित धरुन १२ हजारांनी तो वाढविला की काय मला माहिती नाही. परंतु, मला वाटते की, या दिलेल्या नगरसेवक निधीमध्ये नगरसेवकांच्या मनासारखे आणि नजरेत भरेल असे कोणते तरी काम या भागात केले जात नाही. होत नाही. नगरसेवकांच्या निधीबद्दल मला असे वाटत होते की, तिथे जास्त वाढ होण अपेक्षित आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मा. महापौर मॅडम, एकुण नगरपालिकेच्या महसुली उत्पन्नाच्या दोन टक्के. तुम्ही महसुली उत्पन्न वाढवायला मदत करा. तुमचा फन्ड वाढेल.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौरांच्या परवानगीने. मा. महापौर मॅडम, आजचे अंदाजपत्रक हे १८२ कोटी ७२ लाख ९२ हजाराचे घेण्यात आले आहे. या अंदाजपत्रकामध्ये सर्व करदात्यांना आपल्याला कशा प्रकारे सोयी सुविधा देता येतील. याबाबतचा अगदी व्यवस्थित विचार करण्यात आलेला आहे. त्याच्यामुळे आतापर्यंत विशेष असे बजेटमध्ये मुळ स्वरुपात कुठल्याही प्रकारची खास सुधारणा सुचविली गेली नाही आणि जकातीच्या विषयावरच फार जास्त बोलणे झाले. त्याच्यामुळे आजच्या सभागृहात ह्याच्यावर नवीन सुचना करायलादेखील संधी मिळाली नाही. एवढे अतिशय चांगले असे बजेट सादर करण्यात स्थायी समितीच्या सभापतींना चांगलेच यश आले आहे. असा याचा नमुना दिसतो. त्या बजेटमध्ये आपण नवीन रस्त्यासाठी जे प्रावधान केले. त्याच्यात १४ कोटी रुपये खर्च करणार. कुठल्याही शहराचा विकास करताना साधारणपणे त्या शहराचे सर्व रस्ते विकसित झाले तर शहराचा विकास अतिशय झपाट्याने होतो ही गोष्ट लक्षात घेऊन नवीन रस्त्यांसाठी चौदा कोटींची तरतुद करण्यात आलेली आहे. आजचे संगणकाचे युग चालू आहे आणि महापालिकेमध्ये पावत्या विना विलंब देता याव्यात यासाठी महापालिकेमध्येदेखील दोन कोटीच्या निधीचे प्रावधान हे संगणकीकरणासाठी ठेवण्यांत आलेले आहे. विशेष बांधकामाच्यामध्ये प्रभाग कार्यालय, शाळा इमारती, विश्रामगृहे, महापौर निवास, आयुक्त निवासस्थान याच्यासाठी एक कोटी दहा लाखाची तरतुद करण्यांत आलेली आहे. नगरसेवक निधी हा महसुली उत्पन्नाच्य दोन टक्के असतो. त्यामध्ये थोडीशी वाढ होते. मात्र या निधीसाठी एक कोटी ९१ लक्ष एवढा निधी राखुन ठेवण्यात आलेला आहे. शहरातील रस्त्यावरील उघड्या बाजारावर मर्यादा यावी म्हणुन एक कोटीची तरतुद बाजार बांधण्यासाठी ठरविण्यांत आलेली आहे. या विषयावर सदस्यांनी सुचनादेखील केल्या होत्या. शहरातील गरीब व मध्यमवर्गीय रुग्णांना सेवा देता यावी. म्हणुन महापालिकेने अल्पशा दरात वैद्यकिय सेवा सुरु केली आहे. त्यासोबत रुग्णवाहिका सेवादेखील सुरु केलेली आहे. तसेच, जिल्हा परिषदेचे टेंभा व उत्तन येथील दोन प्राथमिक आरोग्य केंन्द्र आपल्या ताब्यात घ्यायची आहेत. त्यासाठी ४० लाखाची आस्थापनेसाठी तरतुद केली आहे. कारण त्यांचा ३६ हा स्टाफ आहे. शहरातील घन कचरा व्यवस्थापन कामी उत्तन येथील प्रकल्पासाठी तसेच पर्यायी प्रकल्पाचा विचार समोर ठेवुन या कामी ७.५० कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे. सदर अर्थसंकल्पामध्ये शिक्षण विभागासाठी २ कोटी १४ लाखाची तरतुद करण्यांत आलेली आहे. यात शिक्षक वर्गासाठी पण अनुदान रक्कम निर्धारित केलेली आहे. ९, १०, ११ तसेच नियमाप्रमाणे दुर्बल घटकांसाठी रु. ५२ लक्ष ६० हजार व महिला बालकल्याण कार्यक्रमासाठी रु. ५२ लाख ६० हजार व वृक्ष प्राधीकरणासाठी १ कोटी ५१ लाख रुपयांची तरतुद करण्यांत आलेली आहे. भाग तीन वरील जमा व खर्च बाजुंचा तपशील पाहता त्यात पुढील ठळक गोष्टी दिसुन येतात. मनपाची जकात दरात थोड्या प्रमाणात वाढ केली आहे. तथापि ही वाढ इतर मनपापेक्षा कमी आहे. तसेच, ज्या वस्तुंचा जकात कर उत्पादक कंपन्या स्वतः भरतात. त्या सर्व वस्तु जकातीखाली घेऊन त्यांचे दर नव्याने करुन घेतले आहेत. त्यांची यादी अंदाजपत्रकामध्ये आपणा सर्वांना देण्यात आलेली आहे. मनपाचे एकुण महसुली उत्पन्न रु. १०२ कोटी ८८ लक्ष ६२ हजार गृहित धरले असुन बांधिल खर्च ८५ कोटी ४२ लक्ष गृहित धरला आहे. भाग चारमध्ये या अंदाजपत्रकामध्ये अधिकारी वर्गाचे पगार भत्ते यामध्ये १० टक्के वाढ गृहित धरल्याने एकुण खर्च रु. १५ कोटी ८६ लाख ५४ हजार दिसत आहे. अर्थसंकल्पाच्या पुस्तकात येणारे उत्पन्न, होणारा खर्च याचा रंगीत तक्ता अर्थसंकल्पामध्ये दाखविलेला आहे. यात आस्थापना खर्च फक्त १२ टक्के दाखविलेला आहे. तसेच, रु. ५.९१ लक्ष एवढी रक्कम शिल्लक दाखविण्यांत आलेली आहे. सदर अंदाजपत्रकामध्ये महसुली लेखा भागात कर्ज, अनामती, ॲडव्हान्सेस, शिक्षण व रोजगार दर्जा कर या गोष्टी नमुना क्र. ४ मध्ये दर्शविल्या आहेत. तसेच, सदर अंदाजपत्रकात महापालिकेच्या वाहतुक प्रकल्पासाठी रु. ५० लाखाची तरतुद केलेली आहे. भाग सात, अंदाजपत्रकाच्या 'क' भागामध्ये पाणीपुरवठ्यासंबंधी प्रस्ताव व संख्याकी दिलेली आहे. एकुण पाणीपट्टी १४ कोटी याच्यामध्ये दोन कोटी वाढ केलेली आहे. नळ जोडणीचे तीन कोटी, अनाधिकृत नळ कनेक्शन एक कोटी, रस्ता खोदणे वगैरेसाठी दोन कोटी जमा सदरी घेण्यात आलेली आहे. तसेच, खर्च सदरी २५ लक्ष पाणीपुरवठा विशेष निधी दाखविण्यात आलेला आहे. तसेच, आठ भागामध्ये खर्च सदरात रु. १४ कोटी दाखविण्यांत आलेले आहेत. नवीन जलवाहिन्या टाकणे आठ कोटी रुपये, साहित्य खरेदी ५० लक्ष, स्टेम वर्गणी दोन कोटी पंचवीस लक्ष कर्ज रु. नऊ कोटी. इमारत बांधकाम ५० कोटी या महत्त्वाच्या तरतुदी केल्या आहेत. तसेच, या अंदाजपत्रकात मल्लनिःसारण प्रकल्पासाठी रु. ६१ लाखाची विशेष तरतुद करण्यात आलेली

आहे. भाग दहामध्ये महापालिका अधिनियमाप्रमाणे आमसभेत तुटीच्या विभागाचा अहवाल सादर करायचा असतो. ही तुट कधी भरुन काढली जाईल. हेसुद्धा सांगायचे असते. म्हणुन कलम ९५ च्या 'अ' प्रमाणे स्वतंत्रप्रमाणे पिवळ्या रंगातील पुस्तिकेत माहिती दिलेली आहे. पाणी पुरवठ्यासाठी खर्च रु. ९ कोटी ५७ लाख ४७ हजार इतका आहे. मात्र, प्रत्यक्ष जमा ७ कोटी ११ लक्ष २९ हजार इतके होते. एकुण तुट २ कोटी ४६ लाख १८ हजार होते. ही तुट मालमत्ता करातुन १८.३८ टक्के रक्कम म्हणजे एकुण २४६.१८ वर्ग करुन तुट भरुन काढली जाईल. आरोग्य विभाग कचरा, वाहतुक व विल्हेवाट संबंधात एकुण जमा १६ लक्ष २९ हजार होते. मात्र खर्च ९ कोटी १८ लक्ष ३ हजार होतो. यामध्ये तुट ९ कोटी १ लक्ष ७४ हजार एवढी होती. ही तुट मालमत्ता कर व जकात कर वसुलीतुन २२ टक्के रक्कम वर्ग करुन घेऊन तुट भरुन काढली जाईल. सार्वजनिक दिवाबत्ती संबंधात एकुण जमा रु. १ हजार, खर्च ३ कोटी २७ लक्ष ९६ हजार इतका होतो. त्यामध्ये तुट आहे रु. ३ कोटी २७ लक्ष ९५ हजार. सदरची तुट ही मालमत्ता व जकात कर वसुलीतुन अनुदान घेऊन भरुन काढण्यांत येईल. म्हणुन आजच्या सभेपुढे मांडलेला अर्थसंकल्प चांगला व लोकाभिमुख तसेच विकासाभिमुख असुन शिलकी अर्थसंकल्प आहे. म्हणुन सदर अर्थसंकल्पास ही सभा मंजुरी देत आहे. सदर अर्थसंकल्प मा. श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स स्थायी समिती सभापती यांनी अतिशय चांगल्या प्रकारे सादर केल्याबद्दल ही सभा त्यांना हार्दिक धन्यवाद देत आहे.

**जेन्वी अल्मेडा :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सर्वांना होळी व रंगपंचमी निमित्त हार्दिक शुभेच्छा.

**मिलन म्हात्रे :-**

महापौर मॅडम, याच्यामध्ये आता जो अर्थसंकल्पाचा ठराव पास झालेला आहे. येत्या आचारसंहितेचा विचार करता उपविधीच्या सेक्शन न(ब) नुसार या ठरावाचे वाचन करुन हा ठराव कायम करावा. सचिवसाहेब, उपविधीचे प्रकरण न(ब) नुसार आपण याचे वाचन करावे आणि तो कायम करावा. मॅडम, हा ठराव आपल्याला कायम करुन घ्यायला लागेल कारण आचारसंहिता लागली तर याच्यावर आपल्याला काही काम करता येणार नाही.

**चंद्रकांत वैती :-**

मला एक शोक प्रस्ताव मांडायचा आहे.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य चंद्रकांत वैतीसाहेब आपण घाई का करता? आम्हाला सुचना मांडायची आहे. तुम्ही ठराव टाका. आमचा अर्थसंकल्पाला विरोध नाही आहे. पण आमची सुचना तर आम्हाला मांडू द्या. आपण ठराव कशाला मांडता? आमचा विरोध कुठे? आम्ही बोलतो चांगले आहे. आम्हाला वेळ कुठे दिला? तुमचेच चालले आहे. तुम्ही जकातच घेऊन बसलात.

**शुभांगी नाईक :-**

मॅडम, आम्हाला सुचना मांडायची आहे. जेवल्यानंतर तशी वेळ दिली तर बरे होईल. जास्त बोलत नाही. फक्त पाच मिनिटे.

**रतन पाटील :-**

आम्हाला ५ मिनिटच दया. आम्ही १५ मिनिटे मागत नाही आहे. आणि आपण आम्हाला १५ मिनिटे देणार होते. आम्हाला १५ मिनिटे दिलीच नाही. प्रत्येक पक्षाला १५ मिनिटे देणार होते.

**मोहन पाटील :-**

ठराव मांडल्यानंतर सुचनांचा प्रश्न येतच नाही. ठराव मांडला अनुमोदन झाले.

**शशिकांत भोईर :-**

पहिला ठराव मांडता. त्याच्यावर सुचनांचा विचार करता चर्चा झाली पाहिजे. कोणते हेड घेतले नाही ते हेड घ्यायला पाहिजे.

**अशोक पाटील :-**

जेवल्यानंतर पुन्हा अधिवेशन घ्यावे.

**रतन पाटील :-**

आपण १५ मिनिटे दिली होती. आम्हाला दिलेच नाही आहे. आम्ही बोललोच नाही. साहेब, तुम्ही सत्ताधारीच बोलत होतात. आम्हाला बोलायला दिले कुठे?

**शशिकांत भोईर :-**

मॅडम, जरा आपण रुलिंग द्यावे. आपण सुचना विचारात घेणार आहात की नाही.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौरसाहेब, या ठिकाणी सत्तारुढ पक्षाने हे बजेट मंजुरीच्या संदर्भात ठराव मांडलेला आहे. त्याला अनुमोदन झालेले आहे. आता सन्मा. विरोधी पक्ष सदस्य याच्यानंतर चर्चा मागत आहेत. तर हे काही प्रथेप्रमाणे आणि कामकाजाप्रमाणे बरोबर नाही.

**रतन पाटील :-**

आम्ही फक्त सुचना मांडत आहोत. आमचा काही विरोध नाही. आम्हाला सांगितले असते तर आम्ही अनुमोदन दिले असते.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सभागृह नेते साहेब, ठराव मांडल्यानंतरसुद्धा सुचना मांडण्यात यावी.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, मला बोलण्याची परवानगी दया. जेवणाच्या सुट्टीच्याबद्दल आम्ही बोलत नाही. आम्ही कामकाजाच्याबद्दल बोलतो.

**रतन पाटील :-**

साहेब, आम्हाला सुचना मांडायच्या आहेत. आपण चांगले बजेट मांडले. आम्ही स्वागत करतो. पण आम्हाला जे काही मांडायचे आहे ते मांडु द्या. तुम्हीच बोलता आम्हाला काही मांडायला दिले नाही. मा. महापौरांचे हार्दिक स्वागत आमच्या सुचनेचा विचार केल्याबद्दल. आजची ही मिरा भाईंदरच्या दृष्टिने एक चांगली बजेटच्या संदर्भात चर्चा चालु आहे आणि आज या संदर्भात बजेटसुद्धा कुठलीही करवाढ न करता थोडी बहुत करवाढ झालेली आहे. तरीसुद्धा लोकाभिमुख चांगले बजेट महापालिकेत सभागृहात आलेले आहे आणि मी त्याचे स्वागत करतो. आमच्याकडे ज्या दोन सुचना आहेत त्या आम्ही मांडतो. मा. आयुक्तसाहेब, मा. महापौर, मा. अध्यक्ष स्थायी समिती तसेच सन्मा. सभागृह आपले अंदाजपत्रक २००४-०५ च्या अनुषंगाने सविस्तर निवेदन वजा मागणी सादर. सदरच्या अंदाजपत्रकामध्ये अनेक बाबींसाठी आर्थिक तरतुद करण्यांत आली असताना मा. आयुक्तांनी मिरा भाईंदरमधील मिठागरे, शेती व्यवसाय व मासेमारी या व्यवसायावर अवलंबुन असलेल्या ग्रामीण भागातील राहणारे नागरिक व तेथील एकंदरीत परिस्थितीत विकासात्मक बदल घडवुन आणण्याच्या दृष्टिने कोणतीही आर्थिक तरतुद केलेली नाही. शहरीकरण आणि औद्यागिकीकरण व नागरी सुविधा तसेच लोकाभिमुख प्रशासनाची गती वाढविण्यासाठी करण्यांत आलेल्या तरतुदीमध्ये गावाचे गावपण टिकविण्यासाठी खालील बाबीचा साकल्याने विचार करण्यांत यावा. त्या पूर्ततेसाठी आवश्यक निधीची तरतुद करण्यांत यावी. मिरा महापालिका क्षेत्रातील भुमिपुत्रांचा व्यवसाय मुख्य म्हणजे शेती, मासेमारी, मीठ उत्पादन यांना कोणतेही संरक्षण अंदाजपत्रकात देण्यांत आलेले नाही आहे. त्या अन्वये अंदाजपत्रकातील एकूण तरतुदी बघितल्यावर ग्रामीण भागाच्या विकासाच्या दृष्टीने शिवसेना खालीलप्रमाणे मागणी करित आहे. खालील योजनेअंतर्गत ज्या शेतकऱ्याची जमीन विकासात्मक कामासाठी शासनाने ताब्यात घेतली किंवा प्रशासनाने ताब्यात घेतली. परंतु, कोणताही मोबदला न देता त्या शेतकऱ्याची बोलवण केली गेली. अशा शेतकऱ्याच्या एका वारसास महापालिकेच्या सेवेत सामावुन घ्यावे. अशी मिरा भाईंदर महापालिकेच्या क्षेत्रात शहरीकरण करण्याच्या अनुषंगाने अनेक ठिकाणी इमारत बांधणीचे तसेच रस्त्याची कामे चालु आहेत. बऱ्याच ठिकाणी इमारती बांधुन पूर्ण झालेल्या असुन त्या ठिकाणी नागरिकसुद्धा राहत आहेत. त्या इमारतीमधुन वाहुन जाणारे सांडपाणी निचरा न होता नजीकच्या क्षेत्रात सोडण्यात आले आहे. सातत्याने घाणेरडे पाणी शेतीत साठल्यामूळे तेथील शेती उत्पादन कुजुन शेतकऱ्याचे फार मोठे आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेले शेतकरी आणखी खचले जातात. अशावेळी महापालिकेने विविध रुपाने सवलती शेतकऱ्यास सहकार्य करण्याची नितांत आवश्यकता आहे. ओहोटी भरतीच्या बदलत्या स्वरुपाने दिवसेंदिवस किनाऱ्याची झीज होत असुन व परप्रांतीयांची घुसखोरी होत असल्याने मच्छिमारी हा व्यवसाय लोप पावत चालल्याचे चित्र सगळीकडे पहावयास मिळते. सदर व्यवसायावर अवलंबुन असणाऱ्या कुटुंबाची व्यवस्था अत्यंत दयनीय झालेली आहे. आर्थिक दुर्बलता असल्याने त्यांच्या कुटुंबाची सामाजिक तसेच शैक्षणिक वाढ खुंटली जात आहे व त्यांच्यासमोर पोटापाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. अशा स्थितीत महानगरपालिकेने त्यांना विविध सवलतीच्या माध्यमाने सहकार्य करुन व तेथील एकंदरीत परिस्थितीचा अभ्यास करुन विकासात्मक दृष्ट्या योजना राबवाव्यात जेणेकरुन या व्यवसायावर अवलंबुन असलेल्या कुटुंबाची आर्थिक दुर्बलता दुर होऊन शैक्षणिक व सामाजिक दृष्ट्या प्रगल्भ होतील. यासाठी महापालिकेने विशेष अंदाजपत्रकामध्ये तरतुद करावी. ही विनंती मिठागराच्या व्यवसायात सद्य स्थितित अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. दिवसेंदिवस वाढत असलेल्या अनाधिकृत झोपडपट्ट्या या मिठागराच्या

जागेवर तसेच खाडीच्या तोंडावर उभ्या राहत असल्याने या झोपडपट्टीमधुन येणारे अशुद्ध सांडपाणी तसेच एकंदर शहरी वस्तीतील सांडपाणी वाहुन नेण्यासाठी कोणती यंत्रणा महापालिकेकडे नसल्याने ते सांडपाणी मिटागराच्या जागेत किंवा खाड्यांमध्ये सोडले जात आहे. मीठ उत्पादन प्रक्रियेत फार मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. त्या व्यवसायात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आरोग्याच्या दृष्टिने तसेच आवश्यक त्या सोयी-सुविधा नसल्याने महापालिकेने विशेष लक्ष घालून त्यांच्या अशा अडचणी दूर करुन विश्वासाचे वातावरण निर्माण करावे व व्यवसायाच्या दृष्टीने योग्य ती पावले उचलावीत व मीठ उत्पादनात दिवसेंदिवस स्पर्धा वाढत आहेत. मोठमोठ्या कंपन्या या व्यवसायात उतरल्याने मिरा भाईंदरच्या मीठ उत्पादकांना स्पर्धेमध्ये टिकुन राहण्यासाठी आपण आवश्यक ती आर्थिक तरतुद व सवलती देण्याची मी विनंती करतोय. मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रात असणाऱ्या १४ गावातील नागरिकांचा व्यवसाय मुख्यतः वरीलप्रमाणे असल्याने तसेच, मुळ भुमिपुत्र असलेले आदिवासी तसेच गावठाणात राहणाऱ्या नागरिकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तेथील सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी तसेच, त्यांच्या जीवनात अमुल्य फेरबदल घडविण्यासाठी त्यांना सर्व दृष्टिने सुरक्षा प्राप्त करुन देण्याची सदर अंदाजपत्रकात ३० लाखाची तरतुद करण्यास विनंती करतो. उपरोक्त सर्व व्यवसायात काम करणारी मंडळी पिढयानपिढया सदर व्यवसाय करित असल्याने त्यांचे राहणीमानही तशाच पद्धतीचे आहे. तसेच, करवाढीमुळे झालेली भरमसाठ वाढ ही भरणे नागरिकांना शक्य होत नाही. तेव्हा ग्रामपंचायत वेळेपासुन नाममात्र घरपट्टी, सनद या भागाच्या विकासाच्या दृष्टिने ग्रामीण भाग म्हणुन ग्रामीण भागांना काही नियमामध्ये शिथिलता आणुन देण्याची विनंती करतो. एकंदरीत मासेमारी, शेती व्यवसाय, मिठागरे, स्टँडपोस्ट, मलनिःसारण यंत्रणा तसेच सामाजिक व आर्थिक दुर्बल असलेल्या ग्रामीण भागात राहणाऱ्या नागरिकांच्या विकासासाठी ५० लाखाची भरीव तरतुद करुन शहरीकरण व औद्योगिककरणाच्या प्रक्रियेमध्ये गावाचे गावपण टिकविण्यासाठी ग्रामीण जनतेला दिलासा दयावा. ही आग्रहाची विनंती. अपेक्षित सहकार्याबद्दल धन्यवाद.

**प्रभात पाटील :-**

महापौर मॅडम, मला एवढेच म्हणायचे आहे की, त्यांनी मासेमारी, शेती व्यवसाय. ह्या शहराशी निगडित अशा अनेक सुचना मांडल्या. मला असे वाटते, त्यांच्या पक्षाचे सदस्यसुद्धा स्थायी समितीत आहेत. आणि ते ग्रामीण भागाशी निगडित आहेत. संबंधित सुचना त्यांनी स्थायी समितीला शिफारस केली असेलच मग मला असे वाटते की, या सभागृहामध्ये पुन्हा पुन्हा त्या सुचना येण्याची गरज नव्हती आणि इतका वेळ खाण्याचीदेखील गरज नव्हती. या सुचना पूर्वीच यायला पाहिजे होत्या आणि केल्या असतील आणि आमचा या गोष्टीला विरोध नाही आहे. स्थानिक भुमिपुत्रांना या सगळ्या सवलती मिळाल्या पाहिजेत आणि जर त्यांच्या अशा सुचना असतील तर ह्या बजेटपुर्वी त्यांनी त्या स्थायी समितीला ठेवल्या पाहिजेत असे मला वाटते.

**अनंत पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो की, आता जो अर्थसंकल्प सादर केलेला आहे. त्या अर्थसंकल्पाबद्दल ज्या काही सुचना केलेल्या आहेत. त्या सुचनांमध्ये जरी मी स्थायी समितीचा सदस्य असलो तरी त्या सदस्याच्या व्यतिरिक्त काही सदस्यांना आकलन असलेली परिस्थिती लक्षात आल्यानंतर आपल्याला सुचित करायचे असते. अर्थसंकल्पावर दोन शब्द बोलावेत अशी त्यांची कल्पना असते. आपल्या अर्थसंकल्पाबद्दल आमचा विरोध नाही. स्थायी समितीमध्ये ज्या ज्या घटना घडलेल्या आहेत. त्या घटनेशी मी सहमत आहे. महापौरांचेदेखील मी अभिनंदन करतो. स्थायी समितीच्या अध्यक्षांचे अभिनंदन करतो. सुचनेविषयी सदस्यांमध्ये गैरसमज होऊ नयेत. म्हणुन मी हा खुलासा केलेला आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम, मघापासुन फक्त जकात कराबद्दल चर्चा होती. जकात कराबद्दल ठराव झाले. उपसुचना झाली. मतदान झाल्यानंतर ताबडतोब संपुर्ण अर्थसंकल्प मंजुर करण्याचा ठराव मांडला गेला. त्याच्यामुळे बऱ्याचशा सदस्यांना आपल्या सुचना करावयाच्या राहिल्या आहेत. या ठिकाणी सभागृहात असा अर्थ केला जातो की, जो सुचना मांडतो. तो या अर्थसंकल्पाला विरोध करतो आणि म्हणुन थोडक्यात कामकाज गुंडाळायचे असा जो प्रयत्न एका सदस्यांनी चालविला आहे. हे कामकाजाच्या दृष्टीने अयोग्य आहे. कारण जेव्हा आयुक्तसाहेबांनी एक महिना हे बजेट बनवायला घेतले. आज आयुक्त साहेब असते त्यांनी स्पष्टीकरण केले असते. आयुक्तांना एक महिना बजेट बनवायला लागतो आणि या ठिकाणी असे सांगितले जाते की, स्थायी समितीने मॅरेथॉन सभा घेतल्या आणि तीन दिवसांनी हे बजेट फायनल केले. जेव्हा महासभेमध्ये एक तासभर किंवा चार तासात झाले पाहिजे. अशाप्रकारच्या मर्यादा घालणे म्हणजे जे लोकप्रतिनिधी निवडुन आले त्यांच्या हक्कांवर मर्यादा

आणणे असा प्रकार होतो. तरी सभागृहाने आणि आपण जो वेळ दिला तो वेळ वाया न घालविता काही सुचना या संदर्भात मांडु इच्छितो. आपल्याला योग्य वाटल्यास त्याचा अवलंब करावा. सर्वप्रथम आपण या ठिकाणी ज्या मिळकतीच्या बाजु आहेत. त्याकडे पाहिले तर बऱ्याचशा गोष्टी अशा आहेत की, या ठिकाणी त्याचा अर्थही लागत नाही आणि मिळकत वाढविण्याच्या किंवा उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने याच्यावर काही प्रयत्न किंवा विचार झालेला नाही. या ठिकाणी वित्त आयोगाचे अनुदान इसवी सन २००२-०३ ला २ कोटी ६० लाख रुपये आहे. आता वित्त आयोगाचे अनुदान मिळविण्यासाठी काही सभागृहाच्या सदस्यांच्या प्रयत्नाची गरज लागत नाही. वित्त आयोगाचे अनुदान एकतर तेवढेच मिळवावे किंवा ते वाढवावे यासाठी जे काही सर्वतोपरी प्रयत्न करायचे असतील ते प्रशासनाने करायचे असतात. आणि या ठिकाणी आपण बघाल तर २००४-०५ ला फक्त १ कोटी ३० लाखाची तरतुद वित्त आयोगाच्या अनुदानातुन केली. याचा अर्थ शासनाकडुन जो पैसा आम्हाला मिळतो किंवा मिळु शकतो. शासनाकडे जर आम्ही प्रयोजन ठेवले तर आम्हाला हे वित्त आयोगाचे अनुदान वाढवुन मिळेल. परंतु, दुर्देवाने तशा प्रकारची कुठलीही बाब या ठिकाणी घडली नाही आणि म्हणुन वित्त आयोगाच्या अनुदानाला सुमारे दिड कोटी रुपयाच्या अनुदानाला आम्ही मुकलेलो आहोत. त्याहीपेक्षा वाढीव अनुदानालासुद्धा आम्ही मुकलेलो आहोत आणि अशा प्रकारे या अर्थसंकल्पामध्ये आम्ही उत्पन्नाची घट केलेली आहे. उड्डाणपुल गाळे भाडे आपण या ठिकाणी दाखविलेले आहेत. नवीन उत्पन्नाचे साधन याचे स्वागतच आहे. २ कोटी रुपये २००४-०५ ला आपण नवीन उत्पन्नाचे साधन उड्डाणपुल गाळेभाडे दाखविलेले आहे. परंतु, उड्डाणपुलाच्या खाली गाळे अगोदर बांधलेले आहेत किंवा बांधावयाचे आहेत. आणि बांधावयाचा प्रस्तावित खर्च या ठिकाणी कुठेही आलेला नाही. कारण हा भांडवली खर्च आहे आणि भांडवली खर्च हा तुम्हाला वेगळा दाखवायला पाहिजे. तो या ठिकाणी दाखविलेला नाही. याचा अर्थ असा आहे की, गाळे न बांधता आम्हाला जर कोणी भाडे देणार असेल तर मला वाटते या नगरपालिकेचे चांगले दिवस आलेत असे म्हणायला हरकत नाही. अर्थसंकल्पामध्ये ही सुद्धा तुट आहे. बोट रायडिंगबद्दल आम्ही ठराव मांडलेला आहे. भुयारी गटार योजनाबाबत अतिशय सांगावेसे वाटते की, आपल्याला कदाचित भाईंदर पश्चिमेच्या लोकांना याबाबत जास्त भावनात्मक विषय वाटत नसेल. परंतु, भाईंदर पुर्वेच्या भागातील लोकांना जर आर.ओ.बी. चालू झाला तर भाईंदर पूर्वेकडुन पश्चिमेकडे यायला आर.ओ.बी. शिवाय दुसरा कुठलाही पर्याय नाही. आपल्या प्रशासनाने मोठी गमतीदार गोष्ट केली. जैसल पार्कच्या रेल्वे पुलाच्या खालुन रहदारी काढण्याचा जो काही शोध लावला. त्याच्यावरुन आपल्या लोकांची किती कल्पक बुद्धी असेल याचीसुद्धा दाद दयावीशी वाटते आणि त्यानंतर त्यांना कळले की ६० लाखाची मंजुरी देऊन आता रेल्वे पुलापासुन भुयारी रस्ता होऊ शकत नाही. तेव्हा आता नवीन भुयारी रस्ता कुठे करावा? याचा शोध सुरु झाला. मध्यंतरी हस्ताक्षर अभियन सुरु झाले. दुर्देवाने सत्ताधाऱ्यांना हस्ताक्षर अभियान करावे लागते. ही लोकशाही प्रक्रियेतील लाजिरवाणी बाब आहे. तरी सुद्धा त्यांनी चांगल्या बुद्धीने ते केले असेल असे समजुन केले तरी ११ कोटी रूपये रेल्वे पुलाखाली भुयारी योजनेसाठी लागणार होते. त्याऐवजी आम्ही फक्त ५ कोटी रुपये या ठिकाणी स्थायी समितीने अंदाज दाखविलेला आहे. याचा अर्थ जेव्हा आर.ओ.बी. चालु होईल त्यावेळी भुयारी मार्गाचा पर्यायी कुठलाही या ठिकाणी प्रस्ताव नसताना त्याच्यावर अंदाज फक्त तरतुदसुद्धा साधारण १ कोटी ते ५ कोटीच्या टोटल भुयारी गटार योजनेसाठी केलेली. ही लक्षात घेता दोन-तीन वर्षे तरी भुयारी रस्ता होणार नाही. म्हणजे पूर्वेच्या लोकांना पश्चिमेकडे यायला आर.ओ.बी.च्या रस्त्याकडुन साठ ते शंभर रूपये रिक्षावाल्यांना देऊन या ठिकाणी यावे लागणार आहे. याच्यावर आपण कुठेही मात करु शकला नाही. याचासुद्धा आम्हाला अतिशय खेद वाटतो. या ठिकाणी प्रभाग समितीचे कार्यालय त्याच्यावर निधीची तरतुद ही सुद्धा दाखविलेली नाही आहे. त्यामुळे प्रभाग समिती करण्याचा जो निर्णय सत्ताधाऱ्यांनी किंवा या सभागृहातील सदस्यांनी घेतलेला आहे. त्यानुसार प्रभाग समितीचे कामकाज या वित्तीय वर्षामध्ये चालु होऊ शकणार नाही. याबद्दल सुद्धा खेद वाटतो. बाजार लिलावाबाबत खास करुन आम्ही जेव्हा अंदाजपत्रक बनवितो. तेव्हा गेल्या वर्षाच्या आम्हाला रकमा एखाद्या टायटलपोटी बाजार लिलाव म्हणा किंवा इतर भाडे प्रस्ताव जे मिळाले आहेत. त्या पुढच्या वर्षी आम्हाला मिळणार अशी आमची खात्री असली पाहिजे. असे कधीही होत नाही. अंदाजपत्रक आतापर्यंत कमी झाले. कमी होत गेले. दरवर्षी अंदाजपत्रक वाढत गेले आहे. याचा अर्थ असा आहे की, उत्पन्नात वाढ किंवा उत्पन्नात अपेक्षित वाढ धरलेली आहे. आणि जेव्हा बाजार लिलावाची रक्कम ही २००१-०२ साली ५१ लाख २००३-०४ साली ४५ लाख रुपये मिळालेली आहे. २००४-०५ साली १२ लाख रूपयाची तरतुद या ठिकाणी दाखविली आहे. याचा असा अर्थ आहे की, प्रशासन किंवा ज्यांनी हा निर्णय १२ लाखाची तरतुद करण्याचा घेतला आहे. ते कुठेतरी बाजार लिलाव घेणाऱ्या ठेकेदाराच्या वशिल्यामध्ये अडकलेले आहेत आणि म्हणुन त्यांनी ३८ लाखाची उत्पन्नाची घट या ठिकाणी दाखवली आहे. हे सुद्धा खेदजनक आहे. निदान

याच्यावर तरी सभागृहाचे एक मत व्हायला पाहिजे की, बाजार लिलावाची रक्कम दरवर्षी वाढतच जायला पाहिजे. ती ५० लाखाची ६० लाख व्हायला पाहिजे होती. पण ५० लाखाऐवजी १२ लाख का झाली? याच्यावर आमचे सभागृहातील नेते काहीच बोलणार नाहीत. कारण त्यांना कुठेतरी या लोकांना वरदहस्त द्यायचा आहे. त्यांना कुठेतरी आशीर्वाद द्यायचा आहे आणि म्हणुन त्यांनी या नगरपालिकेच्या उत्पन्नात घट घडविलेली आहे. १ कोटी २० लाख असेल तर माझी चुक आहे. मी ते मान्य करतो. कारण या ठिकाणी लाखामध्ये फिगर दिलेली आहे. अनधिकृत बांधकामा संदर्भात आपण जो काही दंड वसुल करण्याबाबत जी तरतुद केली अतिशय गमतीजनक आहे. मागच्या सभेत आपण असा उल्लेख केला महापौर मॅडम, खास करुन प्रशासनाच्याबाबत बोलतो हा प्रश्न आपल्याशी निगडित नाही आहे. मागच्या वेळेला असे सांगितले गेले की, ९० टक्के अनधिकृत बांधकामावर आम्ही ताबा ठेवलेला आहे. ह्याच्यापुढे कुठलेही अनधिकृत बांधकाम या शहरामध्ये होणार नाही. गेल्या तीन वर्षामध्ये अनधिकृत बांधकामावर जप्ती वसुली बघितली तर असेही वाटते की, प्रशासन खरोखरच कार्यक्षम आहे. आणि अनधिकृत बांधकामे थांबलेली आहेत. २००१-०२ ला जप्तीची रक्कम १२ हजार आहे. २००२-०३ ला अनधिकृत बांधकाम आणि दंड आणि जप्ती १२ वरुन अडीच लाखावर आली. म्हणजे अनधिकृत बांधकामे कमी झाली असे म्हणायला हरकत नाही. २००२-०३ पासुन २००३-०४ ला ती दोन लाखावर आली. म्हणजे अजून बांधकामे कमी झाली आणि अचानक आमच्या प्रशासनाला असे वाटायला लागले की, याच्यापुढे आम्ही अनधिकृत बांधकामावर कुठलीही कारवाई करु शकणार नाही किंवा त्याच्यावर आम्ही कंट्रोल ठेवु शकणार नाही आणि म्हणुन त्यांनी २००४-०५ ला २५ लाखाची या ठिकाणी तरतुद केलेली आहे. याचा असा अर्थ आहे की, आमचे प्रशासन पुढच्या वर्षात कुठेतरी कमी पडणार आहे आणि अनधिकृत बांधकामे वाढणार आहेत. याचा संकेत स्वतःच प्रशासन देत आहे आणि ही सुद्धा बाब आम्हाला सर्वांना मान्य आहे आणि आम्ही अर्थसंकल्पाला अशा पद्धतीने अशा तरतुदींना पुष्टी देत आहोत. ही चुकीची बाब आहे. आणि म्हणुन या ठिकाणी या बाबींची आपण नोंद घ्यावी. रस्ता नुकसान भरपाईबाबत कुठेही प्रशासनाने अशी माहिती दिलेली नाही. दरवर्षी आम्ही जेव्हा रस्ते करतो. दुसऱ्या दिवशी एम.टी.एन.एल. किंवा बी.एस.ई.एस किंवा टाटा ह्या कंपन्या दुसऱ्या दिवशी येऊन आम्हाला न विचारता किंवा आम्हाला विचारतात. रस्ता तोडतात, खोदतात. नवीन रस्ता खराब होतो. आमच्याकडुन वर्षात किती प्रस्ताव जातात. आम्ही पाठविलेल्या प्रस्तावापैकी किती मंजुर करतात? आम्हाला किती रकमा मिळतात? ह्याचे कुठेही समायोजन विशेष करुन दिलेले नाही. त्याच्यामुळे ह्या कंपन्यांकडुन जे आम्हाला प्रस्तावित नुकसान भरपाई एक कोटी रुपये मिळणार आहेत. ते चित्र कुठेही या बजेटमध्ये दुर्देवाने होत नाही. शेवटचा मुद्दा आहे. महानगरपालिका गुंतवणुकीवरील व्याज मला वाटते आपण याची नक्की दखल घ्याल. मनपा गुंतवणुकीवरील व्याज महानगरपालिकेच्या मुदत ठेवी आहे. त्या मुदत ठेवीवर आम्हाला व्याज मिळते ती एक उत्पन्नाची बाब आहे. सन २००१-०२ साली १६ लाख रुपये वाढ झालेली आहे. सन २००२-०३ साली ४७ लाख रुपये वाढ झालेली आहे. सन २००४-०५ साली ८० लाख वाढ झालेली आहे. सन २००३-०४ साली १२ लाख रुपये वाढ झालेली आहे. याच्यावरुन प्रशासनाने या बाबी स्पष्ट करायला पाहिजे की, आमच्या मुदत ठेवी वेळोवेळी होत्या. त्या घटत गेलेल्या आहेत. त्यात वाढ झालेली नाही. आणि खरे म्हणजे त्याच्यामध्ये वाढ व्हायला पाहिजे. म्हणजे कुठेतरी आम्ही जेव्हा पैसा विकास कामाला कमी पडतो. तेव्हा आम्हाला कायदयाने या मुदत ठेवी ठेवायच्या आहेत. त्या न ठेवता किंवा त्या मोडुन आम्ही तो पैसा विकासाला खर्च करतो. अशाप्रकारे अर्थसंकल्पामध्ये या सगळ्या त्रुटींचा आपण विचार करावा. त्याच्यामध्ये सुधारणा करावी. धन्यवाद.

**शुभांगी नाईक :-**

मॅडम, माझी एक सुचना आहे, आज आमच्या महिला महापौर आहेत. महिला महापौरांच्या मागे उभ्या राहणाऱ्या शिपायाला शिवकालीन पेशवा पेहराव देण्यांत यावा. राजदंड सभागृहात ठेवण्यांत यावा. तसेच, महापौरांना पेहराव देण्यांत यावा. याची तरतुद सभेत करण्यात यावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महापौर मॅडम, एकच सुचना आहे. आपण दरवेळी मार्केटसाठी पैसे खर्च करतो आणि नगरपालिकेच्या काळापासुन मार्केट बांधणे १ कोटी २० लाखाचे उत्पन्न दाखविलेले आहे. मॅडम, आमची अशी विनंती आहे आपण मार्केटसाठी आणि कत्तलखान्यासाठी ज्या पैशाची तरतुद केलेली आहे. अधिकाऱ्याला, नगररचना विभागाला ती जागा ताबडतोब संपादन करुन ते मार्केट आणि कत्तलखान्याची अगोदर दखल घ्यायला सांगा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मा. महापौर मॅडम, दोनच वाक्ये सांगतो. वित्त आयोगाची जी रक्कम आहे. शेवटच्या वर्षी दोन्ही ग्रॅन्ड एकदम आले म्हणुन २ कोटी ६० लाख रुपये दाखविले होते. २५ रुपये पर हेड देतात. २५ रुपये

पर हेड याप्रमाणे १ कोटी ३० लाखच मिळतात. मागच्या वर्षी दोन वर्षाचे मिळाले नाही. ते एकाच वर्षी २ कोटी ६० लाख आले. वाढुन मिळत नाही. व्याजाची जी आकारणी आहे. ती पाच वर्षे पूर्ण झाल्यामुळे व्याजाची रक्कम मिळाली नाही म्हणुन वाढीव दिसले. आता नवीन गुंतवल्यानंतर २० लाख रुपयेच मिळणार वित्त आयोगाने फिक्स केलेली आहे. आणि अनधिकृत बांधकामे तोडण्याचा खर्च कोण भरत नाही. अतिक्रमणे उचलण्याचे आणि डेव्हलपमेन्ट चार्जेस जे आहेत ते वाढले म्हणुन अनधिकृतपणे कारवाई जास्त झाल्यामुळे डेव्हलपमेंट जो टॅक्स आहे तो वसुल झाला म्हणुन सांगितले होते.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांनी मांडलेला ठराव मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ६९ :-**

मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००४/०५ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणे बाबत सर्व साधारण महासभा ठराव क्र. ६२ दि. २५/०२/२००४.

**ठराव क्र. ६२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००३/०४ चे सुधारित व सन २००४/०५ चे मुळ अंदाजपत्रका बाबतची कार्यालयीन विवरण पत्रे, अहवाल व मा. स्थायी समिती ठराव क्र. २०८ दि. ११/२/२००४ विचारात घेवून सन २००३/०४ चे सुधारित व सन २००४/०५ चु मुळ अंदाजपत्रकास आजची सभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे.

२००४/०५

| **उत्पन्न** | ''अ'' अंदाजपत्रक | १५५९४.५७ लाख |
|---|---|---|
| | ''ब'' अंदाजपत्रक | -- |
| | ''क'' अंदाजपत्रक | २६८२.३५ लाख |
| | एकूण | १८२७६.९२ लाख |

| **खर्च** | ''अ'' अंदाजपत्रक | १५५९४.५७ लाख |
|---|---|---|
| | ''ब'' अंदाजपत्रक | ५०.०० लाख |
| | ''क'' अंदाजपत्रक | ३९७४.६१ लाख |
| | अखेरची शिल्लक | ५.०१ लाख |

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती. अनुमोदन :- श्रीम. जेन्वी अल्मेडा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**मा. महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

ठरावाचे वाचन करुन सदरचा ठराव मंजुर करण्यांत आला.

**चंद्रकांत मोदी :-**

एक शोक प्रस्ताव आहे. तो मी मांडतो. स्वतंत्र सेनानी सविताबाई हरिहर रावळ इनका निधन हुआ है।

**शफीक खान :-**

दुसरा शोक प्रस्ताव है। आजही उनके पती हरिहर लल्लुभाई रावळ उमर ८० साल। मिरा रोड के रहिवासी है। कॉंग्रेस के वरिष्ठ नेता है। स्वातंत्र्य सेनानी थे। आजही उनका निधन हो गया है। उसका शोकप्रस्ताव।

**रोहिदास पाटील :-**

भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते सिकंदरजी बख्त यांचेही दुःखद निधन झालेले आहे. त्याबद्दल शोकप्रस्ताव मांडत आहे.

**दुखवटा ठराव क्र. ६३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नागरीक तसेच स्वतंत्र सेनानी सविताबाई हरिहर रावळ व जेष्ट कॉंग्रेस कार्यकर्ते तसेच स्वतंत्र सेनानी हरिहर लल्लूभाई रावळ यांचे दुःखद निधन झाले. तसेच भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते सिकंदरजी बख्त यांचेही दुःखद निधन झाले. त्यामुळे ही सर्वसाधारण सभा दुःख व्यक्त करीत असून मृतात्म्यास चिरशांती लाभो अशी प्रार्थना करीत आहोत.

**सुचक :- श्री. चंद्रकांत मोदी. अनुमोदन :- श्री. शफिक खान.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सभेस उपस्थित असलेले मा. उपमहापौर, मा. आयुक्त, मा. प्र. सचिव, अधिकारी वर्ग तसेच पत्रकार बंधू आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली असून सभा संपल्याचे मी जाहिर करीत आहे.

**सभा संपल्याची वेळ**
**सायं. ०३.४५ वाजता**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगर सचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपलिका**